रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शुक्रवार । दि. ३१ जुलै २०२६ । अंक ५५ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### राज्यावर अतिवृष्टीचे सावट

**मुंबई :** राज्यातील बहुतांश प्रदेशांवर काही दिवसांपासून वादळी पावसाचा प्रभाव असल्याने अनेक भागात चांगल्या पावसाची नोंद होत आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे अतीतीव्र क्षेत्र पश्चिमेकडे सरकत असून काही राज्यांवर त्याच्या प्रभावामुळे वादळी पावसाची नोंद होत आहे. महाराष्ट्रातही या स्थितीचा प्रभाव वाढत असून गुरुवारी राज्यातील अनेक भागात मुसळधार, तर काही भागात अतिवृष्टीसदृश्य पावसाचा अंदाज असून रेड अलर्ट दिला आहे. राज्यातील बहुतांश भागात वादळी पावसाची शक्यता आहे.

### मासेमारी बंदीचा हंगाम वाढला

**उरण :** राज्यातील मासेमारी बंदीचा कालावधी पंधरा दिवसांनी वाढल्याने मासळीच्या दरात दुपटीने वाढ झाली आहे. यातच सध्या कर्नाटक आणि पश्चिम बंगाल राज्यांतून मासळीची आवक करण्यात येत असून स्थानिक मच्छिमारांमध्ये नाराजी पसरली आहे. सरकारने १ जून ते ३१ जुलै दरम्यानच्या पावसाळी मासेमारी बंदीच्या कालावधीत वाढ करून हा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविला आहे. मात्र गोवा राज्यात १ ऑगस्टपासूनच मासेमारी हंगाम सुरू होणार असून याचा परिणाम राज्याच्या मासेमारी व्यवस्यावर होणार असल्याची भीती मच्छिमार व्यक्त करत आहेत.

# रायगडचे महसूल बदनाम !

## ■ मागील पाच वर्षांत किमान १७ प्रकरणांत अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावे समोर

## ■ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दखल घेण्याची गरज

**। चौल । प्रतिनिधी ।**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अलिबाग दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील महसूल विभाग पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक झालेले शहापूरचे मंडळ अधिकाऱ्यांच्या समर्थनार्थ रायगड जिल्हा तलाठी संघाने कामबंद आंदोलन केले होते. याबाबत जनतेतून संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर आता २०२१ ते २०२६ या काळात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवायांमध्ये महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची सातत्याने समोर आलेली नावे पुन्हा चर्चेत आली आहेत. सामान्य नागरिकांच्या सातबारा, फेरफार, वारस नोंद,




उत्खनन परवानगी आणि इतर महसुली कामांशी संबंधित किमान १७ प्रकरणांत अधिकारी, कर्मचारी किंवा संबंधित व्यक्तींवर कारवाई अथव । गुन्ह्यांची नोंद झाल्याची नोंद उपलब्ध आहे.

महसूल विभाग हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित विभाग मानला जातो. जमिनीचे व्यवहार, वारस नोंद, फेरफार, बिनशेती, उत्खनन परवानग्या, दाखले आणि विविध महसुली कामांसाठी नागरिकांना या यंत्रणेवर अवलंबून राहावे लागते. मात्र, गेल्या पाच वर्षांत रायगडमध्ये तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, महसूल सहाय्यक, अव्वल कारकून तसेच नोंदणी व मुद्रांक विभागातील अधिकाऱ्यांवर झालेल्या एसीबी कारवायांमुळे विभागाच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही प्रकरणांत अधिकारी रंगेहाथ पकडले गेले, तर काही ठिकाणी लाच मागितल्याप्रकरणी गुन्हे नोंदविण्यात आले.

२०२१ मध्ये मुरुड येथील तत्कालीन तहसीलदार गमन रामजी गावित यांच्यासह दोन कर्मचाऱ्यांवर १५ हजार रुपयांच्या लाचप्रकरणी गुन्हा दाखल झाला. या प्रकरणात रामनाथ पाटील यांना प्रत्यक्ष रक्कम स्वीकारताना एसीबीने पकडले होते. त्याच वर्षी रोहा तालुक्यातील घोसाळे येथील मंडळ अधिकारी •➤पान २ वर

### कारवाईनंतरही प्रश्न कायम...

एसीबीच्या सातत्याने होणाऱ्या कारवायांनंतरही महसूल विभागातील लाचखोरीची प्रकरणे थांबत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे केवळ सापळे रचून कारवाई करण्यापेक्षा भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरणाऱ्या व्यवस्थेवर कठोर उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या रायगड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणांची दखल घेत विभागात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी कोणते ठोस निर्णय घेतले जातात, याकडे आता सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# वादानंतर मंगेश वाकडीकरांचा यू-टर्न

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



### चूक झाली; वाकडीकरांची कबुली, माध्यमांशी संवादासाठी पाच सदस्यीय पॅनल

रायगड जिल्हा परिषदेतील अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधण्यासाठी अध्यक्षांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचा आदेश काढून वादाच्या भोवऱ्यात सापडलेले जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी अखेर आपली भूमिका बदलली आहे. गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आदेशातील त्रूटी मान्य करत, तो आदेश केवळ पदाधिकाऱ्यांसाठी होता आणि घाईगडबडीत अधिकाऱ्यांचाही त्यात उल्लेख झाल्याचे स्पष्ट केले.

काही दिवसांपूर्वी काढलेल्या आदेशात जिल्हा परिषदेच्या कोणत्याही विभागातील अधिकारी किंवा पदाधिकाऱ्यांनी माध्यमांना माहिती देण्यापूर्वी अध्यक्षांची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. या आदेशावरून पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रशासकीय वर्तूळातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. माहितीच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न असल्याची टीकाही करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर अखेर वाकडीकर यांनी पत्रकार परिषद घेऊन आदेशामागील भूमिका स्पष्ट केली. माध्यमांशी संवादाबाबतचा आदेश हा केवळ पदाधिकाऱ्यांसाठी होता. मात्र स्वीय सहाय्यकाच्या •➤पान २ वर

## वेधक

### श्रीवर्धनमध्ये दरड कोसळली

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील धोंडगल्ली परिसरात गुरुवारी (दि.३०) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास दोन ठिकाणी दरड कोसळल्याची घटना घडली. एका तीव्र उताराच्या पायवाटेवरून एक भला मोठा दगड वेगाने खाली आला आणि घराच्या बाजूलाच उभ्या केलेल्या दुचाकीवर आदळला. सुदैवाने, दुचाकीवर धडकल्यानंतर दगड तिथेच थांबल्याने दुर्घटना टळली. जर हा दगड मुख्य रहदारीच्या रस्त्यावर आला असता तर मोठी जीवितहानी झाली असती.या घटनेत दुचाकीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. संभाव्य धोका लक्षात घेता प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे.

### अमित शहांच्या राजीनाम्याची मागणी

**नवी दिल्ली :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. आज राज्यसभेत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न केला, यामुळे सभागृहात राडा झाला. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि खासदार मल्लिकार्जून खर्गे यांनी थेट गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली. तसेच सभागृहात मनुस्मृतीवरून गोंधळ पहायला मिळाला. राज्यसभेत शिक्षण व्यवस्थेवरील चर्चेदरम्यान काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. खर्गे म्हणाले की, शिक्षण हा काही मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नाही. शिक्षण क्षेत्रात सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. देशातील अनेक शैक्षणिक संस्थांवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचा प्रभाव वाढत आहे.

### ‘अशैक्षणिक कामातून मुक्त करा’

**रायगड :** राज्यातील मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमात कार्यरत असलेले ‘मतदान केंद्रस्तरीय अधिकारी’ (बीएलओ) आणि बीएलओ पर्यवेक्षकांना सहा हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. हे मानधन नियमित मानधनाव्यतिरिक्त असेल. मात्र, मानधनापेक्षा अशैक्षणिक कामातून मुक्तता करण्याची मागणी शिक्षक संघटनांकडून केली जात आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशामध्ये मतदारयादीच्या सखोल पुनरीक्षणाचा •➤पान २ वर

# महावितरण अधिकाऱ्याला शेकापचा घेराव

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

स्मार्ट मीटरमुळे तिपट्टीने वीज बील येत असल्याने ग्राहक मोठ्या संकटात सापडले. अखेर शेकापने चेंढरे येथील कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात धडक देऊन राजेश भगत या अधिकाऱ्याला घेराव घातला. स्मार्ट मीटरच्या वाढीव बिलाबाबत जाब विचारून वीज बिलाच्या स्थिर आकारणीसह इतर करांचा सावळा गोंधळ उघड केला. शेकाप महिला आघाडी ॲड. मानसी म्हात्रे यांनी वाढलेल्या बिलाबाबत अधिकाऱ्यांची उजळणीच घेतली. दरम्यान स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करा या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांबाबत गुरुवारी (दि.३०) निवेदन देण्यात आले.

यावेळी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, वेश्वीचे माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, रायगड बाजारचे



### ■ स्मार्ट मीटरच्या वाढीव बिलाबाबत विचारला जाब

### ■ स्थिर आकारणीसह इतर करांचा सावळा गोंधळ उघड

उपाध्यक्ष प्रमोद घासे, रायगड जिल्हा मराठी पत्रकार •➤पान २ वर

“ वाढीव बिलाबाबत सर्वसामान्य ग्राहक मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. स्मार्ट मीटर सक्तीमुळे हे बील वाढत आहेत. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. योग्य ती कार्यवाही केली नाही म्हणून महावितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयावर धडक दिली. त्यांना निवेदनही दिले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी मागण्यांची दखल घ्यावी. अन्यथा याच कार्यालयावर उपोषण केले जाईल. ”
– सुरेश घरत, शेतकरी कामगार पक्ष, तालुका चिटणीस – अलिबाग

### जनतेची लूट थांबवा - चित्रलेखा पाटील

स्मार्ट मीटर असे गोंडस नाव देऊन महाराष्ट्रातील सर्वसामान्यांची स्मार्ट लूट करण्याचे काम सरकार करत आहे. हा प्रकल्प जनतेच्या हितासाठी नसून काही मोजक्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या फायद्यासाठी राबवला जात आहे, असा आरोप शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केला. शेकापने सुरुवातीपासूनच स्मार्ट मीटर प्रकल्पाला विरोध केला असून, सर्वसामान्य ग्राहकांवर होणाऱ्या आर्थिक परिणामांविरोधात सातत्याने आवाज उठविला असल्याचे त्यांनी सांगितले. चित्रलेखा पाटील म्हणाल्या, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर ग्राहकांना भरमसाठ वीजबिले येत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अनेक ठिकाणी •➤पान २ वर

## दीड वर्षांनंतर खुशबू ठाकरे मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल

# आमरण उपोषणानंतर प्रशासन झुकले; वैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध एफआयआर

**। पेण । संतोष पाटील ।**

पेण तालुक्यातील वरवणे येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थिनी खुशबू नामदेव ठाकरे हिच्या मृत्यूप्रकरणी तब्बल दीड वर्षांनंतर अखेर पेण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०६(१) अंतर्गत वैद्यकीय अधिकारी डॉ. ममता मधुकर गजबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे खुशबूच्या कुटुंबीयांनी आणि विविध सामाजिक संघटनांनी उभारलेल्या दीर्घ न्यायलढ्यालामहत्त्वाचेयशमिळाले असून प्रकरणाच्या तपासाला अखेर



कायदेशीर दिशा मिळाली आहे. २२ जानेवारी २०२५ रोजी उपचारादरम्यान खुशबू ठाकरे हिचा मृत्यू झाला होता. उपचार प्रक्रियेत गंभीर वैद्यकीय निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करत तिचे वडील नामदेव ठाकरे यांनी सुरुवातीपासूनच दोषींवर गुन्हा दाखल करून निष्पक्ष चौकशीची मागणी केली होती.

या मागणीला ग्राम संवर्धन सामाजिक संस्था, राजीव गांधी पंचायतराज संगठन आणि आदिवासी समाजाने सातत्याने पाठिंबा दिला. निवेदने, आंदोलने, अधिकाऱ्यांच्या भेटी तसेच ६ मे २०२५ रोजी तहसील कार्यालयावर काढण्यात आलेल्या आदिवासी आक्रोश •➤पान २ वर

# अधिकारी, ठेकेदारांमुळेच ‘जलजीवन’चे वाटोळे

## जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचा आरोप

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नैसर्गिक स्त्रोताचा वापर करून जलजीवन योजना राबविण्याचा शासनाचा उपक्रम आहे. मात्र रायगड जिल्ह्यात अनेक ठेकेदारांनी नैसर्गिक स्त्रोताचा वापर न करता, एमआयडीसी पाण्याच्या स्त्रोत घेऊन योजनांची कामे केल्याची बाब जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या निदर्शनास आणून दिली. जलजीवन योजना चांगली आहे.मात्र ठेकेदार आणि अधिकाऱ्यांनी या योजनेचे वाटोळे केले, असा आरोप यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी गुरुवारी (दि.३०) पत्रकार परिषदेत केला.

रायगड जिल्ह्यामध्ये साधारणपणे जानेवारी ते मार्चच्या दरम्यान पाणी टंचाईला सुरुवात होते. पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर येते. जनतेला स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, गावातील महिलांच्या डोक्यावरील हंडे उतरविण्यासाठी जलजीवन मिशन ही योजना राबविण्यात आली. हर घर नल या योजनेअंतर्गत प्रत्येक घरात नळ कनेक्शन देण्याची मोहिम हाती घेण्यात आली. २०२४ पर्यंत या योजनेमधून पाणीपुरवठा करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते. या योजनेमध्ये प्रतिदिन प्रतिमाणसी किमान ५५ लिटर याप्रमाणे पाण्याची उपलब्धता करणे अपेक्षित होते.

जलजीवन मिशन योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये १ हजार ४२२ योजनांची कामे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हाती घेण्यात आली. यासाठी सुमारे १ हजार ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सर्व योजनांची कामे २०२३ डिसेंबर अखेरपर्यंत करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र जिल्ह्यातील योजनांची •➤पान २ वर

शासनाकडून १३४ कोटी रुपयांचा निधी जलजीवन योजनेसाठी आवश्यक आहे. जे ठेकेदार शंभर टक्के कामे पूर्ण करतील त्यांनाच निधी वितरीत केला जाईल. निकृष्ट दर्जाच्या कामाचा आढावा घेतला जाईल. योजनेतून पाणी घरात पोहचत नाही, तोपर्यंत बिले काढू नका, अशी सुचना अधिकाऱ्यांना दिली आहे.

# रायगड जिल्हा परिषदेत दिव्यांग प्रमाणपत्रे संशयास्पद

## ठाणे आरोग्य विभागाच्या अहवालाने प्रशासनात खळबळ; २० कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांवर प्रश्नचिन्ह

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील दिव्यांग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीमध्ये धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. माहिती अधिकारातून प्राप्त झालेल्या कागदपत्रांनुसार, ठाणे आरोग्य विभागाच्या विशेष तपासणीत काही कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रांबाबत गंभीर शंका उपस्थित झाली असून, प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते संजय सावंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जानंतर ही माहिती समोर आली आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून उपसंचालक, आरोग्य सेवा (मुंबई मंडळ, ठाणे) यांनी विशेष पडताळणी मोहीम राबवली होती. या मोहिमेत एकूण ६७ दिव्यांग अधिकारी •➤पान २ वर

### प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

दिव्यांगत्वाच्या टक्केवारीत बदल, काही प्रकरणे जे.जे. रुग्णालयाकडे वर्ग होणे आणि प्रमाणपत्रांची पुनर्पडताळणी सुरु असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांनी शासकीय सवलतींसाठी चुकीची माहिती दिली होती का, याचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. आता रायगड जिल्हा परिषद पुढे कोणती प्रशासकीय किंवा शिस्तभंगाची कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

“ वैद्यकीय पुनर्तपासणीनंतर ९ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाच्या टक्केवारीत बदल आढळला आहे. त्यानुसार जुनी प्रमाणपत्रे रद्द करून नवीन प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया सुरू आहे. अमरावती व पनवेल येथील दोन प्रमाणपत्रांव्यतिरिक्त उर्वरित सात प्रमाणपत्रांची पडताळणी सुरू आहे. ”
– डॉ. निशिकांत पाटील, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड

## केंद्रीय स्वयंपाकगृहाची होणार तपासणी | उच्चस्तरीय समिती ठेवणार देखरेख

# शालेय पोषण आहारावर करडी नजर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीची प्रभावी, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण ही योजना अस्तित्त्वात असेपर्यंत या समितीचा कार्यकाळ राहणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची माध्यान्ह भोजन) ही योजना १९९५-९६ पासून राबवली जाते. त्या अंतर्गत




इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. ग्रामीण, तसेच शहरी भागातील ज्या शाळांमध्ये स्वयंपाकगृह आणि धान्य साठवण्याची जागा उपलब्ध आहे, अशा शाळांमध्ये योजनेची अंमलबजावणी बचत गट, अन्न शिजवणाऱ्या संस्थांकडून केली जाते.

नागरी भागातील ज्या शाळांमध्ये स्वयंपाकगृह आणि धान्य साठविण्याची जागा •➤पान २ वर

### अशी असेल समितीची रचना

शालेय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव किंवा सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये एकूण सात सदस्यांचा समावेश आहे. त्यात अन्न व औषध प्रशासन, महिला व बालविकास, आरोग्य या विभागांचे आयुक्त, प्राथमिक शिक्षण संचालक, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना कक्षाचे राज्य समन्वयक तथा सहसंचालक, तसेच शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव किंवा उपसचिव यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे.

भारतीय शेतकरी कामगार पक्ष
रायगड
वर्धापन दिन
दिनांक २ ऑगस्ट २०२६

लाल सलाम

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता राशी पेट्रोल पंप, खालापूर फाटा, ता. खालापूर जि. रायगड येथे पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
सुरेश नामदेव खैरे
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# नारंगी-भुवनेश्वर येथे गुरुपौर्णिमा साजरी

**| नारंगी | वार्ताहर |**

तालुक्यातील खारेपाट विभागातील श्रीमद् गुरूपाद मूर्ती समाधीस्थळ नारंगी भुवनेश्वर येथे गुरुपौर्णिमा भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी दत्तगुरूंचा अभिषेक आणि महाआरती संपन्न झाली. मंत्रोच्चारांचा सामूहिक जप करण्यात आला. गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन ट्रस्टचे अध्यक्ष संतोष वेळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. परिसरातील सेवेकरी आणि भाविकांनी गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

**पान १ वरून**

## वादानंतर मंगेश वाकडीकरांचा यू-टर्न

दुर्लक्षामुळे आणि माझ्याकडून घाईत पत्र पूर्ण न वाचताच सही झाल्याने त्यात अधिकाऱ्यांचाही उल्लेख झाला. ती चूक झाली, अशी कबुली त्यांनी दिली. यापुढे जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांतील अधिकारी माध्यमांना माहिती देऊ शकतील, असे स्पष्ट करत त्यांनी त्याबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच, माहितीचा अधिकृत आणि समन्वयित प्रवाह राखण्यासाठी पाच सदस्यीय मीडिया समन्वय पॅनल स्थापन करण्यात आल्याची घोषणाही केली.

या पॅनलमध्ये जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, कृषी सभापती वैकुंठ पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे आणि ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे यांचा समावेश आहे. जिल्हा परिषद आणि प्रसारमाध्यमांमधील समन्वय राखणे, अधिकृत माहिती वेळेत उपलब्ध करून देणे आणि गैरसमज टाळणे ही या पॅनलची जबाबदारी असणार आहे.वाकडीकर यांनी जिल्हा परिषद प्रशासनात पारदर्शकता आणि जबाबदार संवादाला प्राधान्य असल्याचा दावा केला. सर्व विभागांना माध्यमांशी माहिती देण्याबाबत स्वतंत्र सूचना दिल्या जातील आणि त्या सूचनांचे पालन न करणाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, या संपूर्ण प्रकरणामुळे जिल्हा परिषद अध्यक्षांनी काढलेल्या आदेशावरून निर्माण झालेला वाद आणि त्यानंतर झालेला यू-टर्न हा जिल्ह्यातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. आदेश जारी झाल्यानंतर निर्माण झालेल्या दबावामुळेच स्पष्टीकरण देण्याची वेळ आली का, असा प्रश्नही आता उपस्थित केला जात आहे.

## आमरण उपोषणानंतर प्रशासन झुकले; वैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध एफआयआर

मोर्चाद्वारे न्यायासाठी संघर्ष सुरू ठेवण्यात आला. दरम्यान, वैद्यकीय निष्काळजीपणा समितीचे अहवाल, आरोग्य विभागाचा पत्रव्यवहार आणि विविध चौकशी अहवाल समोर येऊनही संबंधितांवर गुन्हा दाखल होत नसल्याने आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी होती. आरोग्य विभाग, एकात्मिक आदिवासी विकास विभाग आणि पोलीस प्रशासन एकमेकांकडे जबाबदारी ढकलत असल्याचा आरोपही करण्यात आला होता. अखेर ३० जुलै २०२६ रोजी पेण उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर, राजीव गांधी पंचायतराज संगठनच्या राष्ट्रीय महासचिव नंदा म्हात्रे आणि खुशबूचे वडील नामदेव ठाकरे यांनी आमरण उपोषण सुरू केले. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेत प्रशासनाने तातडीने हालचाली करत पोलीस उपनिरीक्षक निलेश राजपूत यांच्या फिर्यादीवरून डॉ. ममता गजबे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला. एफआयआरची प्रत उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी आंदोलनकर्त्यांना सुपूर्द केल्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. एफआयआर दाखल झाल्यानंतर संतोष ठाकूर यांनी ही लढाई केवळ गुन्हा दाखल होण्यापुरती मर्यादित नसल्याचे स्पष्ट केले. ''या प्रकरणातील प्रत्येक जबाबदार व्यक्तीची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींना शिक्षा मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील,'' अशी भूमिका त्यांनी मांडली.

## रायगड जिल्हा परिषदेत दिव्यांग प्रमाणपत्रे संशयास्पद

व कर्मचाऱ्यांना ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी बोलावण्यात आले. यामध्ये १६ अल्पदृष्टी, ८ कर्णबधीर, ३९ अस्थिव्यंग आणि ४ इतर प्रकारातील दिव्यांग कर्मचाऱ्यांचा समावेश होता. उपसंचालक (आरोग्य सेवा) डॉ. अशोक नांदापुरकर यांच्या पत्रानुसार, ६७ पैकी ४६ कर्मचाऱ्यांच्या मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी पूर्ण झाली असून त्याचा अहवाल पुढील प्रशासकीय कारवाईसाठी रायगड जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला आहे.

पडताळणीदरम्यान संशयास्पद अथवा तज्ज्ञ तपासणी आवश्यक वाटलेल्या १० कर्मचाऱ्यांची प्रकरणे मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयाकडे पुढील वैद्यकीय परीक्षणासाठी वर्ग करण्यात आली आहेत.

अर्जदार संजय सावंत यांनी संशयास्पद किंवा अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांची यादी, त्यांच्यावर झालेली शिस्तभंगाची कारवाई आणि सांख्यिकीय माहिती मागितली होती. मात्र शिस्तभंग आणि प्रशासकीय कारवाईचा विषय रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येत असल्याने आरटीआय कायद्याच्या कलम ६(३) अन्वये अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

**९ कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाच्या टक्केवारीत बदल**

वैद्यकीय पुनर्तपासणीनंतर ९ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाच्या टक्केवारीत बदल झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे संबंधितांचे जुने प्रमाणपत्र रद्द करून नवीन सुधारित प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यापैकी एक प्रमाणपत्र अमरावती जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे तर एक पनवेल उपजिल्हा रुग्णालयाचे असल्याने उर्वरित ७ प्रमाणपत्रांच्या पडताळणीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी दिली.

**एक कर्मचारी वारंवार गैरहजर**

तपासणीसाठी ३० डिसेंबर २०२५, १ जानेवारी २०२६ आणि ८ जानेवारी २०२६ अशा तीन वेळा संधी देऊनही एक कर्मचारी वैद्यकीय तपासणीस गैरहजर राहिल्याचे अधिकृत पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## रायगडचे महसूल बदनाम!

राजेश वसंत जाधव यांनाही सातबारा नोंदीच्या कामासाठी लाच स्वीकारताना अटक करण्यात आली होती.

२०२२ मध्ये अलिबागच्या तत्कालीन तहसीलदार मीनल कृष्णा दळवी यांच्याशी संबंधित दोन लाख रुपयांच्या लाचप्रकरणाने राज्यभर खळबळ उडाली. या प्रकरणात मध्यस्थ म्हणून रक्कम स्वीकारणारा राकेश चव्हाण एसीबीच्या जाळ्यात अडकला होता. त्याच वर्षी सहाय्यक जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी शैलेंद्र अर्जुन साटम यांनाही लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. २०२३ मध्ये बामणोलीच्या प्रभारी तलाठी पल्लवी यशवंत भोईर यांना वारस नोंदीसाठी पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले. तर, रोहा तालुक्यातील भालगावचे तलाठी संतोष मनोहर चांदोरकर यांच्यावर दहा हजार रुपयांच्या लाच मागणीचा गुन्हा दाखल झाला.

२०२४ मध्ये सुधागड तालुक्यातील नाडसूरचे तत्कालीन तलाठी उद्धव गुंजाळ यांच्यावर उत्खननाची नोटीस रद्द करण्यासाठी तीन लाख रुपयांची लाच मागितल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला.

२०२५ हे वर्षही महसूल विभागासाठी वादग्रस्त ठरले. कर्जत तालुक्यातील कडावचे मंडळ अधिकारी चंद्रकांत ठकाजी केंडे, नेरळचे मंडळ अधिकारी संदीप रामचंद्र भंडारे, निवृत्त महसूल कर्मचारी धोंडू गायकवाड, रेवदंडाच्या तलाठी वसुंधरा धोंडू धुमाळ, चौलचे मंडळ अधिकारी विजय विश्वनाथ मापुसकर आणि भालगावचे तलाठी फिरोज मुजावर यांची नावे विविध लाचप्रकरणांत समोर आली. २०२६ मध्ये पनवेल तहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी गोवर्धन माने यांच्यावर महसुली कामासाठी लाच मागितल्याप्रकरणी एसीबीने कारवाई केली. उपलब्ध माहितीनुसार मीनल दळवी, राकेश चव्हाण, राजेश वसंत जाधव, गमन रामजी गावित, सदाशिव वालांज, रामनाथ पाटील, शैलेंद्र अर्जुन साटम, पल्लवी यशवंत भोईर, संतोष मनोहर चांदोरकर, उद्धव गुंजाळ, चंद्रकांत ठकाजी केंडे, संदीप रामचंद्र भंडारे, धोंडू गायकवाड, वसुंधरा धोंडू धुमाळ, विजय विश्वनाथ मापुसकर, फिरोज मुजावर आणि गोवर्धन माने अशी किमान १७ जणांची नावे या कालावधीत समोर आली आहेत. यातील काही प्रकरणे लाच स्वीकारण्याची, तर काही लाच मागणीची असून, काही ठिकाणी मध्यस्थ किंवा सहकाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपअधीक्षक सरिता भोसले यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

## अधिकारी, ठेकेदारांमुळेच 'जलजीवन'चे वाटोळे

कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून घेण्यात जिल्हा परिषद प्रशासनाला अपयश आले. योजना पूर्ण होऊनही नळाला पाणी नाही. विहिरीसह पाणी साठवण टाक्या बांधण्यात आल्या. घरापर्यंत नळ कनेक्शनही जोडण्यात आले. मात्र अजूनपर्यंत पाण्याची प्रतीक्षा कायम असल्याची बाब दैनिक कृषीवलच्या प्रतिनिधीने जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या निदर्शनास आणून दिली.

काही ठेकेदारांनी नैसर्गिक पाण्याचा स्रोत न वापरता, एमआयडीच्या पाण्यावर अवलंबून योजना पूर्ण झाल्याचे कागदी घोडे नाचविले आहेत. त्यामुळे योजना पूर्ण झाल्याचा अहवाल फक्त कागदावर राहिला. प्रत्यक्षात मात्र घरात पाणी पोहचले नाही. अनेक ठेकेदारांनी निकृष्ट दर्जाचे काम केले आहे. त्यांच्याविरोधातही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, असे अध्यक्षांनी पत्रकार परिषदेत सांगितले. जलजीवन योजना चांगली आहे. मात्र अधिकारी व ठेकेदारांच्या संगनमतांनी योजेनचे वाटोळे झाल्याचा आरोप जिल्हा परिषद अध्यक्ष वाकडीकर यांनी केला आहे.

## 'अशैक्षणिक कामातून मुक्त करा'

निर्णय घेतला आहे. त्यानुसार, राज्यात २९ जून ते ३१ जुलै या कालावधीत मतदारयादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, या मोहिमेला ८ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मोहिमेंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या बीएलओंना घरोघरी जाऊन मतदारांशी संपर्क साधणे, गणनापत्रक वाटप करणे, अर्ज भरून घेणे, अर्जांचे डिजिटायझेशन करणे अशी कामे आहेत. 'बीएलओ'कडून बिनचूक आणि दिलेल्या मुदतीत काम करून घेण्यासाठी, त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी, 'बीएलओं'ना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक (बीएलओ सुपरवायझर) नियुक्त करण्यात आले आहेत. बीएलओ आणि बीएलओ पर्यवेक्षक त्यांची मूळ कार्यालयीन कामे सांभाळून सखोल पुनरीक्षणाचे काम करत आहेत, असे आदेशात म्हटले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सखोल पुनरीक्षण कामासाठी बीएलओ आणि बीएलओ पर्यवेक्षक यांना एक वेळचे ६ हजार रुपये मानधन मंजूर केले आहे. हे मानधन त्यांना मिळणाऱ्या नियमित मानधनाव्यतिरिक्त राहणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## शालेय पोषण आहारावर करडी नजर

उपलब्ध नाही, अशा शाळांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृहातून ताजे अन्न पुरवले जाते. केंद्र सरकारच्या २०१७ आणि २०२२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार, केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला.

केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली समिती संपूर्ण राज्यासाठी कार्यरत असेल. राज्यात कार्यरत केंद्रीय स्वयंपाकगृहांची प्रभावी अंमलबजावणी करणे, शिजवलेले अन्न पुरवण्यासाठी महिला स्वयंसहायता गट आणि स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करणे, स्वयंपाकगृह आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या नियुक्तीची मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे, भोजनाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्यासाठी निरीक्षण यंत्रणा विकसित करणे, स्वच्छता, अन्न सुरक्षा आणि पायाभूत सुविधांचे परीक्षण करणे, विद्यार्थ्यांना वेळेत आणि दर्जेदार भोजन मिळत असल्याची खात्री करणे, योजनेत सहभागी महिला स्वयं सहायता गट, स्वयंसेवी संस्था यांच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन विश्वासार्ह मूल्यांकन प्रणालीद्वारे दर वर्षी करणे अशी समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे. समितीची बैठक किमान सहा महिन्यांतून एकदा होईल आणि आवश्यकतेनुसार विशेष बैठकही बोलावली जाईल, असे नमूद करण्यात आले आहे.

## महावितरण अधिकाऱ्याला शेकापचा घेराव

संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, अलिबाग नगरपरिषदेचे नगरसेवक अनिल चोपडा, जमाल सय्यद, माजी नगरसेविका संजना कीर, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, दत्ता ढवळे, नरेश गोंधळी आदी शेकापचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच संतप्त ग्राहक उपस्थित होते.

यावेळी ॲड. मानसी म्हात्रे यांनी सांगितले की, गेल्या अनेक दिवसांपासून अलिबाग तालुक्यासह शहरी भागात स्मार्ट मीटर बसविण्याचा तगादा सुरु करण्यात आला आहे. सक्तीने मीटर बसविले जात आहेत. अन्यथा गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रक्षोभ वाढला आहे. महावितरणच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. ग्राहकांना विश्वासात न घेता मनमानी पध्दतीने कारभार चालविला जात आहे. सुस्थितीत असलेले जूने मीटर काढून नवीन मीटरचा बोजा ग्राहकांवर टाकला जात आहे.

स्मार्ट मीटर सक्तीने लावण्यास विरोध असतानाही ग्राहकांना धमकावून मीटर लावले जात आहेत. ग्राहकांसोबत बैठका घेऊन त्यांना विश्वासात घेऊन स्मार्ट मीटर बसविण्याबाबत अनेकवेळा सांगूनही आपल्याकडून कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत आहे. ग्राहकांना यापूर्वी नियमीत बिल येत होते, त्याच्या तीन पटीने बील या स्मार्ट मीटरमुळे येत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे ग्राहकांवर आर्थिक संकट उभे राहिले असल्याची बाब मानसी म्हात्रे यांनी कार्यकारी अभियंता राजेश भगत यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच स्थीर आकार कर व इतर करांचा बोजा लावून भरमसाठ बील ग्राहकांच्या माथी मारणे चुकीचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट सांगितले.

अलिबाग तालुक्यातील व शहरातील वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर लावण्याची सक्ती तात्काळ रद्द करण्यात यावी, नव्याने बसविलेले मीटर काढून यापुर्वीचे इलेक्ट्रॉनिक मीटरची पुर्नजोडणी करण्यात यावी, ग्राहकांना विश्वासात न घेता, त्यांच्या नकळत बसविलेल्या स्मार्ट मीटरची आलेली भरमसाठ वीज बिले तात्काळ रद्द करावी, स्मार्ट मीटर बससविण्यापुर्वी नियमीत येत असलेल्या युनीटनुसार, बिलांच्या प्रमाणात विज बील आकारण्यात यावे अशा वेगवेगळया मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मागण्यांची योग्य पध्दतीने कार्यवाही झाली नाही, तर लवकरच कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल असा इशारा ॲड. मानसी म्हात्रे यांनी निवेदनातून दिला.

### जनतेची लूट थांबवा - चित्रलेखा पाटील

ग्राहकांची संमती न घेता स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मीटर बसवून घेतला नाही, तर वीजपुरवठा खंडित केला जाईल, अशी धमकी नागरिकांना दिली जात आहे. ही पद्धत लोकशाहीला धरून नाही.शेकापच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने परिपत्रक काढून स्मार्ट मीटरची सक्ती नसल्याचे स्पष्ट केले होते. असे असतानाही काही ठिकाणी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी सक्ती करत असल्याच्या तक्रारी येत आहेत. या प्रकाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. सरकार आणि ठेकेदारांना मीटर बसविण्याचे उद्दिष्ट पूर्ण करायचे आहे; मात्र महाराष्ट्रातील जागरूक जनता हा डाव यशस्वी होऊ देणार नाही. शेतकरी कामगार पक्ष सर्वसामान्य ग्राहकांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. कोणत्याही परिस्थितीत स्मार्ट मीटरची सक्ती होऊ दिली जाणार नाही. स्वर्गीय नारायण नागू पाटील यांनी ज्या पद्धतीने शेतकरी आणि कष्टकऱ्यांसाठी खोतशाहीविरोधात संघर्ष उभारला, त्याच परंपरेत आजच्या काळातील कॉर्पोरेट खोतांविरोधात लढा उभारण्याची वेळ आली आहे, असे सांगत चित्रलेखा पाटील यांनी सरकारला इशारा दिला.

# संजोग क्लिनिकचा शुभारंभ उत्साहात संपन्न

**| मुरुड | प्रतिनिधी**



मुरुड येथील मधली आळी येथे डॉ. द्वारकानाथ वामन कर्णिक प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून डॉ. मकबूल कोकाटे यांच्या हस्ते डॉ.अक्षय डहाके यांच्या संजोग क्लिनिकचा शुभारंभ पार पडला.

या प्रसंगी डॉ. अनिकेत नवले, डॉ. राजाराम हूलवान, डॉ. नितीन गांधी, डॉ. राज केशरवाणी, डॉ. सचिन प्रजापती तसेच डॉ. राजपाल, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच, मुरुड शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मकबूल कोकाटे, संजीवनी आरोग्य सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, ज्येष्ठ नागरिक सुनील मोहिले, सनी सोगावकर, सी.एम. ठाकूर, रमेश दिघे, जगन्नाथ नवले, प्रशासकीय अधिकारी यू. बी. डहाके, महाराष्ट्र अक्यूपंक्चर परिषदेचे रजिस्ट्रारनारायण नवले, नितीन नवले तसेच आरोग्य क्षेत्रातील अनेक मान्यवर, डॉक्टर, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुभारंभानिमित्त विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने आरोग्य सेवा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लायन्स क्लब मुरुड-जंजिरा व लायन्स हेल्थ फाउंडेशन यांच्यावतीने मोफत नेत्रतपासणी शिबीर, तेरणा वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्यावतीने मोफत सर्वसाधारण आरोग्य तपासणी, औषध वाटप, तसेच उज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी फाउंडेशन यांच्या वतीने आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी अंजुमन-ए-इस्लाम सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. साजिद शेख व त्यांची टीम उपस्थित होती. तसेच, उज्वल भविष्य सामाजिक संस्था यांच्या वतीने सौ. उज्वला चंदनशिव यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य जनजागृती व योगाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.


### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, यांनी जमीन मालक १.प्रकाश बाबुलाल ओसवाल, २. सुरेश शेषमल ओसवाल, ३. चंदनमल प्रतापमल शहा, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीच्या, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १. | २/९ | ०.४१.०० | ०.४२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

**ॲड. संदिप मारूती घरत,** ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन - ४१०२०१. मो.९२२०६५३३०२/ ८४४६७२४९८८

**ॲड. एच. ए. भगत.** पत्ता:२०१, २०२, सुशील प्राईड, २ रा. माळा, गार्डन हॉटेल जवळ, बस स्टॉप पनवेल जि. रायगड - ४१०२०६, मो. ८०८०२०२२७२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे -जांमरुंग, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| प्रभाकर पांडुरंग गोतारणे | १४ | १ | ०-१४-२० | ०-२७ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्भुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ३१/०७/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वनिल बाबूराव देशमूख**
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८८३०५६०९६२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री नवनाथ काळू पाटील यांनी विद्यमान मालक जसवंत नवनीतलाल मिस्त्री यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाचा करार त्यांचेबरोबर केलेला आहे. कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | सत्ता प्रकार |
|---|---|---|---|
| चाळ तालुका पनवेल, रायगड | ७९/१ | ०-५५-६० | १ |

सदर मिळकत जाहिर नोटिसचा विषय आहे.

वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदर मिळकतीचा व्यवहार केला जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. महेश म. गुंजाळ**
ए/१०४,श्री साईकृष्णा, को.ऑप.हौ.सो.सावरकर चौक, नवीन कोर्टाजवळ, जुने पनवेल, रायगड-४१०२०६
मोबा. ९८२२०१३३५०, ७५८८७१३९११

वकील ॲड. विजय वि. पाटील

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे कोर्टात**

रे. मु. क्र.८९/२०१६

१) श्री. प्रशांत केशव मुळेकर,
वय - ५६ वर्षे, धंदा - नोकरी,
रा. १५०१, शांती हाईट, जी. डी आंबेडकर रोड, -- वादी
दादर पूर्व मुंबई ४०० ०३१
कायमचा पत्ता :- २३०४ ओमकार
वेदा, एकनाथ घाडी मार्ग, जी.डी
आंबेकर रोड, भोईवाडा, परेल
मुंबई - ४०० २१२

विरुद्ध

१) जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग,
२) शांती भगिनी मारिया संघ, (ट्रस्ट)
शांती निकेतन, गुरुकृपा बिल्डींगच्या मागे
फादर वाडी, गोखीवेरा वसई रोड (पुर्व)
जिल्हा ठाणे, पिन ४०१ २०५
३) ग्रामस्थ भंडारपाडा, कोर्लई गाव,
शंकर गोविंद महालकर मयत तर्फे वारस
३/१) श्री. शशिकांत शंकर महारलकर,
वय - सज्ञान, धंदा - शेती,
रा.मु.पो.कोर्लई, घर नं. ५१,
ता.मुरुड, जि.रायगड
३/२) श्री. सुनिल शंकर महारलकर, -- प्रतिवादी
वय-सज्ञान, धंदा-शेती,
रा.मु.पो.कोर्लई, घर नं. १४/ए/१,
ता. मुरुड, जि. रायगड
४) दुय्यम निबंधक, श्रीवर्धन
५) चॅरीटी कमिशनर, ठाणे
लिली अपार्टमेंट, पहिला मजला,
टेंभीनाका, आनंद आश्रमासमोर,
ठाणे (प) ४००६०१
६) तलाठी कोर्लई गाव,
ता. मुरुड, जि. रायगड

या कामातील प्रतिवादी याचे विरुद्ध वादी यांनी दिवाणी न्यायालयात रे. मु.क्र. ८९/२०१६ नुसार मौजे भंडारपाडा, ता. मुरुड, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ५७/३ या मिळकतीचा ताबा मिळणेकरता दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३/१ व ३/२ या प्रतिवादीस समन्स/नोटीसची बजावणी करणेंबाबत दिनांक ३०/०६/२०२६ रोजी मे. कोर्टाने आदेश पारीत केलेले आहेत.

तरी या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, सदरच्या दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ११/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आलेली आहे. तरी प्रतिवादी क्र. ३/१ व ३/२ यांस अथवा अन्य कोणासही त्यांचे म्हणणे अथवा हरकत द्यावयाची असल्यास अथवा त्यांचे वतीने वकिल नेमणेचे असल्यास सदरचे तारखेस हजर राहावे. याकामी प्रतिवादी क्र. ३/१ व ३/२ यांनी हजर राहून त्यांचे म्हणणे सादर न केल्यास त्यांचेविरुध्द योग्य ते आदेश पारीत करणेत येतील.

सदरची नोटीस आमच्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यासह दिली आहे.

सही/- **कनिष्ठ लिपिक** **दिवाणी न्यायालय क.स्तर अलिबाग**
कोर्टाचा शिक्का
सही/- **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क.स्तर अलिबाग**

### श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन
**रविंद्र नारायण राऊत प्रशासकीय भवन**
**ता. श्रीवर्धन जिल्हा - रायगड**
(ISO 9001:2015 प्रमाणित)

दूरध्वनी क्रमांक : ०२१४७-२२२३७८ ई-मेल : shriwardhan.nagarparishad@gmail.com

क्र.श्रीनप/आरोग्य/०७१७/२०२६-२७ दिनांक :- २७/०७/२०२६

**सार्वजनिक सूचना**
**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी बाबत**

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून लागू झाले आहेत.

सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, हॉटेल्स, बाजारपेठा, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की, सदर नियमानुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४ /२०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक कचरा निर्मात्यावर स्रोतस्थानी कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

**प्रत्येक कचरा निर्मात्याने खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्रोतस्थानी चार प्रकारात वर्गीकरण करणे बंधनकारक राहील :**

१. ओला कचरा : अन्न, भाजीपाला, फळांचे अवशेष, स्वयंपाकघरातील कचरा.
२. सुका कचरा : प्लास्टिक, कागद, धातू, काच, कापड इत्यादी.
३. सॅनिटरी कचरा : डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स, बँडेज इत्यादी.
४. विशेष / घातक कचरा : बॅटरी, बल्ब, औषधे, ई-कचरा, रंगाचे डबे इत्यादी.

**नागरिकांची जबाबदारी :**
- कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करूनच घंटागाडीत सुपूर्द करणे.
- ओला व सुका कचरा एकत्र न देणे.
- सार्वजनिक ठिकाणी, समुद्रकिनारी, नाल्यात किंवा रस्त्यावर कचरा टाकू नये.
- प्लास्टिक, ई-कचरा व बांधकाम व पाडकाम (C&D) कचरा स्वतंत्रपणे नगरपरिषदेकडे जमा करावा.
- सॅनिटरी व घातक कचरा सुरक्षितरीत्या वेगळा करून द्यावा.
- कचरा जाळणे किंवा उघड्यावर फेकणे टाळावे..

**लोकप्रतिनिधींची जबाबदारी :**
- आपल्या प्रभागात/वॉर्डात स्वच्छता व कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करणे.
- नागरिकांना नियमांचे पालन करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय सहभाग घेणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

**Bulk Waste Generators (मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे) यांची जबाबदारी :**

ज्या संस्था / इमारती / संकुलांचे क्षेत्रफळ २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटरपेक्षा अधिक पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे.

अशा संस्थांनी-
- ओल्या कचऱ्यावर जागेवरच कंपोस्ट/बायोगॅस प्रक्रिया करावी.
- कचऱ्याचे स्वतंत्र वर्गीकरण व साठवणूक करावी.
- प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये.
- नगरपरिषदेच्या सूचनांचे पालन करावे.
- अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवावा.

**दंडात्मक तरतूद :**

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती संस्था अथवा आस्थापनांवर ''Polluter Pays Principle'' नुसार पर्यावरणीय भरपाई व दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

तरी सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक श्रीवर्धन शहराच्या निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे काटेकोर पालन करून श्रीवर्धन नगरपरिषदेस सहकार्य करावे, ही विनंती

सही/- **(श्री.अवधूत कुंभार)** **मुख्याधिकारी** **श्रीवर्धन नगरपरिषद**

सही/- **(श्री. अनंत गुरव)** **उपनगराध्यक्ष** **श्रीवर्धन नगरपरिषद**

सही/- **(श्री.अतुल चौगुले)** **नगराध्यक्ष** **श्रीवर्धन नगरपरिषद**

# रेवस-करंजा रो-रो प्रकल्पावर प्रश्नचिन्ह

## शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक बोजा; अधिकाऱ्यांसह ठेकेदाराच्या चौकशीची मागणी



| उरण | प्रतिनिधी |

महत्त्वाकांक्षी समजला जाणारा रेवस-करंजा रो-रो जेट्टी प्रकल्प हा नियोजनातील त्रुटी, ठेकेदाराच्या कथित अकार्यक्षमता आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. तब्बल सहा वर्षे रखडलेल्या या प्रकल्पामुळे शासनाच्या तिजोरीवर १३ कोटी ६७ लाख ५१ हजार ३३५ रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडला असून, सुरुवातीचा २३ कोटी ३६ लाख ५१ हजार २१४ रुपयांचा प्रकल्प आता ३७ कोटी ४ लाख २ हजार ५४९ रुपयांपर्यंत फुगला आहे.

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डामार्फत सागरमाला योजनेअंतर्गत रेवस व करंजा बंदरांदरम्यान रो-रो सेवा सुरू करण्यासाठी दोन्ही ठिकाणी आधुनिक जेट्टी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या प्रकल्पामुळे वाहनधारकांचा प्रवासाचा वेळ कमी होईल, रस्त्यांवरील ताण घटेल आणि जलवाहतुकीला चालना मिळेल, असा दावा करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात प्रकल्पाला दिरंगाई, वाढता खर्च आणि अपूर्ण कामांचा शाप लागल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, करंजा बंदरावरील जेट्टीचे काम पूर्ण झाले असून, त्यासाठी ५ कोटी ५९ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र, स्थानिक नागरिकांनी जोडरस्त्याच्या कामास विरोध केल्याने हा प्रकल्प अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेला नाही. दुसरीकडे, रेवस बंदरावरील रो-रो जेट्टीचे काम २०२० मध्ये सुरू करण्यात आले. या कामासाठी मंजूर निधीपैकी सुमारे १३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, संबंधित ठेकेदाराच्या कथित अकार्यक्षमता आणि सततच्या विलंबामुळे उर्वरित काम रखडले. अखेर संबंधित ठेकेदाराची हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता देत प्रकल्पाचा खर्च ३७ कोटी ४ लाख २ हजार ५४९ रुपये इतका निश्चित केला आहे. म्हणजेच केवळ दिरंगाईमुळे प्रकल्पाच्या खर्चात १३.६७ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. सार्वजनिक निधीवर पडलेल्या या अतिरिक्त भारासाठी जबाबदार कोण? ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली आणि शासनाला झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई कोण करणार? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

एकीकडे कोट्यवधी रुपयांची खर्चवाढ, दुसरीकडे रखडलेले काम आणि भविष्यातील व्यवहार्यतेवर निर्माण झालेले प्रश्न यामुळे या प्रकल्पाचे नियोजन आणि अंमलबजावणी पुन्हा एकदा तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. जनतेच्या कराच्या पैशातून उभारल्या जाणाऱ्या विकासकामांमध्ये अशा प्रकारची दिरंगाई आणि खर्चवाढ ही चिंतेची बाब असून, जबाबदार अधिकाऱ्यांसह संबंधित ठेकेदाराची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

### प्रकल्पाबाबत साशंक

या प्रकल्पाच्या उपयुक्ततेवरही आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रेवस-करंजा सागरी पूल पूर्ण झाल्यानंतर वाहनधारकांना अवघ्या दहा मिनिटांत हा प्रवास रस्तेमार्गे करता येणार आहे. अशा परिस्थितीत वाहन रो-रो जहाजावर चढवणे, समुद्रमार्गे प्रवास करणे आणि दुसऱ्या बाजूला वाहन उतरवणे यासाठी अधिक वेळ लागणार असल्याने भविष्यात या रो-रो सेवेला अपेक्षित प्रतिसाद मिळेल का, याबाबत तज्ज्ञांसह स्थानिक नागरिकही साशंक आहेत.

# निवडक



## दहिवली पुलाच्या दुरुस्तीची मागणी

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील माथेरान-कर्जत राज्यमार्गावरील कळंब येथील पुलावरून यावर्षी तब्बल तीनवेळा पाणी गेले आहे. त्यामुळे पुलाचा पृष्ठभाग पुराच्या पाण्यात वाहून गेला असून, वाहनचालकांना त्या ठिकाणी वाहने चालवणे कठीण झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाचा पृष्ठभाग नव्याने डांबरीकरण करून तयार करावा, अशी मागणी केली आहे. कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर असलेल्या दहिवली मालेगाव येथील पूल कमी उंचीचा असल्याने दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरून पाणी जाण्याच्या घटना घडत असतात. हा पूल पाण्याखाली गेल्यानंतर या भागातील ३५ गावांचा संपर्क तुटतो. त्याचवेळी पुलावरून वाहतूक बंद झाल्यानंतर पर्यायी मार्गाचा अवलंब करून नेरळ रेल्वे स्टेशनवरून आता जावे लागते. यंदा आतापर्यंत तब्बल तीनवेळा उल्हास नदीवरील या पुलावरून पाणी गेल्याने पुलावरील डांबरी पृष्ठभाग वाहून गेला आहे. त्याचवेळी पुलाच्या कठड्यांना लावलेल्या लोखंडी सलाई देखील तुटल्या आहेत. तर, काही ठिकाणी महापुरात वाहून आलेली झाडे आणि पालापाचोळा अडकल्याने मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ पावसाची उघडीप पाहून पुलाचा पृष्ठभाग नव्याने डांबरीकरण करण्याची मागणी वाहनचालक यांच्याकडून करण्यात येत आहे.




## बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**नेरळ :** नेरळ पोलीस ठाणे पथकाने मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत रायगड जिल्ह्यातील चार आणि नवी मुंबईतील एक असे एकूण पाच गुन्हे उघडकीस आले असून, चोरीस गेलेल्या सुमारे ४.७८ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नेरळ पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. रबीउलइस्लाम तामजुइस्लाम शेख (४५) याला अटक करण्यात आली. चौकशीत त्याने साथीदारांच्या मदतीने रायगड व नवी मुंबई परिसरात मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर सोनू, आवेस, चिनीदादा व वृषभ धनराज जैन यांचा समावेश असल्याचे उघडकीस आले. या टोळीने नेरळ, खालापूर, पेण तसेच नवी मुंबई परिसरातील मोबाईल टॉवरमधून बॅटऱ्या चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपींकडून १४४ बॅटऱ्या फोडून त्यामधील सुमारे १८०० किलो वजनाचे शिसे जप्त केले. तसेच, गुन्ह्यात वापरलेले वाहनही ताब्यात घेतले आहे.

## ढिसाळ कारभारामुळे विजेचा अपव्यय

**श्रीवर्धन :** ऊर्जेची बचत करणे ही काळाची गरज असतानाच श्रीवर्धन नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारामुळे शहरात मात्र विजेचा मोठा अपव्यय होत असल्याचे चित्र दिसत आहे.



शहरातील मुख्य रस्त्यांवर पथदिवे दिवसात ही सुरूच राहत असल्याचे समोर आले आहे. या बेजबाबदारपणामुळे रोज हजारो युनिट विजेची उधळपट्टी होत असून, नगरपरिषदेच्या तिजोरीवर आणि अनुषंगाने करदात्या नागरिकांच्या खिशावर नाहक आर्थिक बोजा पडत आहे.एकीकडे सर्वसामान्यांना वीज बचतीचे धडे दिले जातात, तर दुसरीकडे प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे सार्वजनिक मालमत्तेची अशी उघडउघड नासाडी सुरू आहे. स्वयंचलित टाइमर सिस्टीममधील बिघाड किंवा कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा याला कारणीभूत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यासंदर्भात नागरिकांनी तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. नगरपरिषद प्रशासनाने या प्रकरणी लक्ष देऊन विजेची होणारी ही उधळपट्टी थांबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आजीवलीतील १९ वर्षीय तरुणी बेपत्ता

**नवीन पनवेल :** आजीवली येथील १९ वर्षीय नाजमा अलीम खलिफा ही तरुणी राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता निघून



गेल्याने ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिचा रंग काळा सावळा, उंची चार फूट दोन इंच, नाक बसलेले आणि डाव्या नाकात नथ आहे. तिचा चेहरा गोलाकार असून अंगावरील कपडे पिवळ्या रंगाचे सलवार कमीज परिधान केलेले आहेत. तिला हिंदी आणि मराठी भाषा बोलता येते. या तरुणी बाबत अधिक माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अग्निशमन केंद्रातील कर्मचारीच असुरक्षित

■ स्लॅब कोसळून महिला जखमी

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

नागरिकांचे तसेच प्राणीमात्रांचे प्राण वाचवण्यासाठी स्वतः चा जीव धोक्यात घालणारे पनवेल महानगरपालिकेचे नवीन पनवेल येथील अग्निशमन दलाचे अधिकारी व कर्मचारीच आज स्वतःच असुरक्षित वातावरणात काम करत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. सुमारे पंधरा दिवसांपूर्वी अग्निशमन केंद्राच्या इमारतीतील स्लॅबचा भाग अचानक कोसळून महिला कर्मचारी सोनल गेगजे यांच्या खांद्यावर पडला. या दुर्घटनेत त्यांच्या खांद्याला व हाताला गंभीर दुखापत झाली.



● (छायाचित्र : राजेश डांगळे)

या घटनेनंतरही संबंधित इमारतीची स्थिती अत्यंत धोकादायक असल्याचा आरोप कर्मचारी वर्गातून केला जात आहे. इमारतीच्या भिंती ओलाव्यामुळे कमकुवत झाल्या असून, छताचा स्लॅब ठिकठिकाणी तडकला आहे. लोखंडी सळ्या उघड्या पडल्या असून, खांबांना मोठमोठे तडे गेले आहेत. प्रवेशद्वाराचे गेटही मोडकळीस आले आहे. कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अग्निशमन विभागाने याबाबत पनवेल महापालिकेच्या बांधकाम विभागाला वारंवार माहिती दिली आहे. अधिकारी पाहणी करून गेले असले, तरी अद्याप कोणतीही ठोस दुरुस्ती किंवा पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नसल्याची नाराजी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# माणगावात लोकशाहीचा श्वास कोंडला

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील ग्रामस्थांच्या हक्काच्या आणि लोकशाहीच्या पायाभूत व्यासपीठ असलेल्या आमसभेला गेल्या दहा वर्षांपासून प्रशासनाने पूर्णपणे विस्मरणात टाकल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. सन २०१६ मध्ये कुणबी समाज हॉल येथे शेवटची आमसभा पार पडली होती; त्यानंतर आजतागायत ही महत्त्वाची बैठक एकदाही आयोजित करण्यात आलेली नाही. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना वाचा फोडण्याचे व्यासपीठच हिरावले गेले असून, प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे स्थानिक लोकशाही प्रक्रियेला जबर धक्का बसला आहे. त्यामुळे माणगाव तालुक्यातलोकशाहीचाश्वासकोंडला गेल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून बोलताना व्यक्त होत आहेत. आमसभा ही केवळ एक औपचारिक बैठक नसून नागरिकांना शासनाच्या निर्णय प्रक्रियेत थेट सहभागी करून घेणारे प्रभावी लोकशाही व्यासपीठ आहे. गावाच्या विकासाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय याच व्यासपीठावरून नागरिकांच्या सहभागातून घेतले जात असल्याने आमसभेला ''तालुक्याची संसद'' असे संबोधले जायचे. मात्र, गेल्या दहा वर्षांत ही प्रक्रियाच ठप्प असल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. लोकशाही तळागाळापर्यंत पोहोचवणारे हे महत्त्वाचे व्यासपीठ पुन्हा कार्यान्वित करावे आणि प्रलंबित आमसभा तातडीने आयोजित करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# पंचायत समितीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चाणजे ग्रुप ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण आता केवळ एका ग्रामपंचायतीपुरते मर्यादित राहिले नसून, संपूर्ण पंचायत राज व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरले आहे. घरपट्टी आणि पाणीपट्टीच्या वसुलीतील तब्बल १ कोटी २४ लाख १९ हजार ४४० रुपयांच्या व्यवहारांवर पंचायत समिती खालापूरच्या दुसरी तपासणी अहवालाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र, या अहवालानंतरही एका ग्रामसेवकावरच गुन्हा दाखल करून इतर संबंधितांना अभय देण्यामागे नेमके कोणते 'अदृश्य हात' कार्यरत आहेत? अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, या कथित गैरव्यवहाराचा पर्दाफाश करण्यासाठी पत्रकार घन:श्याम कडू यांनी जवळपास दोन ते तीन वर्षे सातत्याने पाठपुरावा केला. १४ जानेवारी २०२५ रोजी त्यांनी चाणजे ग्रुप ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार आणि वरिष्ठ कार्यालयाची दिशाभूल केल्याप्रकरणी लेखी तक्रार दाखल केली. मात्र, तक्रारदाराच्या आरोपानुसार, उरण पंचायत समितीचे तत्कालीन गटविकास अधिकारी समीर वठारकर आणि ग्रामविस्तार अधिकारी विनोद मिंडे यांनी कोणतीही सखोल चौकशी न करता तक्रार निकाली काढली. त्यामुळे हा निष्काळजीपणा होता की दोषींना संरक्षण देण्याचा प्रयत्न? असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

# सिडकोच्या अतिक्रमण कारवाईला विरोध



| उरण | प्रतिनिधी |

केगावयेथीलघरांवरअतिक्रमण कारवाई करण्यासाठी सिडकोच्या अतिक्रमण विभागाने बुधवारी मोठा फौजफाटा, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह धडक दिली. मात्र, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे तीव्र विरोध दर्शविल्याने सिडकोच्या पथकाला कोणतीही कारवाई न करताच माघारी फिरावे लागले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे, उपनगराध्यक्ष रवी भोईर, नितीन पाटील, कमळाकर तांबोळी, राजेंद्र ठाकूर, पराग काठे, चिंतामण पाटील, सुनील नाईक, जगजीवन नाईक, महेश तांबोळी, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना कारवाईचा आधार, नोटीस आणि संबंधित कागदपत्रांची माहिती विचारत कारवाईला तीव्र विरोध केला. यावेळी सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी रजपूत यांनी भारतीय नौदलाकडून (नेव्ही) तक्रार प्राप्त झाल्याने कारवाईसाठी आल्याची माहिती सभापती महेश म्हात्रे यांना दिली. त्यानंतर म्हात्रे यांनी तहसीलदारांच्या उपस्थितीत सिडको, नेव्ही, महसूल विभाग, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ यांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करून सर्व बाजू ऐकूनच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. ग्रामस्थांचा विरोध वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर सिडकोच्या पथकाला माघार घ्यावी लागली. त्यानंतर ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनी थेट उरण पंचायत समिती गाठून गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील आणि ग्रामविस्तार अधिकारी विनोद मिंडे यांना जाब विचारला. मात्र, या कारवाईची कोणतीही पूर्वकल्पना नसल्याचे सांगत गटविकास अधिकाऱ्यांनी हात वर केले. तसेच, वरिष्ठ स्तरावर कोणता निर्णय झाला आहे, याचीही माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# सीमाशुल्क विभागाकडून कारवाईचा बडगा

| उरण | प्रतिनिधी |

जेएनपीएपरिसरातीललॉजिस्टिक क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. द्रोणागिरी येथील डीआरटी-कॉन्कोर कंटेनर फ्रेट स्टेशन मधील गंभीर सुरक्षा त्रुटी आणि निर्यातीच्या मालाच्या चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेत जवाहरलाल नेहरू सीमाशुल्क आयुक्तालयाने या सीएफएसची मान्यता तत्काळ प्रभावाने निलंबित केली आहे. या निर्णयामुळे आयात-निर्यात क्षेत्रात खळबळ उडाली असून, जेएनपीएच्या लॉजिस्टिक साखळीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, द्रोणागिरी रेल्वे-लिंक्ड डीआरटी-कॉन्कोर सीएफएस हे दरमहा सुमारे १४ हजार टीईयू कंटेनर हाताळणारे महत्त्वाचे केंद्र आहे. जेएनपीएमार्गे होणाऱ्या आयात-निर्यात व्यवहारात या सीएफएसची महत्त्वाची भूमिका आहे. सीमाशुल्क विभागाने यापूर्वी सीमाशुल्क क्षेत्रांमधील माल हाताळणीविषयक नियम अंतर्गत सर्व कंटेनर फ्रेट स्टेशन, आयसीडी आणि लॉजिस्टिक सेवा प्रदात्यांना सुरक्षा यंत्रणा मजबूत करण्याच्या तसेच सीमाशुल्क नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याचे तपासात आढळले. विशेषतः डीआरटी-कॉन्कोर सीएफएसमध्ये सुरक्षेतील गंभीर त्रुटी कायम असल्याचे तसेच निर्यातीच्या मालाच्या चोरीच्या घटना घडल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सीमाशुल्क विभागाने कठोर भूमिका घेत २२ जुलै रोजी परवाना निलंबित करण्याचे आदेश जारी केले. या आदेशानुसार, २२ जुलैपूर्वी सीएफएसमध्ये दाखल झालेल्या आयात व निर्यात मालाची आवश्यक सीमाशुल्क प्रक्रिया पूर्ण करून क्लिअरन्स अथवा विल्हेवाट लावण्यास परवानगी देण्यात आली आहे. मात्र, तत्काळ प्रभावाने कोणताही नवीन आयात-निर्यात माल स्वीकारण्यास पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. सीमाशुल्क विभागाने २३ जुलै रोजी मध्यरात्रीपूर्वी ज्यांचे 'शिपिंग बिल' अथवा 'बिल ऑफ एंट्री' दाखल झाले असून, अंतिम गंतव्यस्थान म्हणून डीआरटी-कॉन्कोर सीएफएस नमूद आहे, अशाच मालाला सीएफएसमध्ये प्रवेश दिला जाणार आहे.


● (छायाचित्र : गणेश म्हाप्रळकर)

# मेंदडी गावच्या रस्त्याची दुरवस्था

| आंबेत | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यातील मेंदडी गावच्या मुख्य रस्त्याची पार दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, ग्रामस्थ आणि वाहन चालकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मेंदडी येथील गावकऱ्यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला, तरी संबंधित प्रशासनाकडून लक्ष दिले जात नसल्याने ग्रामस्थांनी रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करीत शासनाचा निषेध केला. तसेच, पुढील पाच दिवसांत रस्त्याच्या डागडुजीचे काम न झाल्यास तीव्र उपोषण करू, असा थेट इशारा देखील ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.

मेंदडी हे मंत्री अदिती तटकरे यांच्या मतदार संघातील गाव असून, गावच्या मुख्य प्रवेश द्वारावर अनेक मोठमोठाले खड्डे पडले आहेत. एसटी, मिनिडोअर, छोटी मोठी वाहने, मोटारसायकल यांना या रस्त्यावरून सद्यस्थिती मध्ये तारेवरची कसरत करावी लागत आहे. लवकरात लवकर या रस्त्याचे काम मार्गी लावण्याकरिता सातत्याने पाठपुरावा करूनही अद्याप जैसे थेच परिस्थितीत हा रस्ता दिसून येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्याला पुढील पाच वर्षे काहीच होणार नसल्याचे आश्वासन ग्रामस्थांना देण्यात आले होते. मात्र, दोन वर्षांतच रस्त्याची चाळण झाली आहे.

कर्जत NA प्लॉट विक्रीसाठी
20 गुंठे, रोड टच,
क्लिअर टायटल
बिल्डर्स आणि इन्व्हेस्टर्ससाठी योग्य पर्याय
महामार्ग आणि भिवपुरी रोड,
रेल्वे स्टेशन 300 मीटर अंतरावर.
किंमत ₹ 2.5 कोटी
CALL : 9987332177

नीट आंदोलनाला पनवेलकरांचा पाठिंबा | महानगरपालिकेच्या भूमिकेवर संताप

# पनवेलमधील वडाळे सरोवरावर तिरंगा कँडल मार्च

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट परीक्षा प्रकरणी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरदिल्ली पोलिसांकडून झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ बुधवारी (दि.२९) सायंकाळी वडाळे सरोवर येथे तिरंगा कँडल मार्च व श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र, या कार्यक्रमाला पालिकेकडून आडकाठी आणण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने पालिकेच्या भूमिकेवर संताप व्यक्त करण्यात आला.




पनवेल तालुक्यातील विविध सामाजिक संघटना व विद्यार्थी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात नीट परीक्षा प्रकरणातील कथित गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर मृत्यू पावलेल्या २२ विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, शेकाप नेते तथा माजी आमदार बाळाराम पाटील, अतुल म्हात्रे, महादेव वाघमारे, चंद्रसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आमदार बाळाराम पाटील यांनी, विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा तीव्र निषेध नोंदवत, या घटनेस जबाबदार असलेल्यांवर कारवाई करून संबंधितांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. तसेच, स्व. दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यास होणाऱ्या विलंबाचाही त्यांनी निषेध व्यक्त केला. ''देशातील विद्यार्थी जागृत झाला असून, विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्यास आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू,'' असेही ते म्हणाले.

दरम्यान, या कार्यक्रमासाठी आयोजकांनी पनवेल पालिकेकडे पूर्वपरवानगीसाठी अर्ज केला होता. मात्र, कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी परवानगी नाकारल्याचे पत्र देण्यात आले. तसेच, उभारण्यात आलेले व्यासपीठ महाराष्ट्र राज्य सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांकडून थांबविण्यात आल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच, वडाळे सरोवर परिसरातील हायमास्ट दिवा शॉर्टसर्किटमुळे बंद असल्याचे सुरक्षा रक्षकांनी सांगितले होते. मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर रात्री सुमारे पावणेआठच्या सुमारास तो सुरू करण्यात आल्याने उपस्थित नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यामुळे श्रद्धांजली कार्यक्रमाला विरोध होणे योग्य नसल्याची भावना अनेक ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली.

# भटारखान्यातले सत्य

बातमी खरे तर हीच आहे की, तुकाराम मुंढे अजूनही अन्न आणि औषध प्रशासनामध्ये आहेत. दुधाच्या भेसळीबद्दल डेअरीवाल्यांमध्ये दहशत निर्माण केल्यानंतर आता त्यांनी हॉटेल्सविरुध्द कारवाईचा धडाका लावला आहे. मुंढे यांच्यासारख्या धडाकेबाज अधिकारी, सरकारातले मंत्री किंवा न्यायालयांमधले काही प्रसिध्दीची आस असलेले न्यायाधीश यांचा एक ठराविक पैटर्न असतो. ते नामांकित मंडळींना धक्का देतात. खैरनार नावाचे एक उपायुक्त मुंबई महापालिकेत होते. त्यांनी वेचून वेचून दाऊद इब्राहिमच्या बेकायदा बांधकामांवर हातोडा चालवला. त्यामुळे ते राज्यातच नव्हे तर भारतभर प्रसिध्द झाले होते. त्यानुसार मुंढे हे नामांकित हॉटेलांवर कारवाई करीत आहेत. मुंबईतील पारसी डेअरी, रुस्तमजी आईस्क्रीम, शालिमार, पौर्णिमा उडुपी वगैरेंवर बडगा उगारला गेला. क्रिकेट क्लब ऑफ इंडिया किंवा विलिंग्डन हे मुंबईतल्या अब्जाधीशांचे व सेलिब्रिटींचे आवडते क्लब आहेत. यांचे खाद्य परवाने रद्द केले गेले. याचा अर्थातच मोठा गवगवा झाला. मात्र ठराविक लोकांनाच लक्ष्य करून हे सर्व घडते आहे की काय अशी शंका खुद्द उच्च न्यायालयालाही बुधवारी आली. त्यामुळे त्यांनी मुंढेंच्या अन्न व औषध प्रशासनाला चार गोष्टी सुनावल्या. सरकारी कार्यालयातील कँटिन्स, उच्च न्यायालय व इतर ठिकाणची कँटिन्स, राजकारण्यांच्या मालकीची हॉटेल्स यामध्ये मुंढेंच्या अधिकाऱ्यांनी तपासणी करावी अशा सूचना न्यायमूर्तींनी दिल्या. यापूर्वी मुंबई महापालिकेचे कँटिन बंद करण्यात आले आहे ही गोष्ट खरी. पण बाकीची कँटिन्स बाकी आहेत. पण अशी कारवाई हा इतरांसाठी धडा असतो हे ध्यानात ठेवायला हवे. अन्न आणि औषध प्रशासनाकडे माणसे मर्यादित आहेत. तपासणी करणाऱ्यांच्या जागा भरलेल्या नाहीत. त्यामुळेच नामांकित हॉटेल्सवर कारवाई केली की बाकीचे सर्वजण आपापल्या भटारखान्यांमध्ये सुधारणा करतील अशी ही रचना आहे. किमान तशी अपेक्षा आहे. शिवाय धाडी घातल्या तरच आम्ही सुधारू ही मानसिकता योग्य नाही. सरकारने नियम केलेले आहेत. जिथे हजारो माणसे जेवतात तिथले स्वच्छता असावी हा सगळ्यांच्याच भल्याचा नियम आहे. त्याचा उपयोग सर्वांसाठी आहे. त्यामुळे या कँटिन वा हॉटेलांच्या चालकांनी स्वतःहूनच हे उपाय करणे गरजेचे आहे.

## स्वच्छतेची चैन

अर्थात याला दुसरी बाजूही आहे. तिचाही न्यायालयाने उल्लेख केला. ते म्हणाले की, आपण भारतामध्ये राहतो हे लक्षात ठेवून व वास्तवाचे भान बाळगून अशा कारवाया केल्या जायला हव्यात. घरात एकही मुंगी, एकही पाल किंवा झुरळ दिसतासुध्दा कामा नये ही युरोपीय मानसिकता आहे. भारतातल्या घरांमध्ये असे कीटक सुखनैव वावरत असतात. असे प्राणी आजूबाजूला असतानाही भांडी किंवा पदार्थ कसे स्वच्छ ठेवायचे हे भारतातल्या गृहिणींना ठाऊक असते. चांगल्या हॉटेल्समध्ये शक्य तितक्या प्रमाणात याच रीतीने काळजी घेतली जात असते. अर्थात, तिथले पदार्थ केले जायचे प्रमाण, माणसांचा वावर व एकूण धबडगा प्रचंड असतो. त्यातच स्पर्धा व इतर कारणांमुळे अनेक हॉटेल्स सकाळी सात वाजल्यापासून रात्री दहा अकरापर्यंत चालवली जातात. त्यामध्ये स्वच्छतेला खूपच कमी अवसर असतो. माणसांची कमी असते. पाणी उपलब्ध असतेच असे नाही. तेल वगैरेंच्या वापराने स्वयंपाकघरे काळी झालेली असू शकतात. मुंढे यांनी कारवाई करताना झुरळे, पाली इत्यादींचा वावर, स्वयंपाकघरे साफ नसणे यावर भर दिला आहे. ते करताना भारतातल्या वास्तवाचाही त्यांना विचार करावा लागेल. अस्वच्छतेचा विचार केला तर मुंबईतील ९५ टक्के उघड्यावर खाद्यपदार्थ विकणारे स्टॉल्स घाणेरडे असल्याचे दिसेल. ते बंद करावे लागतील. त्यामध्ये वापरले जाणारे पाणी, प्लेट्स वगैरे विसळण्याची व्यवस्था हे सर्व निव्वळ भयंकर असते. तरीही लोक इथे नाइलाजाने खात असतात. हॉटेलांमध्ये हे थोडे अधिक चांगले असते. शिवाय तिथली स्वयंपाकघरे म्हणजे दृष्टिआडची सृष्टी असते. ती पाहिली तर माणसे पुन्हा तिथे जेवणार नाहीत अशी स्थिती असते. पण मुंबईसारख्या शहरांमध्ये बहुसंख्य लोकांना कामधंद्यासाठी रोज बाहेर जावे आणि खावे लागते. त्यांना स्वच्छतेचे फार स्तोम माजवून चालत नाही. समजा या सर्व स्टॉल्स व हॉटेलांनी स्वच्छतेबाबत काटेकोर नियमानुसार चालायचे ठरवले तर माणसांचा, पाण्याचा, पदार्थांचा खर्च इतका वाढेल की त्यांना कदाचित साधा वडापाव शंभर रुपयांना विकावा लागेल. इथे खाणाऱ्यांनीही हे ठाऊक असते. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करून उभयपक्षी सोईचा असा हा व्यवहार चालू असतो.

## कारवाई अनाठायी नाही

मुंढे यांनी नियमाकडे बोट दाखवणे योग्यच आहे. पण या प्रश्नाची ही दुसरी बाजू लक्षात घेऊन काय करता येईल हेही पाहायला हवे. दुसरे म्हणजे अन्न व औषध प्रशासनाकडून अशा धाडी घालण्याऐवजी हॉटेलांची नियमित तपासणी करणे व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे अधिक हिताचे राहील. अर्थात, मुंढे यांची सर्वच कारवाई अनाठायी आहे असे अजिबात नाही. उलट या कारवाईचा जो तपशील बाहेर आला आहे त्यामुळे भल्या भल्या हॉटेलांचे नाव मोठे लक्षण खोटे असा प्रकार आहे. बुरशी आलेल्या भाज्या व अन्न तसेच फ्रीजमध्ये साठवून ठेवले आहे, उंदीर, घुशी खुलेआम फिरत आहेत, सांडपाण्याचा निचरा नीट होत नाही, पिण्याच्या पाण्याचा दर्जा खराब आहे, भटारखान्यातील आचाऱ्यांचे लसीकरण नीट झालेले नाही, परिणामी त्यांच्यामुळे इतरांना रोग होण्याची शक्यता आहे अशा गोष्टी मुंढे यांना आढळल्या. वर म्हटल्याप्रमाणे मुंबईतीलच नव्हे तर पुण्यातील मथुरासारखे अत्यंत प्रसिध्द हॉटेलही या दणक्यात दोषी सापडले. या सर्वांमध्ये सुधारणा व्हायलाच हवी. यापैकी बहुसंख्य ठिकाणी ग्राहक जे पैसे मोजतात ते केवळ बाहेरच्या चमकदार इंटिरियरसाठीचे नसतात. तर भटारखान्यातही किमान बरी स्वच्छता पाळली जात असेल या समजुतीचेही असतात. पण तिथे त्यांची फसवणूक होत असेल तर तिला आळा घालायलाच हवा. या निमित्ताने एकूणच भारतात मिळणारे बाहेरचे खाणे व त्यांची चव व दर्जा यांचा विचार व्हायला हवा. रेल्वे प्रवासांमध्ये बहुसंख्य ठिकाणी रेल्वेत मिळणारे अन्न हे अत्यंत घाणेरडे असते. एसटी कँटिन वगैरेंबद्दल तर बोलण्याचीही सोय नाही. पूर्वी लोक हॉटेलातील पाणी सर्रास पीत असत. आता त्याबद्दल भरवसा राहिलेला नाही. हॉटेलवाल्यांनाही बाटलीबंद पाणी विकण्यातून भरपूर नफा कमावता येतो. मुंढे यांनी आता शाळांजवळ जंक फूड विकण्यावर बंदी घातली आहे. त्याच रीतीने मोठ्यांसाठीच्या हॉटेलांमध्येही जंक फूड, पंजाबी व चायनीजच्या नावाखाली दिले जाणारे सत्वहीन पण मसालेदार अन्न यावरही निर्बंध घालण्याची गरज आहे. अर्थात, हे सर्व एकटे मुंढे किंवा सरकार करू शकत नाही. यासाठी लोकांमध्ये जागृती होण्याची गरज आहे. शिवाय चांगले व सकस अन्न हे कदाचित किमतीच्या दृष्टीने महाग होण्याची शक्यता आहे. बहुसंख्य लोकांना ते परवडणार नाही याचाही विचार करावा लागेल. पण एकूणच हा प्रश्न केवळ हॉटेलांच्या अस्वच्छतेचा वा काही जणांवर कारवाईचा नाही. त्यात दोन्ही बाजूंचा विचार हवा. पण आता याबाबत समाज व सरकारने काहीतरी निर्णायक करण्याची वेळ मात्र नक्कीच आलेली आहे.

---

**। विचार**

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

*अलिकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि युपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.*




**डॉ. दीपक शिकारपूर**

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि युपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला युपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. युपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच युपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील युपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील युपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर युपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएमम धून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर युपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.

ग्रामीण भारतासाठीही ही सुविधा अत्यंत महत्त्वाची आहे. आज देशातील लाखो नागरिक युपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्म विश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित युपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्डे सांभाळावी लागत. आता एकाच युपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात. त्यामुळे कार्डांचे व्यवस्थापन, नूतनीकरण आणि सुरक्षितता याबाबतच्या चिंता कमी होतात. या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पर्यावरण संवर्धन. दरवर्षी कोट्यवधी प्लास्टिक डेबिट आणि क्रेडिट कार्डे तयार केली जातात. त्यासाठी प्लास्टिक, रसायने आणि वाहतुकीचा मोठा खर्च होतो. कार्डांचा वापर कमी झाल्यास प्लास्टिक कचऱ्यात घट होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व युपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन युपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. युपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील. एखाद्या दिवशी ग्राहकाला एटीएमसमोर उभे राहून आपल्या मातृभाषेत सूचना ऐकून किंवा बोलून व्यवहार पूर्ण करता येईल. अशा प्रकारे तंत्रज्ञान अधिक मानवी आणि सर्वसमावेशक बनत जाईल. तथापि, या सुविधेचा वापर करताना काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. मोबाईल सुरक्षित ठेवणे, युपीआय पासवर्ड कोणालाही न सांगणे, अनोळखी व्यक्तींच्या मदतीवर अवलंबून न राहणे आणि व्यवहार पूर्ण झाल्यानंतर सूचना तपासणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तंत्रज्ञान जितके प्रगत होते तितकी जागरूकताही आवश्यक असते. एकंदरीत पाहता, कार्डलेस एटीएम ही केवळ पैसे काढण्याची नवी पद्धत नाही, तर भारताच्या डिजिटल परिवर्तनाचे प्रभावी प्रतीक आहे. यामुळे बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित, सुलभ, पर्यावरणपूरक आणि सर्वसमावेशक होत आहेत. जगाला डिजिटल पेमेंटची दिशा दाखवणाऱ्या भारताने आता रोख रक्कम वितरणाच्या क्षेत्रातही नवा मानदंड निर्माण केला आहे. डिजिटल भारताच्या प्रवासात कार्डलेस एटीएम हे सामान्य नागरिकाला तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी आणणारे पाऊल असून आर्थिक सक्षमीकरणाला नवी गती देते. आगामी काळात ही सुविधा भारतातील प्रत्येक गाव, प्रत्येक शहर आणि प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनेल, यात कोणतीही शंका नाही.

**(लेखक उद्योजक व संगणक**

---

# डायरिया, डिहायड्रेशन आणि ओ.आर.एस.

**डॉ. राजेंद्र चांदोरकर**

डायरिया अर्थात अतिसार हा लहान मुलांमध्ये सर्रासपणे आढळणारा आजार आहे. विशेषतः पाच वर्षांखालील मुलांमध्ये तो अधिक प्रमाणात दिसून येतो. सतत जुलाब झाल्यामुळे शरीरातील पाणी आणि क्षार कमी होतात. परिणामी डिहायड्रेशन अर्थात निर्जलीकरण होते. योग्य वेळी उपचार न मिळाल्यास मुलांना अतिशय अशक्तपणा येऊन प्रसंगी जीवही गमवावा लागू शकतो.

दिवसभरामध्ये तीन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा पातळ शौचास होणे याला अतिसार असे म्हणता येते. मुख्यतः जंतुसंसर्गामुळे होणाऱ्या या आजारामध्ये विषाणू, जिवाणू तसेच अमिबासारखे सूक्ष्मजंतू कारणीभूत ठरू शकतात. लहान मुलांच्या शरीरात पाण्याचे प्रमाण तुलनेने कमी असल्याने त्यांचे निर्जलीकरण अगदी कमी कालावधीत होऊ शकते. जंतुसंसर्गामुळे होणाऱ्या अतिसारामध्ये विषाणूजन्य अतिसार अधिक प्रमाणात आढळतो. पावसाळा सुरू झाला की विषाणूजन्य आजारांच्या, विशेषतः व्हायरल गॅस्ट्रोएन्ट्रायटिसच्या, साथी अधिक प्रमाणात दिसून येतात. व्हायरल गॅस्ट्रोएन्ट्रायटिस म्हणजेच विषाणूजन्य अतिसार हा प्रामुख्याने दूषित अन्न किंवा पाणी सेवन केल्यामुळे होऊ शकतो. त्यामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीस त्याचे प्रमाण वाढताना दिसते. हल्ली मुलांना घरच्या ताज्या अन्नापेक्षा बाहेरील हॉटेल, बेकरी, दुकानांमधील पदार्थ खाण्याची सवय वाढली आहे. बाहेरील अन्नपदार्थ तयार करताना स्वच्छतेची योग्य काळजी घेतली गेली नाही, तर त्यातून जंतुसंसर्ग होऊन मुलांना अतिसार होण्याची शक्यता वाढते. मुलांनी स्वतःच्या स्वच्छतेची योग्य काळजी न घेतल्यामुळेही हा आजार होऊ शकतो. जेवणापूर्वी आणि शौचास जाऊन आल्यानंतर हात स्वच्छ धुणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अगदी लहान बाळांना बाटलीने दूध देताना बाटली आणि तिच्या निप्पलची स्वच्छता योग्य प्रकारे न राखल्यासही संसर्गाचा धोका वाढू शकतो.

**निर्जलीकरणाची लक्षणे कोणती?**

अतिसारामुळे शरीरातील पाणी कमी झाल्यावर मुलांना थकवा जाणवतो, झोप येते, मूल मलूल दिसते, लघवीचे प्रमाण कमी होते, श्वासोच्छवासाचा वेग वाढतो आणि हृदयाचे ठोके वाढू शकतात. त्वचा आणि डोळे निस्तेज दिसू शकतात. निर्जलीकरण अधिक तीव्र झाल्यास मेंदू आणि हृदयावर गंभीर परिणाम होऊ शकतात. प्रसंगी मुलांना झटके येऊ शकतात किंवा रक्तदाब खूप कमी होऊन हायपोव्होलेमिक शॉकची अवस्था निर्माण होऊ शकते. अशा वेळी उपचार करणे अधिक अवघड होते.

**ओ.आर.एस. म्हणजे जलसंजीवनी**

निर्जलीकरण सौम्य किंवा मध्यम स्वरूपाचे असताना ओ.आर.एस. Oral Rehydration Solution हा उपचाराचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. बरीचशी मुले योग्य प्रमाणात ओ.आर.एस. दिल्याने निर्जलीकरणातून बरी होतात. ओ.आर.एस. देण्यास उशीर झाला किंवा मुलाला ओ.आर.एस. तोंडाने घेता येत नसेल, तसेच निर्जलीकरण तीव्र झाले असेल, तर डॉक्टरांच्या सल्ल्याने रुग्णालयात शिरेतून द्रव (सलाईन) देण्याची गरज भासू शकते. अतिसारावरील ओरल रिहायड्रेशन थेरपी () मध्ये ओ.आर.एस.चा वापर केला जातो. ओ.आर.एस.च्या पाकिटावरील सूचनांनुसार योग्य प्रमाणात स्वच्छ पाण्यात ते मिसळून मुलाला थोडे-थोडे आणि वारंवार पाजावे. अतिसारामुळे झालेल्या निर्जलीकरणावर ओ.आर.एस. प्रभावीपणे शरीरातील पाणी आणि क्षारांची भरपाई करते; म्हणूनच त्याला 'जलसंजीवनी' असे म्हणणे योग्य ठरेल.

**घरी ओ.आर.एस. उपलब्ध नसेल तर?**

अतिसार अचानक सुरू झाला आणि त्या क्षणी ओ.आर.एस. उपलब्ध नसेल, तर तात्पुरत्या स्वरूपात घरच्या घरी द्रावण तयार करता येते. एक लिटर स्वच्छ पाण्यात ६ सपाट चमचे साखर आणि अर्धा सपाट चमचा मीठ मिसळावे. हे द्रावण मुलाला थोडे-थोडे करून द्यावे.

यासोबत भाताची पेज, ताक, सूप इत्यादी द्रव पदार्थ देता येतात. मुलाला वरण-भात, खिचडी, दही-भात यांसारखा सहज पचणारा नियमित आहार देणेही सुरू ठेवावे. एक वर्षाच्या आतील बाळांना अतिसार झाला तरी स्तनपान सुरू ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा? मुलाला ग्लानी येत असेल, ते काही खात-पित नसेल, लघवीचे प्रमाण कमी झाले असेल, वारंवार उलट्या होत असतील, खूप ताप असेल किंवा निर्जलीकरणाची लक्षणे दिसत असतील, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

**अतिसार टाळण्यासाठी काय काळजी घ्यावी?**

अतिसार होऊ नये यासाठी काही साध्या पण महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेता येते:

* जेवणापूर्वी आणि शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे.
* घरात अन्न बनवताना स्वच्छतेची योग्य काळजी घेणे.
* मुलांना ताजे आणि स्वच्छ अन्न देणे.
* शिळे किंवा अस्वच्छ अन्न टाळणे.
* बाहेरील जंक फूडचे सेवन शक्यतो टाळणे.
* लहान मुलांना बाटलीने दूध देण्याऐवजी शक्यतो कप किंवा वाटी-चमच्याचा वापर करणे.
* बाळाला पहिल्या सहा महिन्यांमध्ये शक्यतो केवळ स्तनपान देणे.
* मुलांचे नियमित लसीकरण वेळेवर करून घेणे.

रोटाव्हायरसविरुद्धची लस अतिसाराच्या गंभीर आजारापासून संरक्षण करण्यासाठी महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे मुलांच्या वयानुसार आवश्यक असलेले इतर लसीकरणही वेळेवर करून घेणे गरजेचे आहे.

मुलांना स्वच्छ पाणी, ताजे व पौष्टिक घरगुती अन्न, योग्य वैयक्तिक स्वच्छता आणि वेळेवर लसीकरण मिळाले, तर अतिसारासारख्या आजारांचा धोका नक्कीच कमी करता येतो. लहान बाळांना पहिल्या सहा महिन्यांपर्यंत केवळ स्तनपान देणे, रोटाव्हायरसविरुद्धची लस वेळेवर देणे, बाटलीचा वापर टाळणे, स्वच्छतेची काळजी घेणे आणि आजाराची लक्षणे दिसल्यास योग्य वेळी डॉक्टरांचा सल्ला घेणे या सर्व गोष्टींचे पालन केल्यास डायरिया आणि डिहायड्रेशनमुळे होणारे गंभीर आजार आणि मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकते.सध्या इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स यांच्या वतीने ओ.आर.एस. सप्ताह साजरा केला जात आहे. त्यानिमित्ताने हा लेख.

यावर्षीची संकल्पना आहे : थोडक्यात सांगायचे झाले तर

अतिसारामध्ये निर्जलीकरण टाळण्यासाठी ओ.आर. एस. हीच खरी जलसंजीवनी आहे.

---

**लोकसंसद**

## छत्रपती शिवरायांचा कायदा हवा

सद्या देशांमध्ये महिलांवर, मुलींवर लैंगिक छळाच्या घटनांमध्ये वाढचं होताना दिसत आहे आजच्या घडीला सरकार अशा घटनांचा बीमोड करण्यासाठी हरतऱ्हेणे प्रयत्न करत आहे पण त्याला आजूनही यश आल्याचे दिसून येत नाही जेवढे कायदे कडक आहेत तेवढ्या पळवाटाही आहेत तसेच कायद्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे होताना दिसत नाही महिला अथवा मुलींच्यावर जे अत्याचार करणारे किंवा यासारख्या घटनेतील गुन्हेगार आहेत ते या गुन्ह्यांमधून सहीसलामत सुटून उजळ माथ्याने समाजामध्ये फिरतात त्यामुळे पुन्हा त्यांना असे गुन्हे करण्यास वाव मिळतो, गुन्हेगारांना कायद्यांची भीतीचं उरलेली नाही लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये महिला अथवा मुली आपले नांव बदनाम होईल, इज्जत जाईल या भितीपोटी घडलेला प्रकार घरच्यांना किंवा पोलिसांना सांगण्याच्या भानगडीत पडत नाहीत त्यामुळेच अशा गुन्हेगारांचे फावते आज अनेक प्रकारे महिलांना, मुलींना आमिष दाखवणे, बळजबरी करणे,धमकावणे,फसविणे, गुंगीचे पदार्थ देवून मोबाईलवर चित्रफित बनवून सार्वजनिक अर्थात व्हायरल करणे अशा प्रकारे भिति घालून अत्याचार, लैंगिक छळ केला जातो ज्यावेळी घटना घडते त्यावेळीच त्याची जास्त चर्चा होताना दिसते काही कारवाया होतात. महिलां असो अगर मुलींवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी छत्रपती शिवरायांचा कायदा अंमलात आणावा जसे रांजाच्या पाटलाचे हातपाय छाटून त्याचा चौरंग केला तसा कायदा असावा ही एकच शिक्षा योग्य वाटते पुन्हा असे करण्यास गुन्हेगार वळणार नाहीत आणि अशा घटनांना आळा बसण्यास मदत होईल.

– राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

---

**। दिनविशेष**

# महान क्रांतिकारक सरदार उधम सिंग

जालियनवाला बाग हत्याकांडामुळे संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्धचा संताप शिगेला पोहोचला होता, विशेषत: पंजाबच्या तरुणांनी या निर्घृण हत्याकांडाचा बदला घेण्याची शपथ घेतली होती. त्यापैकी एक तरुण सरदार उधम सिंग होते.

१३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बाग हत्याकांड घडले. त्यामुळे संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्धचा रोष शिगेला पोहोचला. विशेषत: पंजाबच्या तरुणांनी आणि क्रांतीकारकांनी या निर्दयी हत्याकांडाचा बदला घेण्याची शपथ घेतली होती. यातील एक तरुण सरदार उधम सिंग हे होते. या घटनेने ते इतके संतप्त झाले की त्यांनी कर्नल रेजिनाल्ड डायर आणि पंजाबचे तत्कालीन गव्हर्नर मायकेल फ्रान्सिस ओडवायर यांना ठार मारण्याची शपथ घेतली. त्यांनी जालियनवाला बागेत निरपराध नागरिकांवर बेछुट गोळीबाराचा आदेश दिला होता. २१ वर्षांच्या प्रयत्नानंतर १९४० मध्ये मायकेल ओडवायरची हत्या करून त्यांनी शपथ पूर्ण केली. तोपर्यंत कर्नल रेजिनाल्ड डायरचा मृत्यू झाला होता. ओडवायरच्या हत्येनंतर उधम सिंग यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी स्वतःला अटक करवून घेतली. जालियनवाला हत्याकांडानंतर लोकांच्या मनातील रोषाला त्यांनी या बदल्यातून उत्तर दिलं. त्यांच्या भावाचे १९१७ मध्ये निधन झाले. यानंतर त्यांनी १९१९ मध्ये अनाथाश्रम सोडला. त्याच काळात जालियनवाला बाग हत्याकांड घडले आणि त्यातील दोषींना मारण्याचा त्यांनी संकल्प केला. त्यासाठी ते ब्रिटिश भारतीय सैन्यात मजूर म्हणून दाखल झाले आणि परदेशात गेले.

परदेश दौऱ्यात सरदार उधम सिंग अनेक देशांमध्ये गेले. फ्रँक ब्राझील, उदय सिंग, उधन सिंग आणि मोहम्मद सिंग आझाद अशी अनेक नावे त्यांनी बदलली. उधम सिंग १९२० च्या सुरुवातीस गदर चळवळीत सामील झाले. तो लंडनस्थित वर्कर्स असोसिएशनमध्येही सहभागी झाले. १९२७ मध्ये ते भारतात परत आले आणि बंदी असलेल्या साहित्यासह शस्त्रास्त्रांची त्यांनी तस्करी केली. त्या वर्षी ३० ऑगस्ट रोजी त्यांना अटक करण्यात आली आणि पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.तुरुंगातील चांगल्या वागणुकीमुळे सरदार उधम सिंग यांची एक वर्षांची शिक्षा कमी करण्यात आली. चार वर्षांची शिक्षा भोगल्यानंतर २३ ऑक्टोबर १९३१ रोजी त्यांची सुटका झाली, परंतु ते पोलिसांच्या रडारवर राहिले. तरीही त्यांनी छुप्या पद्धतीने क्रांतिकारी उपक्रम राबविले. दरम्यान, संधी मिळताच ते १९३३ मध्ये जर्मनीला गेले आणि तिथून पुन्हा लंडनला पोहोचले आणि संयमाने ती संधी शोधू लागले ज्याची ते वर्षानुवर्षे वाट पाहत होते. लंडनमध्ये ते इंडियन वर्कर्स असोसिएशनमध्ये सहभागी झाले. १३ मार्च १९४० रोजी लंडनमधील रॉयल सेंट्रल एशियन सोसायटीत ईस्ट इंडिया असोसिएशनची बैठक सुरु होती. या बैठकीत त्यांनी मायकल ओडवायरवर पाच गोळ्या झाडल्या, त्यात तो जागीच ठार झाला. जालियनवाला बाग हत्याकांड घडले, तेव्हा डायर पंजाबचा तत्कालीन लेफ्टनंट गव्हर्नर होता. जालियनवाला बाग हत्याकांडाचा आदेश देणारे रेजिनाल्ड डायरचा १९२७ मध्ये मृत्यू झाला होता. अशा प्रकारे उधमसिंहांचा संकल्प पूर्ण झाला. सरदार उधम सिंग यांच्यावर मायकल ओडवायरच्या हत्येचा खटला चालवला गेला, तुरुंगात असताना त्यांनी उपोषणही केले. त्यांना केंद्रीय फौजदारी न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली होती. त्यांनी न्यायालयात दाखल केलेले अपील फेटाळण्यात आले. ३१ जुलै १९४० रोजी भारतमातेचे वीरपुत्र उधम सिंग यांनी लंडनच्या तुरुंगात फासावर लटकवण्यात आले. फाशी दिल्यानंतर सरदार उधम सिंह यांचा मृतदेह तुरुंगात पुरण्यात आला. १९७४ मध्ये पंजाबचे तत्कालीन मुख्यमंत्री ग्यानी झैल सिंग यांनी अथक प्रयत्नांनी उधम सिंह यांचा अस्थी भारतात परत आणल्या. त्यांच्या अस्थिकलशाचे भारतात शहीद म्हणून स्वागत करण्यात आले. २ ऑगस्ट १९७४ रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आणि अनेक अस्थिकलश करण्यात आल्या.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३१ जुलै

१) श्री.विलास केशव दापके मु.वडगाव, अलिबाग, ३१-७-१९४५

२) श्री.बालकृष्ण पांडुरंग मयेकर मायेकर वाडी, अलिबाग, ३१-७-१९४५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)

९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



अपेक्षीत प्रवीण शाह, स्मरणार्थ, विद्यानगर, अलिबाग



कै. सुनीता चंद्रकांत शेट, स्मरणार्थ अलिबाग

# पाणीपुरवठा योजनांना गती द्या

## ● तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात; पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे निर्देश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या न्हावा-शेवा टप्पा-३ पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. कोन ते पळस्पे दरम्यान जलवाहिनी टाकण्याच्या कामात येणाऱ्या तांत्रिक अडचणी एमएमआरडीए आणि एमएसआरडीसी यांनी परस्पर समन्वयातून तातडीने दूर करून कामाला गती द्यावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.**




मंत्रालयात पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली न्हावा-शेवा टप्पा-३ पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेण्यात आला. यावेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष बबन मुकादम, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अमगोथू श्रीरंगा नायक, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी प्रशांत भामरे, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंते संजय वेंगुर्लेकर व रमेश वायदंडे, एमएमआरडीएचे प्रतिनिधी नामदेव गव्हाणे, तहसीलदार स्मिता मोहिते तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत न्हावा-शेवा टप्पा-३ पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पनवेल मंडळामार्फत राबविण्यात येणारी ही २२८ दशलक्ष लिटर प्रतिदिन (एमएलडी) क्षमतेची योजना असून, त्यापैकी १०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पनवेल महानगरपालिकेसाठी आरक्षित करण्यात आले आहे.

योजना अद्याप पूर्णपणे कार्यान्वित न झाल्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पाणीटंचाईची समस्या निर्माण होत असल्याची बाब बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आली. विशेषतः कोन ते पळस्पे दरम्यान जलवाहिनी टाकण्याच्या कामात उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी एमएमआरडीए आणि एमएसआरडीसी यांनी समन्वयातून तातडीने दूर कराव्यात, जेणेकरून जलवाहिनीचे काम वेगाने पूर्ण होऊन योजना लवकर कार्यान्वित होईल आणि पनवेल शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होईल, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.

> **राज्यातील महत्त्वाच्या पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यास शासन प्राधान्य देत असून, संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत.**
> **- गुलाबराव पाटील, मंत्री**

# विद्यार्थ्यांकडून गुरुजनांचा सन्मान



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, म्हसळा येथे गुरुपौर्णिमानिमित्त विशेष कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य डी. आर. पाटील, पर्यवेक्षक ई. सी. पाटील, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर कामडी यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व स्पष्ट करणारे प्रभावी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांना पेन व पुष्प अर्पण करून त्यांचा सन्मान केला. तसेच विद्यार्थ्यांनी गुरुंच्या कार्याविषयी मनोगते व्यक्त करत प्रेरणादायी भाषणे सादर केली.

प्राचार्य डी. आर. पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व, गुरु व शिष्य यांच्यातील पवित्र नाते तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनात गुरुंचे असलेले अनन्यसाधारण स्थान यावर मोलाचे विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांनी गुरुंप्रती कृतज्ञता बाळगून त्यांच्या मार्गदर्शनानुसार जीवन घडविण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ई. सी. पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच सांस्कृतिक विभागाचे त्यांनी विशेष आभार मानले.गुरुंप्रती आदर, कृतज्ञता आणि भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी, उत्साहपूर्ण आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला.

# गुरुपौर्णिमेनिमित्त कथाकथन स्पर्धा

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत इयत्ता ८वी ते १०वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यात संत, महापुरुष आणि आदर्श गुरु-शिष्यांच्या प्रेरणादायी कथा सादर केल्या. विद्यार्थ्यांनी प्रभावी निवेदनातून गुरुंबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सुचीर खाडे यांनी गुरुपौर्णिमेचे सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक महत्त्व विशद केले. गुरु-शिष्य परंपरेतील प्रेरणादायी उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, शिस्त आणि कृतज्ञतेचे महत्त्व पटवून दिले. मुख्याध्यापक दीपक माळी यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करताना सांगितले, गुरु हा केवळ ज्ञानदाता नसून जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुंचा आदर राखत ज्ञान, संस्कार आणि चारित्र्य यांचा वारसा जपावा, असेही ते म्हणाले.






# आदिवासींना रोपांचे वाटप

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

द्वारकाधीश चॅरीटीज ट्रस्टच्या वतीने गुरुपौर्णिमा आणि श्री देवकीमाता मंदिर वर्धापन दिनानिमित्त रसायनी आपटा फाटा येथील द्वारकाधीश मंदिर येथे वृक्षरोपांचे वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. बानूबाई वाडी येथील आदिवासी लाभार्थ्यांना प्रत्येकी एक हापूस कलमांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कारखानीस, आनंद देशमुख, ममता मांजरेकर, कामाक्षी कुडवा, गोगटे काका, डॉ. मयुरेश पिंपुटकर, नंदन शिरोडकर, योगेश ताटे आणि मोठ्या संख्येने आदिवासी लाभार्थी उपस्थित होते.

# एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी मुदतवाढ

## ● परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५०% सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, राज्यातील अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी काही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्याने पात्र प्रवाशांना शासनाच्या सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची दखल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतली आहे.

एसटीची प्रवासी सवलत ही सर्वसामान्यांच्या सोयीसाठी आहे. तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक कारणामुळे कोणत्याही पात्र प्रवाशाची गैरसोय होऊ नये, ही भूमिका आहे. त्यामुळे एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या अंमलबजावणीला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे, असे मंत्री सरनाईकांनी यांनी सांगितले.

## संत नामदेव विद्यालयात शिक्षकांचा सन्मान

**पाली/गोमाशी** : संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात १०वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्यावर फुलांची उधळण करून औक्षण केले. तसेच सर्व शिक्षक, गुरूंना गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान श्री बल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या वह्यांचे वाटप करण्यात आले.

# हाशिवरे येथे गुरुपौर्णिमा उत्साहात



**। हाशिवरे । प्रतिनिधी ।**

हाशिवरे हितवर्धक मंडळच्या शैक्षणिक संकुलामध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक तसेच माजी शिक्षिका शामला पाटील, बसवनाथे, संपदा पाटील, गजानन म्हात्रे उपस्थित होते. तसेच माजी विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या उपाध्यक्षा सरोज डाकी होत्या. संस्थेच्या कार्यकारिणी मंडळातील अ‍ॅड. शैलेश मोकल, सुबोध मोकल, निशिकांत मोकल आणि मिलिंद मोकल यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, गुरु प्रतिमेचे पूजन आणि गुरु वंदनेने झाली. त्यानंतर गुरुंच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या सदस्या मालती सुरेंद्र मोकल यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विविध दानशूर मान्यवरांच्या देणगीतून विद्यार्थ्यांना शालेय गणवेशांचे वाटप करण्यात आले.

## वाजेकर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

**उरण** : रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावेळी प्रा. किशोर पाटील यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. तर संगीता थोरात यांनी विद्यार्थी आणि गुरु यांचे नाते उलगडून सांगत, गुरुंच्या मार्गदर्शनामुळे जीवन यशस्वी व अर्थपूर्ण बनते, असे प्रतिपादन केले.

# गोखले महाविद्यालयात गुरुपौर्णिमा

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

गोखले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीवर्धन येथे गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व गुरुवंदनेने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दिपाली पाठराबे यांनी केले. त्यांनी भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत गुरूंच्या मार्गदर्शनाचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील स्थान स्पष्ट केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक खरे, उपप्राचार्य डॉ. राजू गोरुले तसेच डॉ. नाझरे यांनी गुरूंचा आदर, ज्ञानाची साधना आणि जीवनातील मूल्यांचे महत्त्व याविषयी विचार मांडले.



# गणवेश, शैक्षणिक साहित्य वाटप



**खरोशी** : पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण आणि सोबती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेतील गरीब गरजू विद्यार्थीनींना सावित्रीबाई दत्तक पालक योजनेंतर्गत गणवेश वाटप तसेच शालोपयोगी विविध वस्तूंचे वाटप गुरूपौर्णिमा निमित्ताने देण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे आधारस्तंभ तथा माजी अध्यक्ष अ‍ॅड. बापूसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने, उपकार्याध्यक्ष संजय कडू, संचालिका डॉ. निता कदम जागडे, मुख्याध्यापिका लेखा ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. एमटीएस स्पर्धा परीक्षेत सुयश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापिकांनी गुरूपौर्णिमा निमित्ताने प्रास्ताविकातून माहिती सांगितली. यावेळी विद्यार्थी, शिक्षक यांनी गुरूपौर्णिमेचे महत्त्व आणि गोष्टी सांगून मान्यवरांची मने जिंकली.

## उरणमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम

**उरण** : उरण शहरासह ग्रामीण भागात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. उरणमधील आनंद नगर येथील स्वामी समर्थ मठ येथे पूजा भजन आदिंचे आयोजन करण्यात आले होते. केगाव विनायक कोळीवाडा येथील जगदीश कोळी यांचे एकमुखी दत्तमंदिर, विनायक येथील प्रशांत नवाळे यांचे स्वामी मठ येथे पूजा, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. नवीन शेवा येथील स्वामी समर्थ मठ, मुळेखंड येथील स्वामी समर्थ मठ, मोरा येथील साई बाबा मंदिर, नागाव अंबिका वाडी येथे पूजा-आरती, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# गुरूचरणी कृतज्ञतेचा भावस्पर्शी सोहळा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृतीतील गुरुचे श्रेष्ठ स्थान अधोरेखित करणाऱ्या या सोहळ्याने संपूर्ण विद्यालय कृतज्ञता, संस्कार आणि आदर भावनेने भारावून गेले.




कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी गुरुपूजन करून शिक्षकांना पुष्पगुच्छ, हस्तनिर्मित शुभेच्छापत्रे आणि ग्रीटिंग कार्ड अर्पण केली. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः...' या मंत्रोच्चाराने वातावरण भक्तिमय झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेत कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

गुरूंनी दिलेले ज्ञान, संस्कार, शिस्त आणि जीवनमूल्ये यामुळेच आपले भविष्य घडत असल्याचे विद्यार्थ्यांनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत व्यक्त केले. कार्यक्रमातील सर्वांत भावनिक क्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या पायावर डोके ठेवून आशीर्वाद घेतला तो होय. हा प्रसंग पाहून अनेक विद्यार्थी आणि शिक्षक भावूक झाले. काहींच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. गुरु-शिष्य नात्यातील प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि परस्पर सन्मानाचे विलक्षण दर्शन या प्रसंगी घडले.

# निवडक



## योगा क्लासमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**नागोठणे** : नागोठण्यातील योगा प्रशिक्षणामध्ये नावाजलेल्या अशा योग गुरुकुल क्लासमध्ये गुरुपौर्णिमेचा उत्सव बुधवारी (दि.२९) साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या योगगुरू यामिनी दिघे यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला व त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. गुरुंच्या प्रेरणेने नियमित योगाभ्यास, शिस्त आणि निरोगी जीवनशैलीचा संकल्प सर्वांनी केला. याप्रसंगी योग गुरुकुल क्लासच्या संस्थापिका व योगप्रशिक्षिका यामिनी सुशील दिघे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, गुरु हा केवळ ज्ञान देणारा नसतो, तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात योग्य दिशा दाखवणारा दीपस्तंभ असतो. योगाच्या माध्यमातून निरोगी शरीर, शांत मन आणि सकारात्मक जीवन घडवणे हेच योग गुरुकुलचे मुख्य व अंतिम ध्येय आहे आहे.



## विवा कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**माणगाव** : माणगाव येथील विवा कॉलेजमध्ये बुधवारी (दि.२९) गुरुपौर्णिमा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व गुरु पूजनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी गुरुवंदना, मनोगते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात शिक्षणातील गुरूंचे स्थान व त्यांचे महत्व सांगताना विद्यार्थ्यांनी आपण मोठे झाल्यावर विविध क्षेत्रात भरारी घेतल्यावर आपल्याला ज्या शाळा व कॉलेजने तसेच शिक्षकांनी घडविले, याची आठवण ठेवणे गरजेचे असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना गुरूंचा आदर राखत ज्ञानाच्या माध्यमातून समाजसेवेचा संकल्प करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

## विद्यार्थ्यांकडून प्रेरणादायी कार्यक्रम



**नागोठणे** : नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासंकुलातील एस.एस.ओ.एस.पी. डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यानिमित्त महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागांमध्ये विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रत्येक विभागातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन व संपूर्ण आयोजन उत्कृष्टरित्या पार पाडले. विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व सांगणारी मनोगते व्यक्त केली. तसेच शिक्षकांविषयी कृतज्ञता, आदर आणि प्रेम व्यक्त करणारी प्रेरणादायी भाषणे सादर केली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी गुरुंच्या मार्गदर्शनामुळे जीवनात यशाचा मार्ग कसा सुकर होतो, याविषयी आपले विचार मांडले. यावेळी संबंधित विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत शिक्षणातील सातत्य, शिस्त, वेळेचे महत्त्व, नैतिक मूल्ये, तांत्रिक कौशल्ये आणि उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांविषयी मार्गदर्शन केले.

## गुरुपोर्णिमा वर्षावासनिमित्त वृक्षलागवड



**रसायनी** : वावंढळ येथील विपस्सी बुद्धविहार येथे गुरुपौर्णिमा वर्षावास उत्साहात साजरा करण्यात आली. यावेळी विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यात जांभूळ, शेवगा, बोधिवृक्ष व पिंपळ अशा वृक्षाची लागवड करुन त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्यात आली. यावेळी उषाताई कांबळे भारतीय बौध्द महासभा महिला विभाग अध्यक्षा, धम्मचारी अमोगमुनी, पोलीस पाटील वनिता कांबळे, राजेश कांबळे वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ते, उद्योजिका माधुरी कांबळे, गावचे ज्येष्ठ रघुनाथ कांबळे, ग्रामपंचायत सदस्या मयुरी कांबळे, ट्रेनर राधिका कांबळे, अमित जाधव युवा, जानवी सोनवणे सीआरपी महिला बचत गट व वावंढळ गावचे सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.



## साई मंदिरात गुरुपौर्णिमेचा उत्सव

**चिरनेर** : वहाळ येथील साई संस्थांनच्या साई मंदिरात गुरुपौर्णिमेचा उत्सव दिमाखदार पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी प्रथेप्रमाणे सकाळी साई बाबांचे मंगल स्नान गुरुवर्य मो.का.मढवी गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर महापूजा व महाआरती करण्यात आली. यावेळी दिवसभर साईंच्या दर्शनाला भाविकांची गर्दी झाली होती. सायंकाळी उरण तालुक्यातील साई भक्तांची चिरनेर ते वहाळ साई मंदिर अशा पायी दिंडीचे साई मंदिरात प्रस्थान झाले. साई भक्तांच्या हातात भगव्या पताका आणि आणि साईंच्या नावाचा गजर दिंडीतून होताना दिसत होता. त्यामुळे संपूर्ण वहाळ परिसर साईमय झाला होता. दरम्यान यावेळी गुरुजनानाचा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे बॉक्ससिंगमध्ये रायगड पनवेल चम्पियन स्पर्धेत गोल्ड मेडल पटकवणाऱ्या आस्था सचिन भगत आणि तिच्या परिवाराचा तसेच हरेश्वर ठाकूर यांच्या साई ग्रुपने अमरनाथ यात्रा पूर्ण केल्याबद्दल त्यांच्याही सत्कार करण्यात आला. या कार्यकमाच्या यशस्वी आयोजनासाठी साई संस्थान वहाळ परिवाराच्या सभासदांनी मेहनत घेतली.

# रोहा-तांबडी मार्गावर जीवघेणा प्रवास

## ■ चार दिवसांपासून भला मोठा दगड रस्त्यावर; माती खचली, झाडे कोसळण्याचा धोका

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा-तांबडी मुख्य जिल्हा मार्ग क्रमांक ५० हा पुन्हा एकदा गंभीर धोक्याच्या छायेत आला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डोंगरावरील भला मोठा दगड रस्त्यावर कोसळला असून, तो गेल्या तीन ते चार दिवसांपासून तसाच पडून आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात मातीही रस्त्यावर घसरून आली आहे.



विशेष म्हणजे, डोंगराचा उर्वरित भाग अजूनही सैल अवस्थेत असल्याने आणखी मोठे दगड, माती तसेच झाडे कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही धोकादायक परिस्थिती असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नसल्याने वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिक संतप्त झाले आहेत.

एखादा गंभीर अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे. या मार्गावरून दररोज शेकडो वाहने, शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवांची वाहने ये-जा करतात. मात्र रस्त्यावर पडलेला दगड, खचलेली माती आणि वरून लोंबकळणारी झाडे यामुळे प्रत्येक प्रवास जीवघेणा ठरत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि मुसळधार पावसात हा धोका अनेक पटींनी वाढत असल्याचे वाहनचालक सांगत आहेत.

गेल्या वर्षीही याच डोंगरातून आठ ते नऊ ठिकाणी मोठ्या प्रमाणात दरडी कोसळल्या होत्या. अनेक ठिकाणी झाडांसह प्रचंड दगड रस्त्यावर आल्याने वाहतूक ठप्प झाली होती. त्या घटनेतून प्रशासनाने कोणताही धडा घेतल्याचे दिसत नाही. यंदाही तशीच परिस्थिती निर्माण झाली असून, संभाव्य दुर्घटनेची चाहूल लागूनही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे या रस्त्याला अनेक ठिकाणी अद्याप साईड पट्टीच नसल्याने एका बाजूला उंच डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी अशा धोकादायक परिस्थितीत वाहनचालकांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे. अशा परिस्थितीत जर अचानक दरड कोसळली किंवा झाड पडले, तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासने न देता तातडीने घटनास्थळी भेट देऊन रस्त्याची पाहणी करावी, धोकादायक दगड, माती आणि झाडे तात्काळ हटवावीत तसेच कायमस्वरूपी दरड प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

> “आयआयटी मुंबईच्या जिओ-टेक्निकल तज्ज्ञांनी सोमवारी या डोंगराची पाहणी केली आहे. त्यांनी सुचविलेल्या उपाययोजनांनुसार विभागामार्फत काम करण्यात येणार असून, आवश्यक मंजुरी मिळताच काम तातडीने सुरू करण्यात येईल. तसेच रोहा-तांबडी रस्त्याच्या ४.८५० किलोमीटर लांबीच्या सुधारणा कामासाठी चालू अर्थसंकल्पात सुमारे पाच कोटी रुपयांची मंजुरी मिळाली असून, पावसाळा संपल्यानंतर या कामाला सुरुवात होईल.”
>
> – अरुण पाटील
> उपअभियंता

### दुर्घटना घडण्यापूर्वी उपाययोजना करा

रस्त्यावर चार दिवसांपासून पडलेला दगड, खचलेली माती आणि डोंगरावर लटकलेली धोकादायक झाडे हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. दुर्घटना घडण्यापूर्वी उपाययोजना करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे; दुर्घटना घडल्यानंतर पंचनामे करून मदतीची घोषणा करण्यात काहीच अर्थ नाही. त्यामुळे कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ रस्ता सुरक्षित करावा, अन्यथा भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी संबंधित यंत्रणेवरच राहील.



श्रावणातील पहिला सण असलेल्या नागपंचमीसाठी पनवेलच्या कुंभारवाड्यात मातीच्या नागमूर्ती तयार करण्याचे काम महिला करताना दिसत आहेत. (छायाचित्र: राजेश डांगळे)

## ट्रान्सफॉर्मर बसवून वीज समस्येला दिलासा

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

नवीन वसाहत चौक परिसरात अनेक दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. अखेर स्थानिक नागरिकांनी एकत्र येत महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे या प्रश्नाचा जाब विचारल्यानंतर अवघ्या २४ तासांत नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या प्रश्नाबाबत ग्रुप ग्रामपंचायत चौक सदस्या ॲड. रिना सोनटक्के, स्वप्नील सोनटक्के यांनी पुढाकार घेत महावितरणचे अधिकारी सचिन आंबवले यांना प्रत्यक्ष घटनास्थळी बोलावून समस्या मांडली. यावेळी स्वप्नील मालुसरे, निलेश कुंभार, नितीन पवार, सुनील खंडागळे, संघर्ष मते, दीपाली सूर्यवंशी, आरती सूर्यवंशी यांच्यासह आदी नागरिक उपस्थित होते.

आंबवले यांनी तातडीने दखल घेत नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार दुसऱ्याच दिवशी गोविंद पिरकड, खतीत जमीर व महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून वीजपुरवठा सुरळीत केला.

## महाड शहरालगत अनधिकृत भंगाराचे गोडाऊन

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरालगत असलेल्या निवासी वस्तीच्या शेजारी अनधिकृतपणे सुरू असलेल्या भंगाराच्या गोडाऊनमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक, रबर, लोखंडी साहित्य, इलेक्ट्रॉनिक कचरा तसेच इतर ज्वलनशील वस्तूंचा साठा करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. स्थानिकांच्या मते, गोडाऊनच्या शेजारी घरे असल्याने आग लागल्यास काही क्षणांत ती संपूर्ण वस्तीत पसरू शकते. विशेषतः पावसाळ्यानंतर उन्हाळ्यात अशा भंगाराच्या ठिकाणी आग लागण्याच्या घटना राज्यात अनेकदा घडल्या आहेत. अशा परिस्थितीत महाडमध्येही मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

अग्निशमन विभागाची परवानगी आणि सुरक्षा मानकांची पूर्तता झाली आहे का, याची तातडीने चौकशी करण्याची मागणी होत आहे. तसेच नगर परिषद, महसूल प्रशासन, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि अग्निशमन विभागाने संयुक्त पाहणी करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### आराध्य भोनकर यांचा सत्कार

**म्हसळा:** पी. एम. श्री. राजीव गांधी जि.प शाळा, म्हसळा येथे पालक सभेचे आयोजन करण्यात आले. त्यात आगामी शिष्यवृत्ती परीक्षेच्या पार्श्वभूमीवर पालकांना शिष्यवृत्ती परीक्षेचे महत्त्व, विद्यार्थ्यांची तयारी आणि शैक्षणिक प्रगती याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शाळेच्या सुमित्रा खेडेकर मिलिंद मुंडे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूपावर मार्गदर्शन केले. ज्ञान स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम आलेल्या आराध्य भोनकर, ओम बिचुकलेचा विशेष सत्कार करण्यात आला.

## आशीर्वाद फाऊंडेशनतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपत आशीर्वाद फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. या अंतर्गत यंदा ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला होता.



श्रीवर्धन तालुक्यातील राजिप शाळा शिस्ते, बोर्ली मुले आणि मुली, कापोली, दिवेआगर कार्ले आदिवासी वाडी व श्रीवर्धन क्र. १ आणि २ अशा ८ शाळांमधील विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

दिवेआगर शाळेत मुलांना वह्या तसेच शालेय उपयोगी वस्तू देण्यात आल्या. तसेच शिस्ते येथील अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाटी पेन्सिल सेट देण्यात आला. आणि इ. ५ वी ते १२ वीच्या मुलांना वह्या वाटप करण्यात आल्या.

याप्रसंगी आशीर्वाद फॉऊंडेशनचे अध्यक्ष राजेश चव्हाण, चंद्रकांत चाळके ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, पालक, श्रीकांत तोडणकर, शिस्ते व बोर्ली शाळा कमिटी सदस्य आणि आशीर्वाद फॉऊंडेशनचे सदस्य, तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तीन दशकांचा आधार अखेर खचला

### कृष्ण चौक आळीचा पूल कोसळला

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील खारापटी गावातील कृष्ण चौक आळी येथील सुमारे ३० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला लहान पूल अखेर कोसळल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुदैवाने ही दुर्घटना घडली त्यावेळी पुलावरून कोणतीही व्यक्ती अथवा सायकलसह अन्य लहान वाहन जात नसल्याने मोठी जीवितहानी टळली.



ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, हा पूल सन १९९६ मध्ये तत्कालीन ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच पंढरीनाथ पोकळे यांच्या कार्यकाळात बांधण्यात आला होता. या कामाचा ठेका संदीप चोरगे यांनी घेतला होता, तर बांधकामाचे काम लक्ष्मीनगर गावातील गवंडी उत्तम दाभाडे यांनी केले होते.

मात्र, कोकणातील दरवर्षीचा मुसळधार पाऊस, ओढ्यातून वाहणाऱ्या पाण्याचा वाढता वेग आणि कालांतराने झालेली नैसर्गिक झीज यामुळे पुलाची मजबुती कमी होत गेली असावी, असा प्राथमिक अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. अखेर सततच्या पावसाच्या तडाख्यामुळे पुलाचा काही भाग कोसळून पडला. पूल कोसळल्याने स्थानिक नागरिकांची दैनंदिन ये-जा विस्कळीत झाली असून विद्यार्थ्यांसह शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने नवीन पूल उभारण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तोपर्यंत दुर्घटनास्थळी संरक्षणात्मक उपाययोजना करून नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी, अशीही मागणी करण्यात येत आहे.

## नशामुक्त भारत अभियानाला प्रतिसाद

**। तळा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा पोलिसांच्या अंतर्गत मनशामुक्त भारत अभियान, जागतिक अमली पदार्थ विरोधी सप्ताहाचे औचित्य साधून कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात एका भव्य मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांनी विद्यार्थ्यांना नशामुक्ती आणि व्यसनमुक्तीवर भर देत, अमली पदार्थांच्या घातक विळख्यापासून सर्व तरुणांनी दूर राहण्याचा कडक सल्ला दिला.





एवढेच नाही तर, वाढते सायबर क्राईम, पॉक्सो कायदा, विद्यार्थी सुरक्षा आणि महिला सुरक्षा या अत्यंत संवेदनशील विषयांवर त्यांनी कायदेविषयक सविस्तर माहिती दिली.

**रेल्वे रुळावर लोखंडी बॉक्स | संतोष जाधव यांच्या तत्परतेचे कौतुक**

## सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेवरील वाहतुकीस अडचणी निर्माण करणारी वस्तू लोकल गाडीचे ट्रेन मॅनेजर संतोष जाधव यांच्या लक्षात आली. जाधव यांनी तात्काळ समयसूचकता दाखवून याबाबतची माहिती स्थानक प्रबंधकांना दिली. त्यामुळे मध्य रेल्वेवरील मोठा अनर्थ टळला आहे.

नेरळ येथील संतोष जाधव हे ट्रेन मॅनेजर म्हणुन काम पाहत होते. उल्हासनगर ते अंबरनाथ रेल्वे स्थानकादरम्यान डाऊन मार्गावर रेल्वे रुळावर लोखंडाचा मोठा चौकोनी बॉक्स पडल्यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, कर्जत लोकलचे ट्रेन मॅनेजर (गार्ड) संतोष जाधव यांच्या समयसूचकतेमुळे आणि सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, कर्जत डाऊन लोकल उल्हासनगर स्थानकातून सुटल्यानंतर उल्हासनगर-अंबरनाथ दरम्यान ट्रेन मॅनेजर संतोष जाधव यांना गाडीमध्ये अचानक तीव्र झटका जाणवला आणि मोठा आवाज आला. त्यांनी प्रसंगावधान राखून तात्काळ इमर्जन्सी ब्रेक लावून गाडी थांबवली. त्यानंतर त्यांनी लगेच इंटरकॉमद्वारे मोटरमनला याची सूचना दिली. गाडी थांबल्यानंतर ट्रेन मॅनेजर संतोष जाधव यांनी खाली उतरून पाहणी केली असता, कोच नंबर ५३६० मधून प्रेशर गळतीचा आवाज येत होता. त्यांनी लेडीज डब्यात तैनात असलेल्या होमगार्ड जवानाला सोबत घेऊन मागे जाऊन पाहणी केली. तेव्हा रेल्वे रुळावर लोखंडाचा मोठा चौकोनी बॉक्स अडकल्याचे दिसून आले. होमगार्डच्या मदतीने हा लोखंडी बॉक्स तात्काळ रेल्वे रुळावरून बाजूला करण्यात आला.





यादरम्यान, सुमारे १० ते १५ मिनिटे रेल्वे वाहतूक थांबली होती. त्यानंतर ट्रेन मॅनेजर यांनी याची माहिती इमर्जन्सी कंट्रोल आणि कंट्रोलला देऊन गाडी सुरक्षितपणे पुढील प्रवासासाठी रवाना केली. संतोष जाधव यांच्या सतर्कतेमुळे शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले असून, त्यांच्या या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान, उल्हासनगर-अंबरनाथ ते बदलापूर दरम्यान उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या कामातील हा लोखंडी तुकडा रुळावर आला कसा? तो खाली पडला की कोणी मुद्दाम ठेवला होता? यादृष्टीने रेल्वे सुरक्षा दल व पोलीस प्रशासन अधिक तपास करत आहेत.

## राजेंद्र वाघमारे यांना ‘समाजभूषण’

**पाली /बेणसे :** जिल्ह्यात प्रथमच गुरुपौर्णिमा महोत्सवात कला, साहित्य, सामाजिक कार्य आणि गुरु-शिष्य परंपरेचा संगम अनुभवायला मिळाला. कर्जत येथे झालेल्या महोत्सवात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यावेळी मुंबई पोलीस दलातील पोलीस राजेंद्र वाघमारे यांना त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## निवडक



### विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना मिळाली नवी दिशा

**रोहा :** महानगर गॅस लिमिटेडच्या सहकार्याने मेलजोल संस्थेतर्फे शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा सानेगाव येथे कौशल्य विकास आणि रोजगाराच्या विविध पर्यायांविषयी मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने करिअर फेअर २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात इयत्ता सहावी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. शाळेच्या मुख्याध्यापिका विजया पाटील यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच कौशल्य विकास, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि योग्य करिअर नियोजनावर भर देण्याचे आवाहन केले. करिअर विषयक पॅनेल चर्चेमध्ये प्रमोद मांडवकर, किरण साळवी, आरडीसीसी बँक, रोहा शाखा, प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग तसेच वित्त साक्षरता मंच, रोहा तालुका यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना विविध करिअर संधी, स्पर्धा परीक्षा, कृषी क्षेत्रातील आधुनिक संधी, बँकिंग, आर्थिक साक्षरता, सामाजिक क्षेत्रातील करिअर याविषयी मार्गदर्शन केले. तज्ज्ञांशी संवाद साधत विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले आणि आपल्या भविष्यातील करिअर नियोजनाबाबत मार्गदर्शन मिळविले. कार्यक्रमाचे आभार टी. व्ही. बलकवडे यांनी केले.



### सुपेगाव मार्गावरचा अडथळा होणार दूर

**चणेरा :** काही दिवसापूर्वी अतिवृष्टीमुळे मुरुड-रोहा-कोलाड प्रमुख मार्गावरील उसरोली फाटा ते तळेखार फाटा दरम्यान रस्त्याचा मोठा भाग खचला होता. त्यानंतर २० जुलैपासून हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. परिणामी नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यावसायिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. गेल्या तीन आठवड्यांपासून बंद असलेल्या सुपेगाव मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम हाती घेतले असून, येत्या सोमवार दि. ३ ऑगस्टपासून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभागाचा अतिरिक्त कारभार सांभाळणारे उपअभियंता अरुण पाटील यांनी दिली. सध्या क्षतिग्रस्त भागाचे खोदकाम, मजबुतीकरण आणि तात्पुरती दुरुस्ती अंतिम टप्प्यात असून, काम पूर्ण होताच रस्ता वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. मात्र, निर्धारित मुदतीत काम पूर्ण न झाल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही उपअभियंता अरुण पाटील यांनी दिला आहे.



### रिमांड ॲण्ड प्री-चार्जशीट बेलवर मार्गदर्शन

**नागोठणे :** गुरुपौर्णिमेनिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले असतानाच रोहा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने अधिवक्ता परिषद रोहा यांचेतर्फे आणि रोहा बार असोसिएशनच्या सहकार्याने रिमांड ॲण्ड प्री-चार्जशीट बेल या विषयावर मुंबई उच्च न्यायालयातील अधिवक्ता तपन अनंत थत्ते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अधिवक्ता तपन थत्ते यांनी जामीन अर्ज कसा व कधी द्यावा, अटक व्यक्तीचे अधिकार, जामीन मिळण्यास आरोपी कधी पात्र ठरतो आदी अनेक मुद्द्यांवर वरिष्ठ न्यायालयाच्या न्याय निर्णयांचा दाखला देऊन सखोल असे मार्गदर्शन यावेळी केले. या कार्यक्रमास रोहा दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश एस. व्ही. खैरे, अधिवक्ता परिषदेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष ॲड. धनंजय धारप रोहा बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. सुनिल सानप, अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील ॲड. योगेश तेंडुलकर, अधिवक्ता परिषद रायगड जिल्हा संघटन सचिव ॲड. स्वराज मोरे, पाली बार असोसिएशनच्या अध्यक्ष ॲड. अक्षरा देशमुख यांच्या विशेष उपस्थितीसह स्थानिक रोहा बारचे पदाधिकारी, सीनियर वकील, तसेच पाली वकील संघटनेचे व माणगाव वकील संघटनेचे सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. **मोबाईल :** ७५५९१८४६१२

- **नोकरीची सुवर्णसंधी – दिशा पॅथॉलॉजी, अलिबाग येथे महिला / ज्येष्ठ नागरिक महिला यांच्यासाठी संधी. पद: रक्त नमुना (Blood Sample) संकलन कामाची वेळ: सकाळी ७:३० ते दुपारी १:०० प्रवास: पनवेल अलिबाग अप-डाउन अधिक माहितीसाठी संपर्क करा : ८५५२८५५२८८**

- **पाहिजेत – अनुभवी पिक-अप ड्रायवर/सोलार काम करणारे इलेक्ट्रीशन अनुभवी-आणि हेल्पर शिक्षणाची अट नाही. V.R.Enterprises Alibag 8888605259 / 8208140619 ( savitri perl Building Ram Mandir) (Bramhan Ali)**

- **अलिबागमधील एका नामांकित हॉस्पिटलमध्ये नर्स पाहिजे. (ANM, GNM) मो.८७८८७३१६०८**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# नागरी समस्यांबाबत नागरिक आक्रमक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील दहिवली गाव आणि परिसरातील नागरी समस्यांबाबत कर्जत नगरपरिषदेकडून प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे दहिवली भागातील रहिवाशी यांनी आक्रमक भूमिका घेत नगरपरिषदेला निवेदन सादर केले आहे.

दरम्यान, कर्जत नगरपरिषदेने नागरी समस्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर दहिवली गाव परिसर विचार मंचाकडून आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. कर्जत आणि दहिवली या दोन ग्रामपंचायती यांची कर्जत नगरपरिषद बनली आहे.

कर्जत नगरपरिषदेकडून दहिवली परिसरातील विकास कामांबाबत कायम दूजाभाव दाखवण्या येत आहे. या परिसरातील नागरी प्रश्नांवर कर्जत नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष नाही. या भागातील उल्हास नदी प्रदूषण रोखण्यासाठी प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया केंद्र प्रकल्पाचा डीपीआर, नदी प्रदूषण करणाऱ्यांवर झालेली कारवाई, जिजामाता उद्यान ते लहान पूल परिसरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम, भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरण व लसीकरण मोहिमेचा अहवाल, प्रति अयोध्या परिसरातील ड्रेनेज व सुरक्षा व्यवस्था, दहिवली स्मशानभूमी व नवीन घाट परिसरातील स्वच्छता, सुरक्षा व ओपन जिम पुन्हा सुरू करणे, तसेच नगरपरिषदेच्या नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्समधील गाळे वाटपात स्थानिक दहिवली व आकुर्ले येथील पात्र नागरिकांनाच प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे. उल्हास नदी घाट परिसरात सध्या अनधिकृत कामगार नाका तयार झाल्याने मोठ्या प्रमाणात अस्वच्छता निर्माण होत असून महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना परिसराचा वापर करणे कठीण झाले असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. हा कामगार नाका मार्केट यार्ड येथे स्थलांतरित करून घाट परिसर नागरिकांसाठी सुरक्षित व स्वच्छ ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे.

या नागरी समस्याकडे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष आता चांगलेच चव्हाट्यावर आले आहे. दहिवली गाव परिसर विचार मंचाने कर्जत नगर परिषदेला सविस्तर निवेदन देत विविध विकासकामांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली नागरिक करीत आहेत. या सर्व समस्यांची पूर्तता न झाल्यास नागरिकांच्या सहभागातून व्यापक लोकशाही आंदोलन छेडण्याचा इशारा दहिवली परिसर विचार मंचाने दिला आहे. विचार मंचाकडून यापूर्वी केलेल्या पाठपुराव्यानंतर कर्जत नगर परिषदेकडून १६ एप्रिल २०२६ रोजी लेखी आश्वासन देण्यात आले होते. मात्र, त्या आश्वासनातील अनेक मुद्द्यांवर अद्याप कोणतीही ठोस अंमलबजावणी झालेली नाही. या सर्व प्रश्नांवर नगरपरिषद प्रशासनाने प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन प्रत्यक्ष कामांना सुरुवात करावी, अन्यथा नागरिकांच्या सहभागातून तीव्र लोकशाही आंदोलन उभारले जाईल, असा स्पष्ट इशारा दहिवली गाव परिसर विचार मंचाने निवेदनाद्वारे दिला आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्यांच्या मालकांकडून विकसनाकरीता घेतलेली आहे.

**मौजे - मूद्रे खुर्द, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) प्रविण सरदारमल ओसवाल<br>२) सागर धरमचंद ओसवाल<br>३) सुयश सुधीर कळके<br>४) स्वप्निल बाबुराव देशमूख<br>५) आरती चंद्रभान किन्होळकर | १० | ३ | ०-१५-९० | १-३७ |

तरी सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकसनाकरीता देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील जमीन मिळकत ही तद्रभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणताही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, भाडेपट्टा, बोजा, चार्ज लिन, कुलअखत्यारपत्र, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. ३१/०७/२०२६

अधिवक्ता
लक्ष्मण धर्मराज जाधव
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९२११३६६


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. रायगड विभाग, रामवाडी, पेण.**
e-mail-dcst_raigad@rediffmail.com
दूरध्वनी क्र.८२७५०६६४००

क्र. राप/रायगड/वाह/वाणिज्य/ ७०८ दिनांक :- ३०/०७/२०२६

**स्वारस्य अभिव्यक्ती सुचना क्र. ०१/२०२६**
**(द्वितीय मुदतवाढ)**

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण रामवाडी हे या विभागामार्फत मुंबई - गोवा व गोवा - मुंबई या राष्ट्रीय / राज्य महामार्गावरील खारपाडा ते कशेडी व कशेडी ते खारपाडा या हद्दीतील हॉटेल- मोटेलच्या ठिकाणी ई - शिवाई बसेसना अधिकृत थांबा देण्याबाबत विचाराधीन आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मार्गाचे नाव | ई-शिवाई फेरीकरिता किमान अपेक्षित थांबा आकार रक्कम (प्रतिबस प्रतिदिन प्रमाणे | थांबा आकार रक्कमेवर वस्तु व सेवाकर | प्रस्ताव सादर करताना भरणा करावयाची बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई-गोवा | रू. ३१०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |
| २. | गोवा-मुंबई | रू. ३१०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |

अधिकृत हॉटेल थांब्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रतिदिन प्रतिबस/प्रतिफेरी किमा अपेक्षित देकार रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अपेक्षित किंवा त्यापेक्षा थांबा देकार रक्कम देऊ करणाऱ्या हॉटेल चालक-मालक यांनी सदरची रक्कम स्वारस्य अभिव्यक्ती सुचना प्रस्ताव प्रपत्रात नमुद करून सदरचे प्रस्ताव प्रपत्र हॉटेल प्रस्तावासोबत सादर करण्यात यावेत.

निविदा प्रपत्राचे फॉर्म, अटी व शर्ती फॉर्म तसेस प्रस्तावाच्या सोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी इत्यादी तपशिल विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण रामवाडी येथे दि. ३१.०७.२०२६ ते दि.०६.०८.२०२६ या कालावधीत दररोज शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत हॉटेल थांबा प्रस्ताव सादर करणेकरीता रू.२०००/- + १८% वस्तु व सेवाकर असे एकूण रू.२,३६०/- परतावा केला जाणार नाही. व बयाणा रक्कम रू.१,००,०००/- या कार्यालयाकडे भरणा केले नंतर आपणांस प्रस्ताव प्रपत्र फॉर्म मिळतील. दि.०६.०८.२०२६ रोजी १३.०० वाजेपर्यंत बयाणा रक्कम स्विकारणेत येईल. दि.०६.०८.२०२६ रोजी १३.०० वाजल्या नंतर प्रस्ताव फॉर्म दिले जाणार नाहीत, तसेच बयाणा रक्कम स्विकारली जाणार नाही.

हॉटेल प्रस्ताव स्विकारण्याची शेवटची दिनांक ०६.०८.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत राहील व तद्नंतर उशिरा प्राप्त झालेले प्रस्ताव निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येतील. अपूर्ण नोंदी असलेले, स्वाक्षरी नसलेले व आवश्यक मुळ कागदपत्रे प्रस्तावाच्या सोबत न जोडल्यास प्रस्ताव अपात्र समजण्यात येईल. प्रस्ताव शक्यतो दि.०६.०८.२०२६ रोजी १५.३० वाजे पर्यंत उघडण्यात येईल.

सही/-
**विभाग नियंत्रक,**
**रा.प. रायगड विभाग, पेण**

## जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना **जाहीर सूचना देण्यात येते की,** आमच्या अशीलाच्या वतीने आम्ही **श्री. सौरभ हेमराज बोरा** यांचे खालील मालमत्तेवरील मालकी हक्क, स्वामित्व हक्क, हक्क, अधिकार व हितसंबंध यांची चौकशी व पडताळणी करीत आहोत. सदर मालमत्ता म्हणजे **गट क्र. १९३** या ००-३९-५० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ३,९५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या कृषी जमीन असून, ती मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स्थित असून, खालील **अनुसूचीमध्ये** अधिक विशेषतः वर्णन केलेली आहे (यापुढे **सदर मालमत्ता** असा उल्लेख करण्यात येईल).

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा/संस्थेचा विक्री, सामंजस्य करार, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, भार, बोजा, भाडेकरार, पोटभाडेकरार, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, गहाण (समन्यायी अथवा अन्य प्रकारचे), वारसा, वहिवाट, ताबा, कब्जा, वाटणी, हिस्सा, बक्षीस, मृत्युपत्राद्वारे हस्तांतरण, धारणाधिकार, भार, देयके, विकास हक्क, देखभाल हक्क, सुखाधिकार, विश्वस्त हक्क, करारातील अटी, मुक्तता, हक्कत्याग किंवा कोणत्याही प्रकारच्या करार, करारनामा, दस्त, लेखी कागदपत्र, हस्तांतरणपत्र, मृत्युपत्र, इच्छापत्रातील तरतूद, वारसा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायालयीन वाद, न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल प्राधिकरण किंवा वैधानिक प्राधिकरणाचा हुकूम, आदेश, निवाडा, लवाद अथवा इतर कोणत्याही प्रकारे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हिस्सा, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप किंवा मागणी असल्यास किंवा असल्याचा दावा करीत असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, त्यासंबंधित सर्व कागदोपत्री पुराव्यांच्या संपूर्ण व प्रमाणित सत्य प्रतींसह, खाली सही करणाऱ्यांकडे वन वर्ल्ड सेंटर, ७ वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ या पत्त्यावर तसेच monika.bhonsale@trilegal.com आणि uday.shah@trilegal.com या ई-मेल पत्त्यावर, या सूचनेच्या दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत पाठवाव्यात. अन्यथा, अशा व्यक्तीचा/संस्थेचा दावा, असल्यास, तो सोडून दिलेला आणि/किंवा त्याग केलेला समजला जाईल व तो कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील **गट क्र. १९३** (जुना गट क्र. १९४) या ००-३९-५० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ३,९५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या संपूर्ण कृषी जमीन ज्याची सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

उत्तर दिशेस : गट क्र. १९८
दक्षिण दिशेस : (जुना) गट क्र. २०२
पूर्व दिशेस : गट क्र. १९६
पश्चिम दिशेस : गट क्र. २०१.

**आज दिनांक ३१ जुलै, २०२६**

**मोनिका भोसले**
**भागिदार,**
**ट्रायलिगल**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए,
सेनापती बापट मार्ग, लोअर परेल
(पश्चिम), मुंबई ४०००१३

## जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना **जाहीर सूचना देण्यात येते की,** आमच्या अशीलाच्या वतीने आम्ही **(१) आयेशाबीबी इस्माईल दाखवे, (२) फकीर मोहम्मद जैनुद्दीन लंबटे, (३) आसिफ जैनुद्दीन लंबटे, (४) रझिया नफीस गोमें, (५) सुलतान जावेद दांडेकर आणि (६) मेहजबीन इम्रान अरब** यांचे खालील मालमत्तेवरील मालकी हक्क, स्वामित्व हक्क, हक्क, अधिकार व हितसंबंध यांची चौकशी व पडताळणी करीत आहोत. सदर मालमत्ता म्हणजे **गट क्र. १९९** या एकूण ००-५०-२० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच ५,०२० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या कृषी जमिनचा भाग असून, ती मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स्थित असून, खालील **अनुसूचीमध्ये** अधिक विशेषतः वर्णन केलेली आहे (यापुढे "**सदर मालमत्ता**" असा उल्लेख करण्यात येईल).

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा/संस्थेचा विक्री, सामंजस्य करार, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, भार, बोजा, भाडेकरार, पोटभाडेकरार, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, गहाण (समन्यायी अथवा अन्य प्रकारचे), वारसा, वहिवाट, ताबा, कब्जा, वाटणी, हिस्सा, बक्षीस, मृत्युपत्राद्वारे हस्तांतरण, धारणाधिकार, भार, देयके, विकास हक्क, देखभाल हक्क, सुखाधिकार, विश्वस्त हक्क, करारातील अटी, मुक्तता, हक्कत्याग किंवा कोणत्याही प्रकारच्या करार, करारनामा, दस्त, लेखी कागदपत्र, हस्तांतरणपत्र, मृत्युपत्र, इच्छापत्रातील तरतूद, वारसा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायालयीन वाद, न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल प्राधिकरण किंवा वैधानिक प्राधिकरणाचा हुकूम, आदेश, निवाडा, लवाद अथवा इतर कोणत्याही प्रकारे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हिस्सा, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप किंवा मागणी असल्यास किंवा असल्याचा दावा करीत असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, त्यासंबंधित सर्व कागदोपत्री पुराव्यांच्या संपूर्ण व प्रमाणित सत्य प्रतींसह, खाली सही करणाऱ्यांकडे वन वर्ल्ड सेंटर, ७ वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ या पत्त्यावर तसेच monika.bhonsale@trilegal.com आणि uday.shah@trilegal.com या ई-मेल पत्त्यावर, या सूचनेच्या दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत पाठवाव्यात. अन्यथा, अशा व्यक्तीचा/संस्थेचा दावा, असल्यास, तो सोडून दिलेला आणि/किंवा त्याग केलेला समजला जाईल व तो कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील **गट क्र. १९९** (जुना गट क्र. १९५) या ००-५०-२० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ५,०२० चौरस मीटर क्षेत्रफळामधील अविभाजित हिस्सा, हक्क, मालकी हक्क व हितसंबंध, ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

उत्तर दिशेस : गट क्र. २०४
दक्षिण दिशेस : गट क्र. २०१
पूर्व दिशेस : गट क्र. १९३; आणि
पश्चिम दिशेस : गट क्र. १८७

**आज दिनांक ३१ जुलै, २०२६**

**मोनिका भोसले**
**भागिदार,**
**ट्रायलिगल**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए,
सेनापती बापट मार्ग, लोअर परेल
(पश्चिम), मुंबई ४०००१३

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सुमित सालवान व शेफाली सालवान दोघे रा. वेनवर्थ डेने, पाईन ग्रोव रोड, वे ब्रीज टाऊन, कंट्री सर्व्हे, पाईन ग्रोव्ह रोड, टाऊन वे ब्रीज, कंट्री सर्व्हे, व ३७४, ग्रेटर कैलाश, पार्ट १, नवीन दिल्ली यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग | २००१ | ४८-२०-०० | ६.९५ |

या मिळकतीपैकी सुमित सालवान व शेफाली सालवान यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील १९-२०-०० आर.चौ.मी. क्षेत्राबाबत.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६
अशिलाची सही.

सही /-
**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं.५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर
ता. अलिबाग, जि. रायगड

दिनांक : ३१ जुलै २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| सुनिता वसंत देशमुख | १९ | २ | ०-६५-६० | २ | ८१ |
| | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर २५ पॉ ०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ३१/०७/२०२६

## जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना **जाहीर सूचना देण्यात येते की,** आमच्या अशीलाच्या वतीने आम्ही **(१) अब्बास अमजदअली सय्यद आणि (२) कासमअली अमजदअली सय्यद** यांचे खालील मालमत्तेवरील मालकी हक्क, स्वामित्व हक्क, हक्क, अधिकार व हितसंबंध यांची चौकशी व पडताळणी करीत आहोत. सदर मालमत्ता म्हणजे **गट क्र. २२६** या एकूण ००-३५-१० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ३,५१० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या कृषी जमिनीपैकी ००-०५-०० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ५०५.८६ चौरस मीटर क्षेत्रफळाचा भाग असून, ती मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स्थित असून, खालील **अनुसूचीमध्ये** अधिक विशेषतः वर्णन केलेली आहे (यापुढे सदर मालमत्ता असा उल्लेख करण्यात येईल).

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा/संस्थेचा विक्री, सामंजस्य करार, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, भार, बोजा, भाडेकरार, पोटभाडेकरार, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, गहाण (समन्यायी अथवा अन्य प्रकारचे), वारसा, वहिवाट, ताबा, कब्जा, वाटणी, हिस्सा, बक्षीस, मृत्युपत्राद्वारे हस्तांतरण, धारणाधिकार, भार, देयके, विकास हक्क, देखभाल हक्क, सुखाधिकार, विश्वस्त हक्क, करारातील अटी, मुक्तता, हक्कत्याग किंवा कोणत्याही प्रकारच्या करार, करारनामा, दस्त, लेखी कागदपत्र, हस्तांतरणपत्र, मृत्युपत्र, इच्छापत्रातील तरतूद, वारसा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायालयीन वाद, न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल प्राधिकरण किंवा वैधानिक प्राधिकरणाचा हुकूम, आदेश, निवाडा, लवाद अथवा इतर कोणत्याही प्रकारे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हिस्सा, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप किंवा मागणी असल्यास किंवा असल्याचा दावा करीत असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, त्यासंबंधित सर्व कागदोपत्री पुराव्यांच्या संपूर्ण व प्रमाणित सत्य प्रतींसह, खाली सही करणाऱ्यांकडे वन वर्ल्ड सेंटर, ७ वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ या पत्त्यावर तसेच monika.bhonsale@trilegal.com आणि uday.shah@trilegal.com या ई-मेल पत्त्यावर, या सूचनेच्या दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत पाठवाव्यात. अन्यथा, अशा व्यक्तीचा/संस्थेचा दावा, असल्यास, तो सोडून दिलेला आणि/किंवा त्याग केलेला समजला जाईल व तो कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील **गट क्र. २२६** (जुना गट क्र. २३१) या ००-३५-१० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ३,५१० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या कृषी जमिनीपैकी (भोगवटदार वर्ग -II जमीन) ००-०५-०० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ५०५.८६ चौरस मीटर क्षेत्रफळामधील अविभाजित हिस्सा, हक्क, मालकी हक्क व हितसंबंध, ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

उत्तर दिशेस : गट क्र. १९९
दक्षिण दिशेस : (जुना) गट क्र. २२८
पूर्व दिशेस : (जुना) गट क्र. २००
पश्चिम दिशेस : (जुना) गट क्र. ३४.

**आज दिनांक ३१ जुलै, २०२६**

**मोनिका भोसले**
**भागिदार,**
**ट्रायलिगल**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए,
सेनापती बापट मार्ग, लोअर परेल
(पश्चिम), मुंबई ४०००१३

## जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना **जाहीर सूचना देण्यात येते की,** आमच्या अशीलाच्या वतीने आम्ही **(१) अब्बास अमजदअली सय्यद आणि (२) कासमअली अमजदअली सय्यद** यांचे खालील मालमत्तेवरील मालकी हक्क, स्वामित्व हक्क, हक्क, अधिकार व हितसंबंध यांची चौकशी व पडताळणी करीत आहोत. सदर मालमत्ता म्हणजे **गट क्र. १८७** या एकूण ००-४३-५० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ४,३५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या मोठ्या कृषी जमिनीपैकी ००-०९-०० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ९१० चौरस मीटर क्षेत्रफळाचा भाग असून, ती मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स्थित असून, खालील **अनुसूचीमध्ये** अधिक विशेषतः वर्णन केलेली आहे (यापुढे "**सदर मालमत्ता**" असा उल्लेख करण्यात येईल).

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा/संस्थेचा विक्री, सामंजस्य करार, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, भार, बोजा, भाडेकरार, पोटभाडेकरार, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, गहाण (समन्यायी अथवा अन्य प्रकारचे), वारसा, ताबा, कब्जा, वाटणी, हिस्सा, बक्षीस, मृत्युपत्राद्वारे हस्तांतरण, धारणाधिकार, भार, देयके, विकास हक्क, देखभाल हक्क, सुखाधिकार, विश्वस्त हक्क, करारातील अटी, मुक्तता, हक्कत्याग किंवा कोणत्याही प्रकारच्या करार, करारनामा, दस्त, लेखी कागदपत्र, हस्तांतरणपत्र, मृत्युपत्र, इच्छापत्रातील तरतूद, वारसा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायालयीन वाद, न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल प्राधिकरण किंवा वैधानिक प्राधिकरणाचा हुकूम, आदेश, निवाडा, लवाद किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे, सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, स्वामित्व, हितसंबंध, दावा, आक्षेप अथवा मागणी असल्यास किंवा असल्याचा दावा करीत असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, त्यासंबंधित सर्व कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह, खाली सही करणाऱ्यांकडे वन वर्ल्ड सेंटर, ७ वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ या पत्त्यावर तसेच monika.bhonsale@trilegal.com आणि uday.shah@trilegal.com या ई-मेल पत्त्यावर, या सूचनेच्या दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत पाठवावी. अन्यथा, अशा व्यक्तीचा/संस्थेचा दावा, असल्यास, तो कायमस्वरूपी सोडून दिलेला आणि/ किंवा त्याग केलेला समजला जाईल व तो कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील **गट क्र. १८७** (जुना गट क्र. २००) या ००-४३-५० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ४,३५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या कृषी जमिनीपैकी (भोगवटदार वर्ग -II जमीन) ००-०९-०० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच अंदाजे ९१० चौरस मीटर क्षेत्रफळामधील अविभाजित हिस्सा, हक्क, मालकी हक्क व हितसंबंध, ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

उत्तर दिशेस : गट क्र. १९६
दक्षिण दिशेस : (जुना) गट क्र. २२७
पूर्व दिशेस : गट क्र. १९३
पश्चिम दिशेस : गट क्र. २२६.

**आज दिनांक ३१ जुलै, २०२६**

**मोनिका भोसले**
**भागिदार,**
**ट्रायलिगल**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए,
सेनापती बापट मार्ग, लोअर परेल
(पश्चिम), मुंबई ४०००१३

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांच्यामार्फत खालील कामासाठी खुल्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. **कामाचे नाव**: रत्नागिरी विभागात एटीडी ओव्हरहॉलिंग सेंटरची निर्मिती/स्थापना तसेच टीआरडी डेपो (माणगाव, चिपळूण, रत्नागिरी आणि कणकवली) येथील विद्यमान पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा. **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/19ए/2026, दिनांक : 31.07.2026. अंदाजित किंमत**: रु. 41,96,200/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु. 83,900/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे). **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 21.08.2026, 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा रेल्वेची वेबसाइट (**www.ireps.gov.in**) पाहावी.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे पाचखडकवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पाचखडकवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) शशिकांत शिवराम म्हात्रे<br>२) रेश्मा गणपत पाटील | ५ | ८ | १-१७-००<br>पो.ख. ०-७०-००<br>१-८७-०० | ०.७८ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तिने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ३१/०७/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ. सोसायटी, शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अभय आत्माराम दळवी, रा. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मल्याण ता.अलिबाग | ३९८/१ | ०-८२-६०<br>पो.ख.०-०६-००<br>०-८८-६० | १२-१८ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. यप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. ३०-०७-२०२६.

**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु ब्राम्हण आळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या आशीलांनी मौजे अंधार आळी, रोहा नगरपरिषद विभाग १/८, ता. रोहा येथील सिटी सर्वे नं. ८५८ या मिळकतीवर असलेल्या 'चंद्रहार अपार्टमेंट' या इमारतीचे पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र.४ अश्विनी चिराग डेरे वडके, रा. रोहा, ता.रोहा, जि.रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची निवासी सदनिका (पार्किंग सहित) मिळकत खरेदी करण्याचे ठरवले आहे.

**: मिळकतीचे वर्णन :**

| मौजे | मालमत्ता क्रमांक | जुना मालमत्ता क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|---|
| रोहा नगरपरिषद, ता.रोहा, जि.रायगड. | ROH000002403 | P3CAND000089 | ७०६ चौ.फुट (इतके चटई क्षेत्र) |
| पार्किंग क्षेत्र ११.२५ चौ. मी. (५०* ४.५० चौ. मी.) | | | |

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वाहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशीलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागवून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : - रोहा
दिनांक :- ३०/०७/२०२६

सही/-
**ॲड. नितेश पा.ठाकूर**
मो. ८९८३४५८३६०
(कार्यालयीन पत्ता : ठाकूर अँड असोसिएटस, ए- २०३, वसंतपुष्प को.ऑप.हौ.सो.लि. अलिबाग-रायगड)

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. अमर तुकाराम मिसाळ यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे -चिंचवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| १६ | १/इ | ०.२६.८० पो.ख.०.०८.६० एकूण ०.३५.४० मिळकतीचे खरेदीखत | ०.८० |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : ३१/०७/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम.एल.एल.बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

मौजे सुरई, ता. मुरुड, जि रायगड येथील भुमापन क्रमांक ९, क्षेत्र ०-२०-८० (हे आर.), आकार ३ रु. ५७ पैसे ही भातशेती मिळकत (नियंत्रित सत्ता प्रकारची) मिळकतीचे विद्यमान कबजेदार खैरुनीसा हुसेनमीया दळवी व मिळकतीचे इतर सहमालक यांचे मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदर मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांजकडुन आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी मिळकतीचे विद्यमान कबजेदार व आमचे अशिल यांच्यात झालेली आहेत. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार खैरुनीसा हुसेनमीया दळवी वगैरे यांचाच आहे, असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त अन्न वस्त्राचा बोजा वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार "खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट" यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार यांचाच आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. ३०/०७/२०२६

**ॲड श्रद्धा प्रदीप वैद्य**
"नागेश्वर भुवन"
गणपती आळी, मु.पो.नागांव,
ता.अलिबाग, जिल्हा रायगड.
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

## नि|व|ड|क



### विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा

**चणेरा** : दोस्ती ग्रुपचे सदस्य तथा लाढंर गावचे सामाजिक कार्यकर्ते सुयोग जाधव यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त लांढर येथील राजीप शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप केले. तसेच, कालवा रोडलगत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी रोहा प्रेस क्लबचे उपाध्यक्ष जितेंद्र जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. ‘‘मोबाईल आणि टीव्हीवर वेळ वाया घालविण्यापेक्षा दररोज वाचन, लेखन, मैदानी खेळ आणि आईला घरकामात मदत करण्यासाठी वेळ द्या. चांगले मित्र, चांगले विचार आणि समाजसेवेची भावना जोपासा,‘‘ असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. या कार्यक्रमाला शिक्षक पाटील, श्वेता शिर्के, रिद्धी पेटकर, समिरा पार्टे, ऋतुजा मगर, नेत्रा सालस्कर यांच्यासह विपुल भगत, संदेश भगत, सिधू धवडेकर, परमेश्वर भगत, जगन शिंदे, भाई पेटकर, अनुप पडवळ, अक्षय बामणे, मोहन शिंदे, विश्वास भगत, नवनिता पेटकर, कैलास माने, जयवंत नांदे, यशवंत शिंदे तसेच पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### वर्षावास प्रवचन मालिकेचा शुभारंभ

**महाड** : दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा, रायगड जिल्हा दक्षिण तसेच महाड तालुका पुरुष व महिला कार्यकारिणी यांच्या सहकार्याने बुधवारी (दि.२९) महाड येथील गांधारपाळे बुद्धलेणी येथे वर्षावास प्रवचन मालिकेचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला. बौद्ध संस्कृतीचा वारसा जपत भगवान गौतम बुद्धांच्या धम्माचा प्रसार आणि ऐतिहासिक बुद्धलेण्यांचे जतन व संवर्धन हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे माजी पर्यटन सचिव संजय सोनावणे गुरुजी यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे उद्घाटन संतोष जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. तर नवनीत साळवी, सरचिटणीस रायगड जिल्हा दक्षिण यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. यावेळी अस्मिता जाधव, मनीषा मोरे, चंद्रकांत गायकवाड, सुषमा साळवी, नितीन मोरे, संगीता तांबे तसेच बेबी जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### महिला मंडळाकडून गौरी पूजन

**पोलादपूर** : शहरातील दशानेमा गुजराती समाज महिला मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही गौरी पूजन सप्ताह आयोजित करण्यात आला. आषाढ महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणाऱ्या गौरी पूजन सप्ताहाच्या प्रारंभी शुक्रवारी (दि.२४) सायंकाळी बाजारपेठेतील मारुती मंदिरामध्ये सात प्रकारची धान्य पेरुन गौरीचे आवाहन करण्यात आले. त्यानंतर पूर्ण सप्ताह काळात रोज संध्याकाळी गौरीमातेची आरती व पूजन करून गुरुपौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी बाजारपेठेतून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. रात्री गौरीमातेचा जागर करताना महिलांनी विविध पारंपरिक खेळ सादर केले. त्यामध्ये बसफुगडी, फुगडी, गरबा, किस बाई किस असे अनेक पारंपरिक खेळ समाविष्ट होते. गुरुवारी (दि.३०) सकाळी उत्तरपूजा करून गौरीविसर्जन करून महिलांनी व्रत पूर्ण केले. यावेळी दशानेमा गुजराती समाज महिला मंडळाच्या केतकी शेठ, अर्चना शेठ, प्रिती बुटाला, मीना मपारा, किर्ती शेठ, पूजा शहा, मृगया शहा, स्वरूपा तलाठी, सुलभा शेठ, विणा शेठ तसेच नगराध्यक्षा अश्विनी गांधी, नयना शेठ, सुरेखा शेठ, निमा शेठ, नेहा शेठ, भारती बुटाला, गुलाब शेठ आदींसह असंख्य महिला गौरी पूजन सप्ताहात सहभागी झाल्या.

# श्रीवर्धनमधील बागायतदार संकटात

## • वादळी वाऱ्यामुळे केळी पिकाचे नुकसान



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

**गेल्या काही दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यात सुरू असलेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे बागायतदारांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत तालुक्यातील हक्काचे आर्थिक उत्पन्न देणारे वेलची, मुठळी आणि पायपोशी या जातीच्या केळीचे पीक अनेक वाड्यातून भुईसपाट झाले आहे.**

श्रीवर्धन तालुक्यातील काळ्याभोर आणि सुपीक मातीत नारळ-सुपारीच्या बागांमध्ये आंतरपीक म्हणून या केळींची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. यावेळी योग्य प्रकारे वाढ होत असलेले केळीचे केळंबे वादळी वाऱ्यामुळे वाड्यांमधून भूईसपाट झाले आहेत. अनेक ठिकाणी केळंब्यांवर तयार होत असणारे केळीचे लोंगर फेकून देण्याशिवाय बागायतदारांसमोर दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही. या नुकसानीचा मोठा फटका तालुक्यातील अर्थकारणाला बसला आहे. मुठळी, वेलची आणि पायपोशी या केळी पीकावर महिला वर्गाचेही गृहउद्योग अवलंबून असल्याने त्यांच्या हाताचे काम देखील थांबले आहे.

तसेच, कोकण पट्ट्यात शुभकार्यावेळी घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर लोंगरासह केळीचे केळंबे लावण्याची सांस्कृतिक परंपरा आहे; मात्र, समृद्धीचे प्रतीक मानले जाणारे केळंबे वाऱ्याने कोलमडून पडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. श्रीवर्धन तालुक्यात केळी पीकांचे उत्पादनक्षम हेक्टरी क्षेत्र २६५.२५ इतके असून, वादळी वाऱ्यामुळे ९०.१४ हेक्टरी क्षेत्रातील केळंब्यांची पडझड होऊन बागायतदारांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाने बागायतदारांना आर्थिक मदत द्यावी, अशी अपेक्षा तालुक्यातील बागायतदारांकडून केली जात आहे.

> “यावेळी बेफाम वाऱ्यामुळे अनेक केळींचे केळंबे बुंद्यासकट पडले. त्यामध्ये आमचे देखील मोठे नुकसान झाले आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून त्वरीत पंचनामा करण्यात यावा व आम्हाला शासनाकडून भरपाई मिळावी.”
>
> – यशवंत शिंदे, बागायतदार, केळस्कर पाखाडी

### झूल परिधान केलेल्या बकऱ्यांचे आकर्षण

**पोलादपूर** : गेल्या काही दिवसांपासून पोलादपूर तालुक्यातील पळचिल भागात बकऱ्यांना चक्क झुल पांघरल्याचे दृश्य पाहायला मिळत आहे. रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेल्या कशेडी घाटातील सह्याद्री पर्वत रांगेतील पळचिल गावातील माजी सरपंच वैशाली जाधव यांच्या बकऱ्यांचा कळप येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील हिरव्यागार गवतावर चरण्यासाठी नेहमीच येतात. मात्र, या सर्व बकऱ्यांना रंगीबेरंगी आकर्षक झुल पांघरल्याचे दिसून आले. याबाबत, माजी सरपंच वैशाली जाधव यांनी पावसाळ्यात जेव्हा हवेमध्ये गारवा वाढतो; त्याकाळात बकऱ्यांच्या केसाळ लोकरीमध्ये पावसाचे पाणी शिरून बकऱ्या अधिक गारठतात. अशावेळी बकऱ्यांना स्वच्छ व कोरडे पुसून जुन्या कापडांपासून गोधडीप्रमाणे झुलीसारखे वस्त्र शिवून त्यांच्या पाठीवर टाकल्यास त्यांच्यात उबदारपणा टिकून राहतो, अशी माहिती दिली.

## प्री स्कूलमध्ये ग्रँडपॅरेन्टस् डे उत्साहात

**| उरण | प्रतिनिधी |**

युईएस लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री स्कूलमध्ये बुधवारी (दि.२९) गुरुपौर्णिमा प्रित्यर्थ ग्रँडपॅरेन्टस् डे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वैजनाथ म्हात्रे व मनिषा म्हात्रे यांच्यासह व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, ॲड. अपूर्वा ठाकूर, प्राचार्या सिमरन दहिया, तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, सर्व शिक्षिका, आजी-आजोबा आणि त्यांची नातवंडे उपस्थित होते.



पूर्व प्राथमिक विभागाच्या एका शिक्षिकेने आजी-आजोबांची महती सांगून त्यांच्याविषयी आदर व्यक्त केला. त्यानंतर वैजनाथ म्हात्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेबद्दल गौरवोद्गार काढले. उपस्थितांमधून काही आजी-आजोबांनी आपले मनोगत व्यक्त केले व असा कार्यक्रम आयोजित केल्याबददल संपूर्ण यु.ई.एस. परिवाराचे आभार मानले. तसेच, काही आजींनी सुंदर गीत सादर करुन सर्वांची मने जिंकली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी आजी-आजोबांसाठी मनोरंजक खेळाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा आनंद उपस्थित सर्वांनी मनमुराद लुटला.

### नियोजशुन्य कारभाराचा वीज ग्राहकांना फटका

**उरण** : तालुक्यातील गावांमध्ये रात्री, अपरात्री वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे ग्रामस्थांचा संताप शिगेला पोहोचला आहे. त्यामुळे महावितरणच्या नियोजनशून्य कारभारामुळे ग्रामीण भागातील नागरिक अक्षरशः वेठीस धरले जात असल्याचा आरोप होत आहे. त्यातच विज बिल मात्र भरमसाठ येत असताना लोकप्रतिनिधी मात्र मुक गिळून गप्प बसले असल्याने उरणच्या नागरिकांना वाली कोण, असा प्रश्न जनमानसात उपस्थित केला जात आहे.

## प्रभाकर तांडेल यांची शहर अध्यक्षपदी नियुक्ती

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि रोहा तालुकाध्यक्ष साईनाथ धुळे यांच्या शिफारशीनुसार नागोठण्यातील प्रभाकर तांडेल यांची काही दिवसांपूर्वी मनसेच्या नागोठणे शहर अध्यक्षपदी नियुक्ती केली होती. त्यांना नुकतेच नियुक्तीचे पत्र मनसेच्या पेण येथील मध्यवर्ती कार्यालयात मध्य रायगड जिल्हाध्यक्ष बाळाशेठ म्हात्रे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी जिल्हा संपर्क अध्यक्ष योगेश परुळेकर, मनसे वाहतूक सेना अध्यक्ष संजय नाईक, रोहा तालुकाध्यक्ष साईनाथ धुळे, रोहा महिला अध्यक्षा दीपेश्री



घासे तसेच पक्षाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते. त्यानंतर प्रभाकर तांडेल यांनी प्रसार माध्यमांसाजवळ आपल्या भावना व्यक्त केल्या. या निवडीबद्दल मनसेचे संदीप देशपांडे, योगेश परुळेकर व राजेश येरुळकर यांनी प्रभाकर तांडेल यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## सार्वजनिक वाचनालयाचा शुभारंभ



**| माथेरान | प्रतिनिधी |**

इंदिरानगर येथील श्री गणेश मंदिरात सार्वजनिक वाचनालयाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला. नगरसेवक केतन रामाणे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थी, युवक आणि नागरिकांमध्ये वाचन संस्कृतीला चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे उद्घाटन जयश्री सावंत, विदुला गोसावी आणि सुनील कदम यांच्या हस्ते झाले. यावेळी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नगरसेवक मनोज खेडकर, गटनेते शिवाजी शिंदे, शिक्षण सभापती सुनील शिंदे, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, सोहेल महापुळे, नगरसेविका रिजवाना शेख, कमल गायकवाड, ऐश्वर्या शिंदे, सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा, निखिल शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.

## कडधान्य प्रक्रिया केंद्रांसाठी अनुदान

**| माणगाव | प्रतिनिधी |**

कडधान्य पिकांचे मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी विभागाने काढणी पश्चात पायाभूत सुविधा उभारणीचे महत्त्वाकांक्षी धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग केंद्र उभारणीसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये प्रति केंद्र, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान दिले जाणार आहे, अशी माहिती माणगाव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांनी दिली.

त्यामुळे कडधान्य मूल्य साखळी अधिक सक्षम होऊन शेतकऱ्यांना उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होईल. शेतकरी उत्पादक संस्था, क्लस्टर स्तर महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था



तसेच वैयक्तिक उद्योजक व अन्य पात्र संस्था या योजनेचा लाभ घेऊ शकतील. गट स्वरूपातील लाभार्थ्यांसाठी संबंधित संस्था किमान दोन वर्षे विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असणे आवश्यक असून, प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम व कार्यभांडवला साठी लागणारी मार्जिन रक्कम स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असणे बंधनकारक आहे. वैयक्तिक अर्जदाराचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असावे लागेल आणि एका कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीस लाभ मंजूर केला जाईल. अनुसूचित जाती जमाती, महिला, डोंगराळ भाग तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील अर्जदारांना प्राधान्य दिले जाईल. अनुदान केवळ यंत्रसामग्री खरेदी तसेच इमारत, गोदाम व साठवण सुविधा बांधकामासाठीच वापरता येईल; जमीन, वीज व मनुष्यबळ खर्चासाठी अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. बांधकामासाठीच्या अनुदानाची मर्यादा एकूण पात्र अनुदानाच्या ३० टक्क्यांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. उर्वरित खर्च स्वतःचे भांडवल, बँक अथवा वित्तीय संस्थांकडील मुदत कर्ज, कृषी पायाभूत सुविधा निधी तसेच ग्रामीण विकास व सूक्ष्म उद्योग योजनांतील अनुदानाच्या माध्यमातून उभारावा लागेल. या योजनेसाठी बँक कर्ज घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

## हिपॅटायटिस बी तपासणी शिबीर



**| रसायनी | प्रतिनिधी |**

हिपॅटायटिस दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल्सने सिप्लाच्या सहकार्याने रुग्णालयातील वेलनेस लाउंजमध्ये हिपॅटायटिस बी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत सिप्लातर्फे जवळपास ५०० हिपॅटायटिस बी संबंधीत तपासण्या मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. तपासणीची जबाबदारी सिप्लाने सांभाळली असून, मेडिकव्हर हॉस्पिटल्सने शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिली. रुग्णालयातील कर्मचारी, डॉक्टर, कंत्राटी कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांना या मोफत तपासणीचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या तपासणी शिबिराचा उद्देश हिपॅटायटिस बीविषयी जनजागृती करणे, स्वतःची संसर्गस्थिती जाणून घेण्यासाठी तपासणीस प्रोत्साहन देणे आणि आवश्यकतेनुसार वेळीच वैद्यकीय सल्ला घेण्यास प्रवृत्त करणे हा होता.

### पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड-जांभूळपाडाच्यावतीने पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांची दखल घेत विविध उपक्रम राबविण्यात आले. अलीकडील पुरामुळे जांभूळपाडा व हेदवली येथील अंगणवाड्यांमधील अनेक विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य नुकसानग्रस्त झाले होते. ही बाब लक्षात घेऊन दोन्ही अंगणवाड्यांतील विद्यार्थ्यांना नवीन शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या शिक्षणाचा प्रवास पुन्हा सुरळीत होण्यास मदत झाली.

## हिकलला इकोव्हॅडिस गोल्ड मेडल

**| महाड | प्रतिनिधी |**

जागतिक औषधनिर्माण (फार्मास्युटिकल), पीक संरक्षण (क्रॉप प्रोटेक्शन) आणि विशेष रसायन क्षेत्रातील अग्रगण्य भागीदार हिकल लिमिटेडला इकोव्हॅडिस गोल्ड मेडल रेटिंग प्रदान करण्यात आले आहे. या सन्मानासह कंपनी इकोव्हॅडिसकडून दरवर्षी जागतिक स्तरावर मूल्यांकन केल्या जाणाऱ्या १,७५,००० हून अधिक कंपन्यांपैकी अव्वल ५ टक्के कंपन्यांमध्ये स्थान मिळवणारी कंपनी ठरली आहे.

इकोव्हॅडिसच्या मूल्यांकनात हिकलने ८४/१०० गुण मिळवत ९७ व्या पर्सेंटाइलमध्ये स्थान मिळवले आहे. कंपनी ८५/१०० गुणांच्या प्लॅटिनम मेडलच्या निकषापासून केवळ एका गुणाने मागे राहिली असून, पुढील मूल्यांकन चक्रात हा टप्पा गाठण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. इकोव्हॅडिस ही व्यवसायांच्या शाश्वतता (सस्टेनेबिलिटी) कामगिरीचे मूल्यांकन करणारी जगातील सर्वात मोठी संस्था असून ती १८५ हून अधिक देशांतील आणि २५० पेक्षा अधिक उद्योगांतील संस्थांचे मूल्यांकन करते. हा सन्मान शाश्वत व्यावसायिक पद्धतींबाबत हिकलची सातत्यपूर्ण बांधिलकी आणि इकोव्हॅडिस मूल्यांकनातील पर्यावरण, कामगार व मानवी हक्क, नैतिकता आणि शाश्वत खरेदी या चार प्रमुख स्तंभांमध्ये कंपनीने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे प्रतीक आहे. ही रेटिंग विशेषतः जागतिक लाइफ सायन्सेस आणि विशेष रसायन पुरवठा साखळीत कार्यरत कंपन्यांसाठी महत्त्वाची आहे. कारण ग्राहक आता त्यांच्या पुरवठादारांकडून शाश्वतता, नैतिकता, कामगार धोरणे आणि जबाबदार स्रोत व्यवस्थापन या बाबतीत मोजता येण्याजोगी प्रगती अपेक्षित ठेवत आहेत.

**पाच्छापूर विद्यालयाचा नाविन्यपूर्ण उपक्रम | घेतला भात लागवडीचा अनुभव**

# विद्यार्थ्यांनी गिरवले शेतीचे धडे

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

ग्रामीण जीवन, शेतीचे महत्त्व आणि श्रमसंस्कार यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने पाच्छापूर येथील माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि.२७) भात लागवडीचा प्रत्यक्ष अनुभव देणारा नाविन्यपूर्ण उपक्रम अत्यंत उत्साहात राबविण्यात आला. पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष कृतीची जोड देत राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



(छायाचित्र, गौसखान पठाण)

या उपक्रमांतर्गत पाच्छापूर गावातील शेतकरी रघुनाथ जगताप यांच्या शेतामध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उतरून भात रोपांची लागवड केली. यावेळी रघुनाथ जगताप यांनी विद्यार्थ्यांना भात लागवडीची योग्य पद्धत, रोपांमधील योग्य अंतररचना आणि लागवडीतील विविध तांत्रिक बारकावे यांचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतः चिखलात उतरून लागवड करण्याचा आनंद लुटला. जगताप यांनी अत्यंत संयमाने आणि आपुलकीने विद्यार्थ्यांना शेतीचे मोल समजावून सांगितले. या प्रात्यक्षिक अनुभवातून विद्यार्थ्यांना कष्टाचे मूल्य, निसर्गाशी असणारे नाते आणि अन्नधान्य निर्मितीमागे असणारे शेतकऱ्यांचे अथक परिश्रम या बाबी प्रत्यक्ष शिकायला मिळाल्या. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हा अनुभव अत्यंत आनंददायी व प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. दरम्यान, विद्यालयाच्यावतीने रघुनाथ जगताप यांचे विशेष आभार मानण्यात आले. ग्रामीण संस्कृती, शेतीविषयीची आत्मीयता आणि अनुभवाधारित शिक्षण यांचा सुरेख संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले जात आहे.

> “**पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, पर्यावरण संवर्धनाची भावना आणि शेतीविषयी आदर निर्माण होण्यास मदत होते.**”
>
> **– दिपक माळी, मुख्याध्यापक**

### नरेंद्र घाडगेंची राज्य कौन्सिलरपदी निवड

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष नरेंद्र घाडगे यांची महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या राज्य कौन्सिलरपदी निवड करण्यात आली आहे.



घाडगे यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. नरेंद्र घाडगे यांनी रायगड जिल्ह्यातील विविध गावातील ग्रामपंचायतीमध्ये प्रभावीपणे व चांगले काम केले आहे. शासनाच्या ग्रामपंचायतमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ अनेक लाभार्थ्यांना त्यांनी मिळवून दिला आहे. शिवाय ग्रामपंचायतीत शासनाच्या विविध कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी करून जनतेच्या सेवेशी तत्पर या उक्तीप्रमाणे ते ग्रामस्थांना सेवा देत असतात. माणगाव तालुका ग्रामपंचायत अधिकारी म्हणूनही त्यांनी चांगले काम केले आहे. सध्या ते माणगाव तालुक्यातील लोणेरे, चिंचवली, भागाड या ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कामकाज पाहत आहेत. सेवेशी तत्पर असणारे व ग्रामपंचायतींचा कारभार व्यवस्थितपणे हाताळणारे नरेंद्र घाडगे यांना माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे आदर्श ग्रामसेवक पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे.



## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाचे करार आज नकोत. मानसिक अस्वस्थता जाणवेल. रागावर योग्य नियंत्रण ठेवायला हवं.
- **वृषभ** : भागीदारी व्यवसायात मतभेद संभवतात. आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. विद्यार्थ्यांना यश लाभेल.
- **मिथुन** : महत्त्वाचे निर्णय घाईने घेऊ नका. व्यवसायात साधारण स्थिती राहील. थोरांच्या भेटी होतील.
- **कर्क** : आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. विचारपूर्वक बोलणं हिताचं ठरेल. कार्याचा विस्तार होईल.
- **सिंह** : उत्तम प्राप्तीचे योग आहेत. कार्यात मनापासून सातत्य राखावं. यंत्र, वाहनांचा वापर जपून करावा.
- **कन्या** : महत्त्वाचे व्यवहार लांबणीवर टाकावे. प्रवासात विशेष काळजी घ्यावी. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **तूळ** : उपासना, दानधर्माकडे ओढा राहील. अनावश्यक खर्चाला आवर घाला. विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल.
- **वृश्चिक** : रखडलेली कामं मार्गी लागतील. मनाप्रमाणे सारं साध्य करता येईल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **धनु** : इतरांच्या आग्रहाला बळी पडू नका. कार्यकर्तृत्त्वातून प्रगतीला वाव मिळेल. ज्येष्ठांची काळजी घ्यावी.
- **मकर** : व्यवहारात अडचणी येतील. कौटुंबिक वाद-विवादामुळे ताण वाढेल. शनिची उपासना करायला हवी.
- **कुंभ** : दूरचे प्रवास शक्यतो टाळा. व्यवसायात नवे बदल तुर्तास नको. आर्थिक स्थिती साधारण राहील.
- **मीन** : कठीण आव्हानं पेलता येतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. धार्मिक कार्याकडे ओढा राहील.

स्टाईल स्टेटमेंट

## स्टायलिश पफ स्लीव्हज

पफ स्लीव्हज हा प्रकार सध्या ट्रेंडमध्ये आहे. पूर्वी फक्त पारंपरिक कपड्यांमध्ये पफ स्लीव्हजची फॅशन केली जायची. पण आता वेस्टर्नवेअरमध्येही पफ स्लीव्हजची फॅशन आहे. पफ स्लीव्हवाले वेस्टर्न ड्रेस लोकप्रिय ठरत आहेत. शॉर्ट आणि लाँग ड्रेससह टॉप, शर्ट, मिडी ड्रेस आणि इव्हिनिंग गाऊनमध्येही पफ स्लीव्हची फॅशन पहायला मिळते. पफ स्लीव्हज ठराविक कापडापासून तयार करण्यात आलेल्या कपड्यांमध्येच शोभून दिसतात. कॉटनच्या कपड्यांमध्ये छोट्या पफ स्लीव्हज उठून दिसतात. पण बाह्या लांब ठेवायच्या असतील तर शिफॉन, नेट, क्रेप अशा फॅब्रिक्सची निवड करा. विविध प्रकारच्या शरीरयष्टीच्या महिलेवर पफ स्लीव्हज शोभून दिसतात. त्यामुळे पहिल्यांदाच हा प्रयोग करताना अजिबात घाबरू नका. छानसा पफ स्लीव्हचा टॉप खरेदी करा आणि जीन्ससोबत कॅरी करा. सडपातळ महिला कॉटन टॉप घालू शकतात. थोड्या स्थूल महिला क्रेप किंवा शिफॉन टॉप ट्राय करू शकतात. पोलका डॉट्स तसंच स्ट्राईप्सवर पफ स्लीव्हज खूप छान दिसतात. त्यामुळे थोडी वेगळी फॅशन ट्राय करायची असेल तर पफ स्लीवचा पर्याय निवडता येईल.

## ३१ जुलै

दिन विशेष

२०१४ : जनरल दलबीरसिंह सुहाग यांनी लष्करप्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली.
२०१५ : 'इसिस' या दहशतवादी संघटनेने लिबियाची राजधानी त्रिपोलीनजिकच्या सिरते येथून चार भारतीयांचं अपहरण केलं.
२०१७ : उत्तराखंडमधील चामोली जिल्ह्यात चीनची घुसखोरी.
२०१८ : न्या. बी. एच. लोया यांचा मृत्यू नैसर्गिक कारणांनी झाला होता, हा अहवाल मान्य करणाऱ्या निकालाचा फेरविचार करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

सफर देशांची

## विविधता जपणारा 'पपुआ न्यू गिनी'

'पपुआ न्यू गिनी' हा पॅसिफिक महासागरातला ६०० पेक्षा अधिक बेटांचा समूह असलेला देश आहे. हा भाग एकेकाळी ऑस्ट्रेलियाच्या ताब्यात होता. १९७५ मध्ये 'पपुआ न्यू गिनी'ला स्वातंत्र्य मिळालं. इथे ८५० प्रकारच्या भाषा आजही अस्तित्त्वात आहेत. इथल्या लोकांनी आपली संस्कृती आणि भाषेची जपणूक केली आहे. या देशातले फक्त १८ टक्के लोक शहरी भागात रहातात. इथे पर्यटकांची फार वर्दळ नसते. त्यामुळे इथला निसर्ग अजूनही शाबूत आहे. विविध प्राणी, पक्षी इथे सुखाने नांदताना दिसतात. या बेटावर ७५० प्रजातींचे पक्षी आहेत. त्यामुळे पक्षीप्रेमींसाठी हे स्थान नंदनवनच ठरतं. जगातला एकमेव विषारी पक्षी 'हुडेड पिटोहुई' या बेटांवर आढळतो. घनदाट जंगलांमुळे इथले लोक बाहेरच्या जगापासून बरेच लांब आहेत. रग्बी हा इथला लोकप्रिय खेळ आहे. पर्यटकांच्या कमी संख्येमुळे इथे पायाभूत सोयीसुविधांचा फारसा विकास झालेला नाही. 'पोर्ट मोर्सबाय' ही या देशाची राजधानी आहे. भौगोलिक वैविध्यामुळे इथे अनेक जागृत ज्वालामुखी आहेत. भूकंप, त्सुनामीसारख्या आपत्तीही या देशात येत असतात. असं असूनही 'पपुआ न्यू गिनी'ने आपलं वेगळेपण जपलं आहे.

### पंचांग

**शुक्रवार, ३१ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, आषाढ कृ. २, चंद्रराशी : मकर, नक्षत्र : धनिष्ठा, योग : सौभाग्य, सूर्योदय ६.१७, सूर्यास्त ७.१३

### फॉरवर्ड्स

**आज़ परछाईं सें पूंछ हीं लियां..
क्यों चलतीं हों मेरें साथ...**

**उसनें भीं हँसके कहाँ.. औऱ क़ौन
हैं.. तेरें साथ...!**

आरोग्यमंत्र

## कारले : एक अमृतफळ

कडू कारले, तुपात तळले, साखरेत घोळले, तरी कडू ते कडूच! अशी ओळख असणा-या कारल्याचं नाव ऐकताच जीभेची चव कडवट होते. पण कारल्याच्या कडूपणावर जाऊ नका. कारण कारल्याइतकी बहुगुणी भाजी दुसरी कोणती नसेल. ग्रीष्मात आढळणाऱ्या भाज्यांमध्ये कारले एक आहे. कारल्याची वेल बरीच वर्षे जगणारी असते ती बऱ्याच ठिकाणी आपोआप उगवलेली सुद्धा दिसते. चवीने कडू असलेले कारले हे आरोग्यासाठी अत्यंत हितावह आहे.



कारले भारतात सर्वत्र पिकते व अती प्राचीन काळापासून कारल्याचा उपयोग फळभाजी बरोबरच औषधातही केला जातो. संस्कृतमध्ये कंदुरा (करवल्ली), हिंदीमध्ये करेला, इंग्रजीमध्ये कॅरिला फ्रुट किंवा बिटर गोर्ड म्हणून ओळखले जाणारे कारले ही वनस्पती कुकरबिटेसी या कुळातील आहे. कारले हिरवट, पांढरसर, काळसर हिरव्या रंगांची आणि पिकल्यानंतर आतून लाल, केशरी होतात. कारली मोठी आणि लहान अशा दोन प्रकारची असतात तर रंगभेदामुळे कारल्याचे पांढरी, हिरवी असेही दोन प्रकार सबंध भारतात आढळतात. कारले सर्व सामान्य आहारामध्ये वापरले जात असले तरी ते एक उत्तम औषध म्हणून वैद्य पाहतात. हल्ली बाजारात मिळणारी हायब्रीड आणि मोठी कारली शक्यतो आहारात वापरू नयेत.भरपूर रेषा असणारी आणि मध्यम आकाराची कारली वापरावीत.

### वेगळ्या वाटा

इंजिनिअरींगची मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर विद्यार्थी नोकरी करू शकतात किंवा पीएचडी मिळवून पुढे जाऊ शकतात. अध्ययनाच्या क्षेत्रात करीअर करू इच्छिणारे, संशोधन क्षेत्रात जाणारे तसंच एखाद्या कंपनीच्या विकासाला हातभार लाऊ इच्छिणारे विद्यार्थी इंजिनिअरींगमध्ये पीएचडी करू शकतात. एमटेकचा किंवा दुसरा कोणताही विषय घेऊन तुम्ही पीएचडी करू शकता. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसारख्या संस्था पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फेलोशिप्स देतात.

**(क्रमश:)**

करिअरवाटा

## सारखी नोकरी बदलताय?

काळ बदलला की कार्यशैली आणि कामाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल घडतो. याच धर्तीवर सध्या एखादी नोकरी मिळाली की ती वर्षाभरातच सोडून दुसरी शोधण्याचा ट्रेंड आहे. याला जॉब हॉपिंग म्हणतात. तंत्रज्ञान सतत बदलत असल्यामुळे एका तंत्रज्ञानाचा कंटाळा आला की दुसऱ्या प्रकारच्या तंत्रज्ञानाशी संबंधित नोकरी करण्याकडे मुलांचा कल आहे. तरुण आहोत तोपर्यंत आणि नव्या नोकरीत स्वीकारले जाऊ शकतो तोपर्यंतच नव्या क्षेत्रात उडी मारावी असा विचार तरूणाई करत आहे. नोकरी करणाऱ्या तरुणांचा याबाबतचा कल जाणून घेतला असता असं दिसून येतं की, ७३ टक्के मुलांना वारंवार नोकरी बदलण्यात काही गैर वाटत नाही. काही मुलांना



आहे त्या नोकरीत आपल्या गुणवत्तेला म्हणावी तशी चालना मिळत नाही असं वाटतं. म्हणून ते नोकरी बदलतात. ही बाब आज आक्षेपार्ह समजली जात नसली तरीही त्यात एक धोका आहे. एखादा तरुण एखाद्या कंपनीत कामाला लागतो आणि वर्षा-दोन वर्षात बाहेर पडतो. अशानं तो सखोल ज्ञान प्राप्त करू शकत नाही. म्हणूनच असे लोक कोणत्याही तंत्रज्ञानात निष्णात होऊ शकत नाहीत. हा जॉब हॉपिंगचा दुष्परिणामही लक्षात घेण्यासारखा आहे.

खेचाखेची

## गड गड करी

**मैकेनिक** – क्या हुआ बाइक को?

**ग्राहक** – पता नहीं भैया, गड़ **गड़ करी** और बंद हो गई ...

वेगळं काही

ऑस्ट्रियातील ॲथलिट जोसेफ कोएबर्ग बर्फाने भरलेल्या पारदर्शक पेटीत जवळपास दोन तास बसला. ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्नामध्ये हा विक्रम नोंदवण्यात आला. जोसेफने बर्फाने भरलेल्या पेटीत दोन तास आठ मिनिटं आणि ४७ सेकंद घालवली. जोसेफ पेटीत बसल्यानंतर त्याच्या खांद्यांपर्यंत बर्फ भरण्यात आला. यावेळी त्याने फक्त स्वीम सूट घातला होता. अशा थंडगार वातावरणात काही सेकंद घालवल्यानंतर हुडहुरी भरू लागते. मात्र जोसेफ तब्बल दोन तास तिथे होता. या आधी चिनी ॲथलिट जिन सोंगहाओने बर्फात बसण्याचा विक्रम केला होता. तो ५३ मिनिटं आणि दहा सेकंद बर्फात बसला. त्याचा हा विक्रम जोसेफने मोडला.

जाणून घ्या

## स्टेटमेंट शोल्डर ड्रेसची चलती

सेलिब्रिटींची फॅशन फॉलो करणं हा फार पूर्वीपासून लोकांचा कल राहिलेला आहे. सध्या ट्रेंड आहे स्टेटमेंट शोल्डर ड्रेसचा. या ट्रेंडविषयी...



* कोल्ड शोल्डर टॉप– कोल्ड शोल्डर टॉप ही लोअर बॉडीपेक्षा मान आणि खांदा हायलाईट करणारी स्टाईल आहे. कर्वी आणि बस्टी बॉडीसाठी हा पॅटर्न योग्य आहे.
* ऑफ शोल्डर टॉप– थोडीशी बोल्ड तरीही लोकप्रिय अशी ही स्टाईल आहे. शर्ट, टॉप, बिकिनी, ब्रायडल ड्रेस, मॅक्सी या सगळ्या प्रकारांवर अधिराज्य गाजवणारी स्टाईल म्हणजे ऑफ शोल्डर स्टेटमेंट.
* असिमेट्रिकल शोल्डर टॉप– शोल्डर आणि बॉटम यांच्यात संतुलन असावं यासाठी असिमेट्रिकल टॉप परिधान करा. तुमचा लूक पूर्ण व्हावा यासाठी मेटॅलिक रिस्ट वॉच, सौम्य रंगाची पर्स निवडा. यामुळे स्टायलिश लूक मिळेल.
* वन शोल्डर ड्रेस– पार्टीसाठी स्टेटमेंट शोल्डर ड्रेसची निवड करणार असाल तर वन शोल्डर ड्रेस हा सर्वोत्तम पर्याय आहे. या ड्रेसवर कमीत कमी ज्वेलरीचा वापर करावा.

## सुडोकू १३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | ६ | | | | ९ | |
| ४ | ७ | | | ५ | २ | | | |
| २ | ३ | ६ | ४ | १ | ९ | ५ | ८ | ७ |
| ७ | | | ५ | | ८ | ६ | ४ | |
| | | | | ९ | | | | |
| | ६ | ८ | १ | | ७ | | | २ |
| ९ | ८ | | | ६ | | | | ५ |
| | | | ९ | २ | | | ३ | ८ |
| | २ | | | | ४ | ७ | | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १ | २ |
| ६ | ७ | २ | १ | ९ | ५ | ३ | ४ | ८ |
| १ | ९ | ८ | ३ | ४ | २ | ५ | ६ | ७ |
| ८ | ५ | ९ | ७ | ६ | १ | ४ | २ | ३ |
| ४ | २ | ६ | ८ | ५ | ३ | ७ | ९ | १ |
| ७ | १ | ३ | ९ | २ | ४ | ८ | ५ | ६ |
| ९ | ६ | १ | ५ | ३ | ७ | २ | ८ | ४ |
| २ | ८ | ७ | ४ | १ | ९ | ६ | ३ | ५ |
| ३ | ४ | ५ | २ | ८ | ६ | १ | ७ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १३३



**आडवे शब्द :-**
१) साहित्यातील नऊ भावना
४) चांगल्या कामाप्रित्यर्थ दिलेली अल्प रक्कम
७) संतापी
१०) तरच्या बरोबरचा शब्द
११) स्तुतीस्तोत्र
१२) पाठवणी
१५) मांडणी
१६) गावाखालची जमीन
१८) जल
१९) स्वच्छ
२०) कापसाची बी
२३) देवकीचा भाऊ म्हणजे श्रीकृष्णाचा
****
२५) वल्लरी
२८) उंबरठा
३०) एक फळ
३२) लुबाडणारा, फसविणारा
३४) रतिचा पती
३७) उदा चे संपूर्ण रूप
३८) खटला
३९) जमिनीखाली येणारे फळ
४०) माझा
४२) साडीचा शेवटचा भाग
४४) गिरणीत काम करणारा
४६) शर्करा
४८) लोकसंख्येची मोजणी
५०) पराभव
५२) आपल्या राष्ट्रात तयार झालेले
५४) हिंदीत केस
५५) शाब्दिक भांडण, चर्चा
५८) राक्षस
५९) हाणामारी
६०) जोराचा शिडकावा, हबका
६१) मंदिर
६३) कट्टा
६४) पत्र
६६) फुरसत
६७) भेग, चीर
७०) नाकावरील एक छोटा दागिना
७२) देह धारण करणारा
७३) नवाकोरा
७६) नवरदेव
७७) सरसकट
७८) चिवट व कडक

**उभे शब्द :-**
१) दृष्टी
२) अधिक योग्यतेचा, श्रेष्ठ प्रतीचा
३) स्वस्त(ग्रा )
४) गळ्यामागचा प्रतिष्ठेचा अवयव
५) भूकंप
६) नूतन
७) नाचणी
८) फळाचे साल
९) पोरका
१२) बारा महिन्याचा काळ
१४) मवाळ धोरण
१७) पोते
२१) पोपट
२२) लहानच्या विरुद्ध
२४) पचपचीत, बेचव
२६) न नरमण्याचा स्वभाव
२७) विधानसभा आणि लोकसभा येथील लोकप्रतिनिधी
२९) गुरुचे काम, चातुर्य
३१) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
३३) मजबूत, भक्कम
३५) औषध
३६) रम्य
३७) पोट
४१) कणीसाला येणारे एक धान्य
४२) वेतन
४३) श्रीकृष्णाच्या वडिलांचे व आईचे नाव
४५) राजवाडा, मोठे घर
४७) लाकडी पादत्राण
४९) रोग पसरविणारा किटक
५१) ओवाळून टाकलेली वस्तू
५३) श्रीविष्णूचे एक नाव
५४) लहानसहान
५५) उपयोग
५६) प्रचंड, भव्य
५७) अडत्या
५९) सामान
६०) समतल
६२) उसाचे पीक, रिकामपण
६५) रसाच्या आंब्याची एक जात
६६) युद्ध
६८) रजक
६९) हिंदुस्थान
७०) स्वाद, रुची
७१) श्वसनेंद्रिय
७२) साडेसातीचा ग्रह
७३) केव्हा
७४) बाजू, कांठ
७५) वृक्ष

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# क्रिकेटमधील सुवर्णयुगाचा शेवट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारतीय कसोटी क्रिकेटमध्ये गेल्या दशकभरात भारताला घरच्या मैदानावर अपराजित ठेवण्यात आणि अनेक ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावणारे पाच दिग्गज खेळाडू आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाले आहेत. विराट कोहली, रोहित शर्मा, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे आणि रविचंद्रन अश्विन या पाचही खेळाडूंनी एकामागून एक क्रिकेटला अलविदा म्हटल्यामुळे भारतीय कसोटी क्रिकेटमधील एका 'सुवर्णयुगाचा शेवट' झाला असं म्हणू शकतो. गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय कसोटी संघाची ओळख या खेळाडूंमुळे होती. घरच्या मैदानावर भारताने सलग मालिका जिंकल्या, जगातील बलाढ्य संघांना पराभूत केले आणि कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानही मिळवले. या यशामागे या पाचही खेळाडूंचे मोठे योगदान होते.**



## कसोटी क्रिकेटचे पाच आधारस्तंभ निवृत्त

विराट कोहलीने आक्रमक नेतृत्व आणि सातत्यपूर्ण फलंदाजीच्या जोरावर भारतीय कसोटी क्रिकेटला वेगळी उंची मिळवून दिली. रोहित शर्माने सलामीवीर म्हणून अनेक महत्त्वाच्या खेळी करत संघाला भक्कम सुरुवात करून दिली. चेतेश्वर पुजारा संकटाच्या वेळी खंबीरपणे उभा राहत गोलंदाजांचा संयमाने सामना करत असे, अजिंक्य रहाणेने परदेशात अनेक संस्मरणीय खेळी केल्या आणि ऑस्ट्रेलियात भारताला ऐतिहासिक कसोटी मालिका जिंकून देत कर्णधार म्हणून वेगळी छाप सोडली. तर रविचंद्रन अश्विनने आपल्या फिरकीच्या जादूने घरच्या मैदानावर अनेक विक्रम करत भारताच्या विजयात मोठी भूमिका बजावली. या पाचही खेळाडूंनी मिळून भारतीय कसोटी क्रिकेटला अनेक अविस्मरणीय क्षण दिले. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघांविरुद्ध त्यांनी भारताला अनेक मोठे विजय मिळवून दिले. विशेष म्हणजे घरच्या मैदानावर भारताचं वर्चस्व कायम ठेवण्यात या खेळाडूंचा सिंहाचा वाटा होता.

आता या पाचपैकी फक्त रवींद्र जाडेजा भारतीय कसोटी संघात सक्रिय आहे. त्यामुळे भारतीय संघासाठी नव्या पिढीचे खेळाडू तयार करण्याचे मोठे आव्हान संघ व्यवस्थापनासमोर असणार आहे. शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, वैभव सूर्यवंशीसारख्या युवा खेळाडूंवर आता मोठी जबाबदारी असणार आहे.

### अजिंक्यची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

भारतीय कसोटी फलंदाजीचा एकेकाळचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या अजिंक्य रहाणेने क्रिकेटच्या सर्व प्रकारांतून निवृत्ती जाहीर केली आहे. ३८ वर्षीय रहाणेने आपला शेवटचा स्पर्धात्मक क्रिकेट सामना आयपीएल २०२६ दरम्यान खेळला होता. या अनुभवी फलंदाजाने अलीकडेच भारतीय संघात पुनरागमन करण्याची इच्छा व्यक्त केली होती, तरीही अखेरीस त्याने १७ वर्षांच्या आपल्या शानदार कारकिर्दीला पूर्णविराम दिला. रहाणेने भारतासाठी ८५ कसोटी, ९० एकदिवसीय आणि २० टी-२० सामने खेळले आहेत, तसेच सहा संघांकडून २१२ आयपीएल सामनेही खेळले आहेत. त्याने आपल्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ संदेश प्रसिद्ध करून हा निर्णय जाहीर केला.

# तृप्तीची कांस्यपदकाला गवसणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

गचिबावली स्टेडियम हैदराबाद येथे आयोजित ११ व्या अखिल भारतीय पोलीस ज्युडो क्लस्टर स्पर्धा २०२६ अंतर्गत झालेल्या तायक्कांदो स्पर्धेतील महिला ६७ किलो खालील वजनगटात महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडू तृप्ती तुषार सिनलकर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय पोलीस दल सहभागी झाले होते. यातील विजेते खेळाडू जागतिक पोलीस आणि फायर क्रीडा स्पर्धा २०२७, ऑस्ट्रेलिया करीता पात्र होणार आहेत.



स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यानंतरही तृप्ती यांनी हार न मानता जिद्द, चिकाटी आणि लढाऊ वृत्तीच्या जोरावर आपली लढत सुरू ठेवत कांस्यपदकावर नाव कोरले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाराष्ट्र पोलीस दलासह तायक्कांदो क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. याचबरोबर, शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे नुकत्याच झालेल्या ५व्या इंडिया तायक्कांदो पुमसे राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये तृप्ती सिनलकर, नुपूर पावगे आणि समृद्धी कापसे यांनी ३० वर्षांखालील महिला सांघिक पुमसे गटात उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक पटकावून आणखी एक राष्ट्रीय यश संपादन केले होते.

तृप्तीच्या या दुहेरी यशाबद्दल गुरुकुल तायक्कांदो अकॅडमीचे संस्थापक, जागतिक तायक्कांदो महासंघ मान्यताप्राप्त प्रशिक्षक तसेच आंतरराष्ट्रीय पंच आणि महाराष्ट्र पोलीस तायक्कांदो संघाचे प्रशिक्षक तुषार तानाजी सिनलकर, अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक रोहित तानाजी सिनलकर, सहाय्यक प्रशिक्षक प्रेम विलास पाटणे आणि महाराष्ट्र विशेषतः नवी मुंबई पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### मुंबई क्रिकेटच्या नवोदित प्रशिक्षकांना संदीप पाटील यांचा कानमंत्र

**मुंबई :** मुंबई क्रिकेट संघटनेत प्रशिक्षक आणि निवड समिती सदस्य म्हणून काम करणाऱ्या नव्या पिढीने कोणत्याही प्रकारच्या मस्काबाजीच्या मोहात न पडता गुणवत्तेलाच प्राधान्य द्यावे, असा स्पष्ट आणि परखड सल्ला माजी कसोटीपटू संदीप पाटील यांनी दिला. जिमखान्याचा गौरव, वैभव आणि शान टिकवायची असेल, तर जिमखान्यातील जास्तीत जास्त गुणवंत खेळाडूंना संधी कशी मिळेल, याचाच विचार करा. असे झाले तर मुंबई क्रिकेट अधिक समृद्ध होईल, असे ते म्हणाले.



जिमखान्याच्या पायऱ्यांवर बसून क्रिकेट पाहताना अजित वाडेकर, विजय मांजरेकर, रमाकांत देसाई, बाळू गुप्ते, सुभाष गुप्ते, पद्माकर शिवलकर आणि मनोहर हर्डीकर यांसारख्या दिग्गजांना जवळून पाहण्याची संधी मिळाली. त्यांना पाहता पाहताच क्रिकेटचे धडे मिळाले. हीच जिमखान्याची खरी परंपरा आणि ताकद आहे, असे ते म्हणाले. सध्याच्या जिमखान्याच्या कार्याचे कौतुक करताना त्यांनी प्रवीण अमरे आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. जिमखाना योग्य दिशेने वाटचाल करत आहे. ही परंपरा अशीच पुढे सुरू राहावी आणि मुंबई क्रिकेटला सातत्याने नवे गुणवंत खेळाडू मिळावेत,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### नेमारचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलला रामराम

**नवी दिल्ली :** ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमार ज्युनियरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तो आता ब्राझीलकडून खेळणार नाही. या ३४ वर्षीय फुटबॉलपटूने आपल्या संघासाठी सातत्याने चांगली कामगिरी केली. पण त्याला विश्वचषक जिंकण्यात अपयश आले. निवृत्तीची घोषणा केल्यानंतर तो आता भावूक झाला आहे.नुकत्याच संपन्न झालेल्या फिफा विश्वचषक २०२६ मध्ये ब्राझीलच्या संघाने चांगली कामगिरी केली नाही. स्पर्धेसाठी एक प्रबळ दावेदार मानला जाणारा हा संघ अव्वल चारमध्ये स्थान मिळवू शकला नाही. स्पर्धेदरम्यान नेमारला दुखापतीचाही सामना करावा लागला, ज्यामुळे तो बराच काळ बेंचवर बसून होता. त्याने आता आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे, पण तो क्लबसाठी खेळणे सुरू ठेवेल. नेमारने स्पष्टपणे सांगितले, राष्ट्रीय संघासोबतचा माझा काळ संपला आहे. मी पिवळ्या जर्सीसाठी घाम गाळला, इतिहास घडवला आणि नेहमीच माझ्या देशासाठी लढलो. मला आता खेळायचे नाही. नेमार हा ब्राझीलचा आतापर्यंतचा सर्वाधिक गोल करणारा फुटबॉलपटू आहे. त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक अविस्मरणीय क्षण निर्माण केले, पण त्याचे विश्वचषकाचे स्वप्न अपूर्ण राहिले. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून दूर असूनही, नेमार क्लब फुटबॉल खेळणे सुरू ठेवणार आहे.



# जनार्दन पानमंद यांची अर्ध मॅरेथॉन पूर्ण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका पंचायत समितीमध्ये सेवा बजावत असलेले कर्मचारी जनार्दन पानमंद यांनी वयाच्या ५८ वे वर्षी अर्ध मॅरेथॉन पूर्ण केली आहे. स्वतः दिव्यांग असलेले पानमंद यांची जिद्द अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र ट्रस्ट कडून आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होत अर्ध मॅरेथॉन पूर्ण करण्याचा विक्रम नोंदवला.



पानमंद हे दिव्यांग असून त्यांनी अपंगत्वावर मात करत छ. शिवाजी महाराज्यांच्या बहुसंख्य किल्ले पादाक्रांत केले आहेत. तर राज्यातील अनेक धावण्याचा स्पर्धा तसेच मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. नुकतेच गुरु पौर्णिमानिमित्त सोलापूर जिल्ह्यात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र ट्रस्टकडून आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होत अनोखा विक्रम नोंदवला. येथील मॅरेथॉन स्पर्धेत अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होताना पानमंद यांनी दोन राज्यातील स्पर्धकांचा सहभाग असलेल्या स्पर्धेत तीन गटात सहभाग घेतला. तीन किलोमीटर, पाच किलोमीटर आणि दहा किलोमीटर अशा तीन स्पर्धेत सहभागी होताना सर्व स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केल्या. पानमंद यांनी तिन्ही गटात सहभागी होत स्पर्धा पूर्ण केल्यामुळे अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र ट्रस्टचे प्रमुख अमोलराजे जन्मजेयराजे भोसले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

### सायबेजचा डिलॉइटवर दणदणीत विजय

**पुणे :** एयू स्मॉल फायनान्स बँक प्रस्तुत १६ व्या आंतर आयटी फुटबॉल चॅम्पियनशिप कप २०२६ स्पर्धेत साखळी फेरीत सायबेज संघाने आपला दबदबा कायम ठेवत डिलॉइट संघाचा ११-० असा धुव्वा उडवला. खराडी येथील टॉपप्ले फुटबॉल ग्राउंडवर स्पर्धेत सायबेजच्या खेळाडूंनी चौफेर फटकेबाजी करत प्रतिस्पर्ध्यांना सावरण्याची संधी दिली नाही.

## सोनम, हिमांशूला एअर रायफलमध्ये कांस्यपदक

**। हाँगझोऊ । वृत्तसंस्था ।**

चीनमधील हाँगझोऊ येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषकात भारतीय रायफल नेमबाज सोनम उत्तम मस्कर आणि हिमांशू ढिल्लन यांनी १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदक पटकावले. आणि भारताच्या पदकांच्या यादीत आणखी एका यशाची भर घातली. पात्रता फेरीत दोन्ही भारतीय संघांनी दमदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली. एका प्रसिद्धीपत्रकानुसार, सोनम उत्तम मस्कर (३१७.२) आणि हिमांशू ढिल्लन (३१७.४) यांनी एकत्रितपणे ६३४.६ गुणांची पात्रता धावसंख्या नोंदवली. त्याच वेळी, एलावेनिल वलारिवन (३१६.८) आणि पार्थ राकेश माने (३१७.४) यांच्या जोडीने ६३४.२ गुणांसह त्यांच्या पाठोपाठ पात्रता मिळवली. अंतिम फेरीत, सोनम आणि हिमांशू यांनी संयमित कामगिरी करत एकूण ४४१.२ गुण मिळवित कांस्यपदक निश्चित केले.



# शौर्यची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**मास्टर्स क्रिकेट अकॅडमीच्या संघातून संधी**

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी।**

श्रीवर्धन तालुक्यातील श्रीक्षेत्र हरिहरेश्वरचा शौर्य लांगी याची दिल्ली येथे ३१ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय सीझन बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी चिपळूण येथील मास्टर्स क्रिकेट अकॅडमीच्या संघात निवड झाली आहे. मास्टर्स क्रिकेट अकॅडमीचा संघ सलग सहाव्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत असून, यापूर्वी तीन वेळा विजेतेपद पटकावत अकॅडमीने आपल्या सातत्यपूर्ण यशाची परंपरा कायम राखली आहे. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणारी ही अकॅडमी कोकणातील नावाजलेल्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रांपैकी एक मानली जाते. ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना मोठ्या स्पर्धांमध्ये खेळण्याची संधी उपलब्ध करून देण्यात अकॅडमीने मोलाची भूमिका बजावली आहे. शौर्यने जिद्द, कठोर सराव आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर या संघात स्थान मिळवले आहे.



वडील सुयोग लांगी यांचा भक्कम पाठिंबा आणि प्रशिक्षक आकाश पवार यांचे परिश्रम व दर्जेदार प्रशिक्षण यामुळेच त्याला राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळाली आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र इन्व्हिटेशन स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या पार्थ हरेकर याच्याकडे संघाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. संघात साईश खेडेकर, ऋग्वेद मोहिते, सादीम साबळे, अहिल बालाभाई, अथर्व सागवेकर, अर्णव मोरे, मुहम्मद तांबे, अनुज वामने, शौर्य लांगी, आराध्य कदम, मोहम्मद सईद, अर्जुन कदम आणि दाऊद परकार यांचा समावेश आहे. या स्पर्धेत शौर्य आपल्या उत्कृष्ट कामगिरीने हरिहरेश्वर, श्रीवर्धन तालुका आणि रायगड जिल्ह्याचा नावलौकिक उंचावेल असा विश्वास व्यक्त करत विविध स्तरातून त्याला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## जिल्हास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेत फलक इलेव्हन संघाने मारली बाजी



**। रोहा । प्रतिनिधी।**

रोहा मोहल्ला व्हॉलिबॉल क्लब टीमच्यावतीने रोहे अंजुमन उर्दू हायस्कूलच्या मैदानावर दोन दिवसीय जिल्हास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत यजमान रोहा संघाला नमवून फलक गोरेगांव इलेव्हन संघाने पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

स्पर्धेत नामवंत संघानी सहभाग घेतला होता. फलक गोरेगांव इलेव्हन संघ संघाला प्रथम क्र.३० हजार रु. व आकर्षक चषक उपविजेता रोहा ('ए' टीम) संघाला १५ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# गुकेश, सिंदारोव्हची जिनिव्हामध्ये रंगणार लढत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विद्यमान जागतिक विजेता गुकेश डी आणि आव्हानवीर जावोखिर सिंदारोव्ह यांच्यातील २०२६ ची जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे २५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत होणार असल्याचे जागतिक बुद्धिबळ महासंघाने जाहीर केले आहे. स्पर्धा सुरू होईल तेव्हा दोन्ही बुद्धिबळपटू २० वर्षांचे असतील, ज्यामुळे ही इतिहासातील सर्वात तरुण वयोगटातील जागतिक अजिंक्यपद लढत ठरेल. गुकेश




डिसेंबर २०२४ मध्ये सिंगापूर येथे जिंकलेले विजेतेपद या स्पर्धेत पणाला लावेल. त्याने चीनच्या डिंग लिरेनचा १४ व्या आणि अंतिम क्लासिकल सामन्यात पराभव करून १८ वा जागतिक विजेता आणि हे विजेतेपद पटकावणारा सर्वात तरुण बुद्धिबळपटू होण्याचा मान मिळवला होता. सायप्रसमध्ये झालेली फिडे कँडिडेट्स टूर्नामेंट २०२६ जिंकून सिंदारोव्हने या विजेतेपदासाठी आपली दावेदारी सिद्ध केली. २०२५ च्या फिडे वर्ल्ड कपमधील विजयानंतर, या उझबेक ग्रँडमास्टरने एक फेरी बाकी असतानाच स्पर्धेत पहिले स्थान निश्चित केले. या अजिंक्यपद स्पर्धेत क्लासिकल सामने खेळले जातील. जो खेळाडू सर्वप्रथम ७ गुण मिळवेल, त्याला विजेता घोषित केले जाईल आणि एकदा का ही गुणसंख्या गाठली गेली की पुढील सामने खेळले जाणार नाहीत. जर सर्व १४ सामन्यांनंतर गुण समान राहिले, तर विजेत्याचा निर्णय टाय-ब्रेकद्वारे घेतला जाईल. फिडेचे हंगामी अध्यक्ष विश्वनाथन आनंद यांनी या घोषणेचे स्वागत केले. भारत, अमेरिका आणि सायप्रससह अनेक देशांनी ही लढत आयोजित करण्यात तीव्र रस दाखवला होता. सर्व प्रस्तावांचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर, फिडेने ही लढत तटस्थ भूमीवर घेण्याचा आणि ती जिनिव्हामध्ये आयोजित करण्याचा निर्णय घेतला. जिनिव्हा हे राष्ट्र आणि संस्कृतींना एकत्र आणण्याची ऐतिहासिक परंपरा असलेले शहर आहे. आम्ही जागतिक बुद्धिबळ समुदायाचे स्वित्झर्लंडमध्ये स्वागत करण्यास उत्सुक आहोत.

**मोहम्मद शामी-ईश्वरनलाही संघात स्थान | २३ ऑगस्टपासून सुरू होणार स्पर्धा**

# दुलीप ट्रॉफीचे इशानकडे कर्णधारपद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दुलीप ट्रॉफी २०२६ च्या पूर्व विभागाचा संघ जाहीर करण्यात आला आहे. यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन संघाचे कर्णधारपद भूषवणार असून, वैभव सूर्यवंशी उपकर्णधार असेल. मोहम्मद शमी, मुकेश कुमार, अभिमन्यू ईश्वरन आणि शहजाद अहमद यांसारख्या नामांकित खेळाडूंचीही निवड झाली आहे. दुखापतीमुळे रियान पराग संघात नाही. दुलीप ट्रॉफी २३ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. पहिला सामना पूर्व विभाग आणि ईशान्य विभाग यांच्यात होईल. सर्व सामने बंगळूरु येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये खेळले जातील. किशनने अलीकडेच भारतासाठी मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. कसोटी क्रिकेटमध्ये ऋषभ पंतनंतर दुसऱ्या पसंतीचा यष्टीरक्षक-फलंदाज म्हणूनही त्याचा विचार केला जात आहे. तो दुलीप ट्रॉफीच्या माध्यमातून आपले स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करेल. सूर्यवंशीचाही त्याच्या लाल चेंडूच्या क्रिकेटमधील अनुभवामुळे संघात समावेश करण्यात आला आहे. मोहम्मद शमीची निवड लक्षवेधी आहे. तो २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपासून भारतासाठी खेळलेला नाही.



### दुलीप ट्रॉफीसाठी पूर्व विभागाचा संघ

इशान किशन (कर्णधार), वैभव सूर्यवंशी (उपकर्णधार), अभिमन्यू ईश्वरन, सुदीप कुमार घरामी, शहजाद अहमद, सूरज सिंधू जैस्वाल, कुमार कुशाग्र, शिखर मोहन, अनुकुल रॉय, विराट सिंग, सुभ्रांशु सेनापती, दानिश दास, अभिजित सरकार, मोहम्मद कुमार शमी, स्टँड बाय क्रिकेटपटू आयुष लोहारकुआ, श्रीदाम पॉल, संबित एस बराल, शरणदीप सिंग, स्वस्तिक सामल यांचा संघात समावेश केला आहे.

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत दिलीपची सोनेरी कामगिरी

**। ग्लासगो । वृत्तसंस्था ।**

भारतीय पॅरा थलेटिक्स पथकाने २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत इतिहास रचला. नाशिकच्या दिलीप गावित आणि मोहम्मद बासिल यांनी पुरुषांच्या १०० मीटर प्रकारात अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदक जिंकून भारतासाठी ऐतिहासिक दुहेरी पदक मिळवले. दिलीप गवीतने १०.७१ सेकंदांची वेळ नोंदवून सुवर्णपदक जिंकले आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा नवा विक्रम प्रस्थापित केला.



मोहम्मद बासिलने १०.८३ सेकंदांची वेळ नोंदवून रौप्यपदक पटकावले. या दोन्ही भारतीय खेळाडूंनी या प्रकारात आपल्या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी केली. २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे तिसरे सुवर्णपदक आहे.

या निकालाने पॅरा-ॲथलेटिक्समधील भारताची वाढती ताकद दाखवून दिली, कारण दोन्ही धावपटूंनी ग्लासगोमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. गावितच्या विक्रमाने त्याचा उत्कृष्ट फॉर्म सिद्ध केला, तर बासिलच्या रौप्यपदकाने भारताच्या पदकतालिकेत आणखी भर घातली. दिलीपने सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. त्याची कहाणी तरुण पिढ्यांना प्रेरणा देईल.

दिलीपगावितचीकहाणीहेधैर्य, दृढनिश्चय आणि आत्मविश्वासाचे एक प्रभावी उदाहरण आहे. एका लहान शेतकरी गावातून आणि आयुष्य बदलून टाकणाऱ्या दिव्यांगत्वातून राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा विजेता बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास, हे त्याने दाखवून दिले आहे की कठोर परिश्रम आणि समर्पणाने संकटाचे यशात रूपांतर करता येते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)